
सुलट
उलट
डॉ. नितीन मोरे

# सुलट उलट

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# सुलट उलट

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सुलट उलट

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ८ सप्टेंबर २०२१ (भाद्रपद शुद्ध द्वितीया )

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बत्तिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

*A politician needs the ability to foretell what is going to happen tomorrow, next week, next month, and next year.*

*And to have the ability afterwards to explain why it didn’t happen.*

**Winston Churchill**

# सुलट उलट

डॉ. नितीन मोरे

# उलट सुलट ते सुलट उलट

विणकामात असले टाके असतात म्हणे.. दोन सुलट एक उलट असे काहीतरी. विणलेल्या वस्त्रात आडवे न उभे धागे असतात. समाजाच्या ह्या महावस्त्रात ही असे ताणे बाणे असायचेच. पण उलट्या चष्म्यातून पाहिले की उलटे सुलट दिसतात नि सुलटे उलट. शेवटी काय सगळे उलटसुलट सुलट उलट होऊन जाते आणि काय!

माझ्या 'केल्याने शीर्षासन', 'नाच जमूरे नाच' आणि 'ऐसा भी होता है' मध्ये ही काही प्रमाणात हेच उलटसुलट झाले होते. पण आजूबाजूचे जग दयाळू आहे. ते विषयांची कमी काही पडू देत नाही. विसंगतींच्या पुरातून काही थेंब टिपण्याचा हा प्रयत्न ..

काही उलटसुलट लिहिले गेले असेल तर उदार अंत:करणाने वाचक माफ करतीलच.. पण त्याचबरोबर यातील सर्व पात्रे नि प्रसंग.. घटना.. वगैरे पूर्णपणे काल्पनिक आहेत.. योगायोगाने कुठे साधर्म्य आढळल्यास तो ही योगायोगच समजावा. कुठे काही कुणास आपल्या स्वत:बद्दल लिहिले गेले असे वाटले तर ते त्यांच्याबद्दल नसून इतर कुणाबद्दलच आहे याची खात्री बाळगावी. शेवटी काल्पनिक गोष्टी कल्पांतापर्यंत सापडू शकतातच नाही का?

डाॅ.नितीन मोरे

# सुलट उलट

## अनुक्रम

१. माझी सरकारी नोकरी

२. तीन शरद

३. त्याचा राजकीय मॉल

४. शंकासुराचा वध

५.अखंडपुरातील विकासगंगा

६. नि:प्रश्नं सदा सुखी

७. आमचे ज्ञानार्जन २४×७

८. समकालीन समर्थ

९. मस्कापॉलिशी

१०. बुटक्यांच्या देशात

११. कोंडो विठ्ठलाची बखर

१२. आपण आणि ते

१३. भावनाबाई आणि अस्मितताताई

## माझी सरकारी नोकरी..

सरकारी कार्यालयात काम केल्याचे खूप सारे फायदे असतात .. म्हणजे पगार तर मिळतो.. वर ओव्हरटाइमची सोय असते.. खुर्चीच्या 'बॅक'वर रेलून वामकुक्षी एवढा एक ड्रॉ'बॅक' सोडला ना तर सरकारी नोकरी सारखी दुसरी नोकरी नाही तुम्हाला सांगतो.

गेल्या वीस वर्षांच्या नोकरीत, सरकारी नोकरीने मला काय काय नाही दिले?

आजकाल तर बेरोजगारी खूप आहे म्हणतात.. सरकारी दप्तरे पण टेंपररी जॉब नि कॉंन्ट्रॅक्ट किलर्स कडून कार्यभाग साधतात.

कॉन्ट्रॅक्ट किलर म्हणजे एखाद्या जॉबचा फडशा पाडणारे. त्यांचे सारेच टेंपरवारी. फक्त तेही काम जाऊ नये म्हणून काम मात्र पर्मनंट वाटावे असे करत बसतात. सरकारी कचेऱ्या अशांवर चालत असाव्यात .. आमच्याकडे तर एकजण गेले दहा वर्ष टेंपररी आहे! पण माझे तसं नाही. नोकरीला चिकटलो.. तीन महिन्यात पर्मनंट.. मग फक्त पेन्शन किती बसेल एवढीच उत्सुकता उरली. अर्थात अधेमधे प्रमोशन वगैरे .. त्याच्या परीक्षा नि मुलाखती.. तुम्हाला सांगतो, थोडा विवेक मनी बाळगला की ध्यानात येईल.. प्रमोशन चार ऐवजी सहा वर्षात मिळाल्याने काही एक बिघडत नाही. उगाच लवकर प्रमोशन मिळवण्याचे एक टेन्शन आणि त्यासाठी उरफोड मेहनत. सरकारी कामाची उतरंडच अशी की दोन तीन वर्षात लोकलाजेस्तव प्रमोशन द्यावेच लागते.. वाढत्या वयाइतके चांगले क्वालिफिकेशन या जगात नाही .. आणि गंमत म्हणजे त्यासाठी आपल्याला काहीच मेहनत करावी लागत नाही! अजून एक महत्त्वाचा मुद्दा .. सर्व सरकारी नोकरांनी ध्यानात घ्यावा असा.. तुम्हाला प्रमोशन मिळाले तर ठीकच.. म्हणजे त्यासाठी प्रयत्न कराच .. पण मागे राहिल्यामुळे तुमचा पगार खूप काही मागे राहिल असे नाही. थोड्याफार फरकाने पगार पण वाढत राहिलच. सांगायचा मुद्दा इतकाच .. सरकारी नोकरीत पुढे पुढे गेल्याने तुमचा फार काही फायदा होईलच असे नाही. या उलट तुमची निवड न झाल्यास आजूबाजूच्या साहेबांच्या तुमच्याकडून अपेक्षा कमी

होतील.. 'हा काही कामाचा नाही' .. 'थोडा सटक डोक्याचा आहे'.. 'याचं काही खरं नाही' .. 'याच्याकडून कामाची अपेक्षा ठेवणे म्हणजे दगडावर डोके आपटून घेणे' .. अशा इमेज बिल्डिंगसाठी कठोर मेहनत करावी लागते.. पण एकदा नोकरीत पर्मनंट झालात की पुढील काही वर्षांत मेहनतीने अशी प्रतिमा उभारणी करा.. एकदा ही मेहनत फळाला आली की आपली ऑपरेशन गव्हर्नमेंट सर्विस मोहिम फत्ते झालीच म्हणून समजा. आता त्यापुढे फक्त सोयीसुविधांच्या राशी पसरलेल्या दिसतील ..

तर वीस वर्षांपूर्वी तेव्हाचे दहा हजार खर्च करून सरकारी नोकरीत शिरलो.. नोकरीचा पायगुण इतका चांगला .. की गेल्या दोन वर्षात धडाधडा नकार पचवलेला मी लग्नाच्या बाजारात .. तो पर्मनंट सरकार नोकरीमुळे हातोहात उचलला गेलो.. म्हणजे एकसाथ नोकरी आणि छोकरी ही. आताच्या हिच्या असण्यावर जाऊ नका, पण त्याकाळी छोकरी म्हणावी अशीच होती ती. थोडक्यात सरकारी नोकरी मुळे माझा भाव लग्नबाजारात इतका वाढेल असे वाटले नव्हते .. अगदी सरकारी नोकरीत चिकटण्याचा खर्च भरून आलाच त्याबरोबर काही तोळे सोनेही गाठीस बांधता आले. एकतर नोकरीवाला नवरा मुलगा दुर्मिळ.. त्यात सरकारी.. त्यात कायमची.. कोणत्या वधूपित्यास भरून येणार नाही अशी आखूडशिंगी बहुदुभती गाय पाहून? त्या आनंदाच्या भरात हात

सैल सोडावा लागला तरी भावी आयुष्य त्यांच्याच लाडक्या मुलीचे सुधारणार आहे इतका समंजसपणा माझ्या सासरेबुवांत होता. आणि नको तितके शिंगावर न घेण्याचा गुणही माझ्याकडे होताच. त्यामुळे पंधरा हजाराऐवजी साडेतेरा हजाराचीच सोय झाली लग्नात तेव्हा मी देखील फार ताणून धरले नाही. उगाच रूसून वगैरे बसलो नाही. चित्ती असू द्यावे समाधान म्हणत.. 'दिडहजार द्या नाहीतर हा निघालो' असा त्रागाही मी केला नाही. शेवटी सोय जाणतो तो सोयरा इतके ध्यानात ठेवणे महत्त्वाचे ..

तर नोकरी लागली. लग्न झाले. लवकरच सरकारी घर मिळण्याची वेळ झाली.. म्हणजे क्वार्टर्स! हा फायदा, फायदा म्हणून मोजण्याआधी घरभाडे भत्ता वाहतूक भत्ता वगैरे हिशेब करावा .. नाहीतरी सरकारी नोकरीत वेळेचे बंधन नसते. तसे कागदोपत्री बंधन असले तरी आमच्यासारख्या जुन्याजाणत्यांना त्यातील वाटा आणि पळवाटा ठाऊक असतातच. तर कामाच्या ठिकाणाजवळ राहिलात की बॉस उगाच 'नजदीक रहते हो फिरभी लेट' म्हणून करवादणार.. त्यापेक्षा आपले वाहनस्वातंत्र्य टिकवून ठेवावे.. म्हणजे ते कुठेही ठप्प पाडता येते. वर बस आणि रेल्वेतून लटकून प्रवास करण्याबद्दलच्या सहानुभूतीची बेगमी करता येते ती अलग. थोडक्यात सारासार विचार करून मी डोंबिवली सोडली नाही. वडिलोपार्जित घरात वाडवडलांची पुण्याई वास करून असते. ती अशी कशी सोडावी? त्यामुळे ती पुण्याई ठेऊन घेत मी आई नि

वडलांची सोय गावच्या घरी लावून दिली. त्यामुळे राजा राणीचा संसार ही सुरू झाला.. एका नोकरीत इतकी शक्ती असू शकते?

थोडक्यात काय वयाच्या पंचविशीत अपनी गड्डी निकल पडी! धाडधाड ते ही. तुम्हाला सांगतो, खाजगी नोकरी मिळते पण ती टिकवण्याचे टेन्शन फार. चार पैसे महिना काठी जास्त भलेही मिळोत, पण जोवर तुम्ही नोकरीत आहात तोवरच. उद्या नोकरीच नसेल तर? पगार ठप्प! या उलट माझी ही पर्मनंट नोकरी .. मी ड्रायव्हर असेन गाडीवर.. ड्रायव्हिंग ला अनफिट असेन आता.. तरी मला पगार मिळणारच. मग ड्रायव्हर म्हणून मी गाडीचे चाकही न हलवू शकलो तरीही. पर्मनंट नोकरीत सरकार आपल्या नोकरांना आईच्या मायेने सांभाळून घेते. कितीही चुका पोटात घालत राहते, वर कालमर्यादेत पगार वाढवून ही देत राहते. अशा सरकारास मायबाप सरकार म्हटले जाते ते उगीच नाही! अशी सुविधा खाजगी नोकरीत नाही.

काळ काम आणि वेगाची गणिते सरकारी नोकरीत वेगळ्या पद्धतीने सोडवता येतात. बाकी ठिकाणी माणसं वाढली की कामाला लागणारा वेळ कमी होत जातो, तर इकडे काम करणारी माणसं वाढली की लागणारा वेळ वाढत जातो.. स्वतःला एखादे काम येत असल्याचा फाजील आत्मविश्वास न बाळगता ते काम

करण्यास इतरही काही जण पात्र आहेत, त्यांना संधी मिळवून देणे आपले कर्तव्य आहे.. हे समजून एकजण दुसऱ्यास 'पहले आप पहले आप' म्हणून संधी देत राहतो.. त्यात त्या कामाची गाडी एका ठिकाणी उभी राहते.. त्यात एका कामास लागणारा वेळ अनंत असू शकतो.. हे काळ अनंत असल्याचे शाश्वत सत्य सरकारी नोकरीत शिकायला मिळते. खाजगी नोकरी सारखा टारगेट्सचा टारगटपणा सरकारी पद्धतीत नसतो. एखाद्याच्या डोक्यावर बंदूक रोखून त्याच्याकडून वेळेवर काम करवून घेण्याचा अमानुषपणा मायबाप सरकार कधी करत नाही .. म्हटले ना, उगीच नाही सरकारला मायबाप म्हटले जाते.

तर सरकारी नोकरीने मला खूप काही दिले. आणि अजूनही ती देत आहे. महत्त्वाचे म्हणजे मी सरकारी नोकरीची पद्धत घरच्या मॅनेजमेंटमध्ये वापरायला सुरूवात केली नि सारे प्रॉब्लेम्स चुटकीसरशी आजचे उद्यावर ढकलता येऊ लागले. काळाच्या अनंतपणापुढे आजची समस्या उद्यावर ढकलणे दिसताना थोडे विचित्र वाटू शकेल.. पण ज्याने ही पद्धत अवलंबली त्यासच तिचे महत्त्व समजू शकेल. या पद्धतीत सर्वात महत्त्वाची असते ती समिति बसवणे. म्हणजे कोणतीही समस्या उद्भवली की तातडीने तिच्यावर उपाय शोधण्यासाठी समिती गठन करून टाकावी. गठन करणे हा खास सरकारी शब्द घरीसुद्धा त्याच अर्थाने वापरला जावा..

कित्येकदा नुसती समिती नेमल्यावर ही समस्या निराकरणाचा अनुभव आला आहे मला. म्हणजे समिती गठन झाली. घरचीच समिती, त्यामुळे मी पदसिद्ध चेअरमन.. थोडक्यात रबर स्टँप.. आणि ही सेक्रेटरी .. येथे चेअरमनला बोलण्याची संधी दिली जात नाही. चेअरमन कधी कधी आपली अंगभूत सबुरी आणि संयम विसरला की खडाजंगी होते.. मूळ समस्या मग बैठकीतील वादावादीहून सोपी दिसायला लागते.. समिती एकदा बसली की तिच्या खाली उप समिती.. उप उप समिती बसवण्याची सोय असते. त्यांच्या मग बैठका होतात .. अहवाल सादर होतात .. बहुतेकदा निष्कर्ष म्हणून पुढील निर्णयासाठी परत बैठक घेण्याचे ठरते.. सरकारी बैठकांचा एक फायदा घरगुती बैठकांत मिळत नाही मात्र. बैठकीचे भत्ते नि अल्पोपहार .. घरगुती बैठकीत सेक्रेटरी मूड मध्ये असेल तर अल्पोपहाराचा प्रश्न सुटू शकतो हे मात्र खरे..

सरकारी नोकरीने मला काय शिकवले असेल तर हे.. न सुटण्याइतकी कुठलीच समस्या जटिल नसते.. कित्येक समस्या आपोआप सुटतच असतात. काळ हे सर्व समस्यांवरील जालीम औषध आहे.. आणि एखादी समस्या नाही सुटली तरी विशेष बिघडत नाही .. तिच्याहून मोठी समस्या उद्भवली की आपोआप पहिलीचा विसर पडतो.. थोडक्यात हे रिअल लाइफ जीवन शिक्षण देणारी ती सरकारी नोकरीच. माणसाचा मी पणा सोडवण्याचा एक साइड फायदाही त्यात आहे. स्वतःस शहाणे समजून समस्या

निवारण करू जाल तर फसाल.. या विश्वाच्या पसाऱ्यात आपण एक यःकश्चित जंतूसम.. उगाच हातबित धुवून प्रॉब्लेम सोडवण्यासाठी मागे लागण्याचा आगाऊपणा.. कुणी सांगितला? हे मी पणा टाळणे नोकरीत राहून मुरलो की शिकायला मिळते. नवीन नवीन लागलेले अधिकारी असतात, त्यांच्या हे ध्यानात येत नाही. डिपार्टमेंट बदलून टाकण्याच्या गोष्टी होतात. शिस्त आणण्याच्या गोष्टी होतात .. पण जसा काळ उलटतो .. इंग्रजीत म्हणतात तसे.. मोअर द थिंग्ज चेंज, मोअर दे रिमेन सेम.. गेल्या कित्येक वर्षात न बदललेला सरकारी ऑफिसचा चेहरा.. तो कालातीत आहे असे नाही वाटत?

आमच्या डिपार्टमेंटकडे एकदा आर्थिक बाबींवर मतप्रदर्शन करण्याची वेळ ओढवली. कुणी संधी आली चालून आली असे म्हणेल त्यावर. पण सारा दृष्टिकोनाचा फरक आहे. अर्थात आम्ही समिती बसवली.. पहिल्या बैठकीत उपसमिती नेमण्याचा निर्णय झाला.. त्यावर उपसमितीच्या अध्यक्षपदी कोण बसावे यासाठी उप उप समिती नेमली गेली.. शेवटी उप उप समिती बसली. मग उपसमिती.. समित्यांच्या उतरंडीत मूळ आर्थिक बाब कुठली होती त्याचा विसर पडला.. ती हुडकून काढायला परत समिती बसवली गेली.. इतक्या समित्या झाल्या एकावेळी की प्रत्येकीसाठी एक अध्यक्ष शोधणे कठीण झाले. नाईलाजाने एका समितीच्या अध्यक्षपदी मला बसावे लागले .. समितीचे काही नाही.

अध्यक्षपदाचेही काही कौतुक  नाही, पण भर दुपारी दोन वाजता बैठका घ्याव्या लागल्या.. त्यामुळे बसून का होईना होणाऱ्या वामकुक्षीत खंड पडला कित्येक दिवस. त्या जागरणाने तब्येत बिघडते की काय असे झाले.. सरकारी नोकरीत असे धोक्याचे प्रसंग येऊ शकतात हे मात्र म्हणून ध्यानात ठेवावे लागते. अर्थात यावेळी चूक माझीच होती. गाफील राहिलो.. समितींच्या जंजाळात मार्ग निघत नाही .. त्यावर नवी समिती हा उपाय हे माझ्या वेळीच ध्यानी येऊन मी सिक लिव्ह वेळेवर टाकायला हवी होती. रामदास स्वामी 'अखंड असावे सावधान' हे सांगून गेले ते हे असे वैश्विक सत्य आहे.

या आर्थिक समितीचा एक फायदा मात्र झाला.. म्हणजे मी घराचा एक महिन्याचा अर्थसंकल्प  मांडण्याचा आदेश काढला घरी.. असे पण फेब्रुवारी आला की देशाला अर्थसंकल्पाचे वेध लागल्याच्या बातम्या येतात. माझ्यासारख्याला तर अर्थसंकल्प आणि त्याच्या बातम्या इतक्या वर्षांत तोंडपाठ झाल्या आहेत. आठ दिवस आधीपासून ए टू झेड क्षेत्रातले तज्ञ आपल्या अपेक्षा व्यक्त करत राहतात. काही धडाकेबाज अर्थसंकल्प अपेक्षित २१ प्रश्न सांगावेत परीक्षेआधी तसे छातीठोक सांगतात. लोक दोन घटका करमणूक करून घेतात. रूपया असा येणार आणि असा जाणार .. काही गोष्टींवरचा कर वाढणार .. तर काहींवरचा काढणार .. सरकारी पक्ष म्हणणार अर्थव्यवस्थेस चालना मिळणार.. विरोधी

पक्ष त्याच्या एकदम उलट.. अर्थव्यवस्था ठप्प पडणार असल्याचे भाकित करणार .. खरेतर अर्थसंकल्पाचे घाऊक पेपर आधीच छापले तर काही बिघडणार नाही .. असो. तर मी अर्थसंकल्प घरीपण लागू करण्याचा संकल्प सोडला. पण गाडे मुदलात अडले.. म्हणजे खरेखुरे मुद्दल रूपया असा येणार म्हणून दाखवण्यासाठी तरी यायला हवा.. तरी गाडी दामटली.. रूपया असा जाणार म्हणून लिहायला बसलो तसे सौ. च्या तोंडून खर्चाचा पाढा म्हटला गेला.. रूपयात शंभर पैसे असतील पण जाणाऱ्या रूपयाला वाटा हजार .. येणारा रूपया कसाबसा पगारातून घरात शिरतो.. अर्थसंकल्प पुढे मी बनवलाच नाही पण खरेच जाणाऱ्या रुपयाच्या वाटा हजार असतील तर ते खाते काही न बोलता सांभाळणाऱ्या बायकोला मी मनातून सलाम केला. उघड सलाम करणे समितीच्या प्रोटोकॉलमध्ये बसले नसते.. नाही म्हटले तरी मी चेअरमन होतो समितीचा..

तर सरकारी नोकरी असा प्रोटोकॉल शिकवते. नोट पुट अप करण्यापासून ते कुठलाही पांढऱ्यावर काळा अर्ज खरडण्यासाठी एक शिस्त पाळावीच लागते. छोट्या साहेबाकडून मोठया साहेबाकडे पेपर हलावे लागतात. ते किती जलद हलतील हे ज्याच्या त्याच्या इच्छाशक्तीवर अवलंबून असते.. आणि इच्छाशक्ती त्यामागील आर्थिक बाबींवर! पण कितीही तगडी आर्थिक बाजू असेल तरी सरकारी कार्यालयीन प्रोटोकॉल हा पवित्र

असल्यासारखा पाळावा लागतो. ब्रिटिशलोक इंग्रजीबरोबरच आपल्या वारशात प्रोटोकॉलची ही शिस्त सोडून गेले याबाबत कुणाचे दुमत होऊ नये. असो..

सरकारी नोकरी म्हटले की शेवटी राहिला भाग वरकमाईचा. म्हणजे दबकत दबकत सगळीकडे याची चर्चा होत असते. सरकारी नोकरी म्हणजे वरकमाईची खाण.. वगैरे वगैरे. आता वीस वर्षांच्या नोकरीनंतर एकच सांगतो.. दुरून डोंगर साजरे.. देणाऱ्याला घेणारा एकुलता दिसतो पण त्याचे शिस्तबद्ध आणि प्रोटोकॉलनुरूप वाटप दिसत नाही .. इकडे देखील अर्थसंकल्पीय प्रारूप.. आलेला रूपया असा जाणार लागू पडत राहते.. समजा आज एक रूपया कमाई झाली.. तर प्रोटोकॉलनुसार वरचा साहेब नि त्याच्यावरचा साहेब अशी वाटणी होत राहते.. शेवटी झिरपत झिरपत माझ्यासारख्या कारकुनाकडे एक आणा उरला तरी बक्कळ म्हणावे.. म्हणून म्हटले, वरकमाई ही खरी नव्हेच. लक्ष्मीला पाठ न फिरवण्याचे संस्कार पाळावे लागतात म्हणून .. पण दुरून डोंगर साजरे हे मात्र खरे..

म्हणजे सरकारी नोकरीचा यु एस पी कुठला हे विचारले तर काय सांगता येईल.. कायमची नोकरी .. उगाच येता जाता कामाचा तगादा नाही .. हव्या तेव्हा हव्या त्या नियमात बसवून घेता येणाऱ्या

सुट्ट्या.. आणि नोकरी अंती मिळणारे पेन्शन. त्यामुळे इतके समजून कधीही काही व्हायचे असेल तर सरकारी नोकरच व्हा..

..अर्थात व्हा म्हणजे .. तेवढे तुमचे मागील जन्मीचे पुण्य असेल तरच सरकारी नोकर व्हाल..

# तीन शरद

१

शरदला आपल्या आडनावाचा फार अभिमान आहे. गर्व म्हणावा इतका. जन्माने दिलेले आडनाव नि जन्मानेच मिळालेल्या स्व-धर्माचा अभिमान हेच त्याचे खरे संचित. मैदानात संध्याकाळी लाठी घेऊन अज्ञात शत्रूवर चालून जाताना त्याचे बाहू फुरफुरतात. डोळ्यांत त्वेष दाटून येतो. परधर्मीयांचे आक्रमण थोपवून धरताना त्याच्या गळ्याच्या शिरा तट्ट फुगतात. प्राचीन संस्कृतीबद्दल त्याच्या मनात अतीव आदर.

सांप्रत काळाहून त्याचे मन त्या काळात रमत असते. आपले पूर्वज किती द्रष्टे असावेत? या काळातही आजवर कालबाह्य न होऊ शकलेल्या कित्येक चालीरीती पाडून ठेवणारे, जीवनाची चाकोरी आखून देणारे ते पूर्वज.. त्यांच्याबद्दल आदर दाटून येतो. प्राणपणाने हा वारसा जपला पाहिजे .. मग समोरच्याचा प्राण गेला तरी बेहत्तर. रोज सकाळी उठल्यावर आधी प्रात:स्मरणात शत्रूचा नायनाट करण्याची इच्छा मनी दाटून येते. शत्रूवर तुटून पडणे किंवा तशी इच्छा सदा मनात बाळगणे हाच त्याचा छंद.

शत्रू त्याचे एकच एक नाहीत. कारण जसजसा त्याचा स्व-अभिमान वाढत गेला तसतसे त्याला जाणवू लागले, आपण किती मोठे आहोत नि आपल्यापुढे आजूबाजूचे किती यःकश्चित. त्याबरोबर आधीचा धर्माभिमान आता जात्याभिमानातही बदलू लागला. शरद मोठा होत गेला तसे त्याचे शत्रू वाढत गेले. म्हणजे त्याला तसे जाणवू लागले. परधर्मी तर परधर्मीच आहेत.. पण स्वधर्मात त्याची बरोबरी करू पाहणारेही खालच्या वर्गातून आलेले.. त्याला त्यांचा तिरस्कार वाटतो. आधी नुसतीच किळस वाटायची. कुठल्याशा घाणीतून आलेले सारे. स्वच्छताप्रिय त्याला अशा घाणीची घृणा वाटायची. गटारे साफ करणारे आपल्यासारख्याशी कसली बरोबरी करणार? खालच्या जातींबद्दल लिहून ठेवून त्या पूर्वजांनी किती महत्कर्म केले आहे याचा विचार करून त्याचा ऊर भरून येतो. त्यात पुढे काय तर

आरक्षण आले. कालचे निम्नवर्गीय लोक शिकायचा प्रयत्न करू लागले. एखाद अपवाद वगळा.. त्यांना कसले झेपते ते शिक्षण? ज्यांनी हलकी कामे करावीत त्यांच्या हाती हे मेंदू वापरावा लागेल असे काम? बुडणार संस्कृती. एक दिवस पूर्ण संस्कृती बुडवणार हे लोक. त्यात मग कित्येक शिकू लागले, खांद्याला खांदा लावून उभे राहू लागले .. बुडणाऱ्या संस्कृतीकडे वैषम्याने पाहातोय शरद. आजवर आपल्या उच्च जातीचा अभिमान अजून जास्त वाढावा म्हणून अजून कडवट विचार गरजेचे. इतक्या वर्षांपूर्वी जे पूर्वसूरी सांगून गेले, इतकी वर्षे ही संस्कृती जतन केली ती काय अशी उधळून लावण्यासाठी? या खालच्या जातींना वेगवेगळी कामे नेमून दिलीत ती समाजाचे रहाटगाडगे व्यवस्थित चालावे म्हणूनच ना? ऋषीमुनींनी लिहून ठेवले त्याची उपेक्षा कशी करावी? काही संत मंडळी होऊन गेली, कुणी संस्कृत भाषेतले ज्ञान प्राकृतात आणले, कुणी शहाणपण सकल जनांस शिकवण्यासाठी मनाचे श्लोक मराठीत लिहून गेला. बामणासारखा ब्राह्मण संत तहानलेल्यास जातपात न पाहता कोणाला पाणी पाजून गेला. पण त्याआधीच ऋषी सांगून गेले, वेगवेगळ्या ग्रंथात लिहून गेले ते काय उगीच? या संतमंडळींनी आपली टाळचिपळ्या घेऊन देवभक्ती करावी. उगाच समाजास शहाणपणा शिकवण्याचा अतिशहाणपणा कशाला? समानतेच्या असल्या शिकवणी कसल्या द्याव्यात? हाताची पाची बोटे समान नसताना पायापासून निर्माण झालेला

क्षूद्रातिक्षूद्र शिरापासून विकसित झालेल्या उच्च वर्णीयाशी कसा काय बरोबरी करू शकतो? परधर्म नि परजात .. दोघांबद्दल विचार करकरून त्याचे डोके भणभणून जाते. कसे व्हावे या धर्माचे नि संस्कृतीचे. काळ बदललाय म्हणे.. आजूबाजूस आपल्याच धर्मातले, एवढेच काय आपल्याच उच्च जातीतलेही काही, बदलत्या काळाची गरज म्हणत सर्व बंधन तोडून मानव तितका एकच आहे म्हणताना ऐकले की त्याच्या कपाळावरील शिरा तट्ट फुगतात.. हाताच्या मुठी आपोआप वळतात नि संस्कृती संरक्षणासाठी तोंडातून असंस्कृत शब्द आपोआप बाहेर पडतात. पण संस्कृती संरक्षण आणि संवर्धन करणाऱ्यास त्याचे काय होय? घड्याळाचे काटे उलटे फिरवता आले असते तर? कित्येक रूढी नि परंपरा जागृत करून आपल्या धर्मास परत ऊर्जितावस्थेत आणता आले असते.. त्या उज्ज्वल परंपरा आणि त्या रूढींचा अभिमान दाटून येतो मनात नि दुसऱ्याच क्षणी त्या गत दिवसांची आठवण येऊन मन भरून येते त्याचे. एकाएकी सनातन धर्म संरक्षणार्थ काही तथाकथित समाज सुधारकांची आहुती देणाऱ्या आपल्या धर्मबांधवांबद्दल अभिमान नि आदर मनात दाटून येतो. अजूनही त्यामुळे धर्म पुनरूज्जीवनाच्या शक्यतेत काही धुगधुगी असल्याचे वाटून तेवढेच मन शांत होते त्याचे. रात्री झोपताना तो शत्रू निर्दालनाची स्वप्ने पाहातो .. नि धर्माच्या अवकाशात सनातन

धर्माची प्रभात उगवेल नि ती प्रभा सकल समाजावर पसरेल.. अशा विचारात त्याची मंगल प्रभात उगवते..

२

भीमा सोनकांबळेंच्या पोटी शरद आला जन्माला. मोठ्या हौसेने त्याचे बारसे झालेले. सोनकांबळेंच्या मोठया घरात आनंदी आनंद झालेला सगळा. शरदचे आजोबा आपले गाव सोडून शहरात आले.. शिक्षण नाही. मजूरी केली. कामाला मागे हटले नाहीत.. शिक्षणाचे महत्त्व जाणले त्यांनी.. भीमा सोनकांबळे जात्याच तसे हुशार. शिकायची हौस मोठी. आणि आपल्या वडलांसारखी ढोर मेहनत करायची नसेल तर हेच शिक्षण कामी येणार ही खूणगाठ मनाशी बांधून अभ्यासाला जुंपून घेतलेले. पुढे आरक्षणाचा फायदा घेत हवे ते शिक्षण नि हवी ती नोकरी. पटापट शिड्या चढत सरकार दरबारी ऑफिसर. मोठे घर. पगार भरपूर नि सुबत्ता घरात. आजोबांनी गावी जातपातीवरून टक्के टोणपे खाल्ले.. भीमा सोनकांबळेंच्या नशिबात पहिली काही वर्ष सोडली तर तशी अवस्था राहिली नाही. मोठया शहरात एकाला दुसऱ्याकडे पहायला कुठे मिळतो वेळ. घड्याळयाच्या काट्यावर चालणारे शहर. थोडेफार जातीपातीवर हिणवणे व्हायचे पण अगदीच मामुली म्हणावे तसे. भीमा आपल्या गुणवत्तेवर वर आलेले फक्त

आरक्षणाच्या शिड्या चढून वर लवकर पोहोचलेले. इतरांना ज्यास दहा वर्षे लागतील तिथे पाच सात वर्षांत पोहोचलेले. पूर्वीच्या पिढ्यांनी पाहिली नसेल अशी सुस्थिती. शरद उघड्या डोळ्यांनी बघत होता. वडलांची मेहनत नि आजोबांची ढोर मेहनत. गावगाड्यातल्या गोष्टी ऐकायला येत. दोन घोट पाणी ही न मिळावे असली स्थिती. शिवाशिव नि गावकुसाबाहेरचं जिणं. न पुढे यायला संधी न वाव. आजोबा शहरात आले नसते तर.. नि वडलांनी त्याचा फायदा घेतला नसता तर? पण आज शरद कडे काय नाही? घरदार आहे, सुबत्ता आहे. कपडेलत्ते आहेत.. श्रीमंती आहे.. शरद उघड्या डोळ्यांनी पाहतोय .. त्याला ठाऊक आहे, काही असो नसो त्याच्याकडे त्याची जन्मजात जात आहे.. कित्येक पिढ्या अन्याय सहन केला.. आता त्याच जातीच्या आधारावर पुढे जाणे आहे. ढोर मेहनत संपली, मेहनत ही संपली. आता सारे काही आरक्षणाच्या बळावर. जात नाही ती जात.. जाऊ नये वाटते कधी ती पण जात.. पूर्वी तिचे तोटे होते.. आता तिचे फायदे. कुणी कुण्या महापुरूषाने जातिअंताच्या बाता केल्या असतील .. पण अशी फायद्यातली जात संपून चालेल काय? आता गावाकडल्या नि कदाचित शहरातल्याही काही गरीब घरांत संधी नसेल मिळत.. पण शरद व्यवहारी आहे. आपल्या हुकुमाच्या पत्त्याचा हुकुमी वापर करतो तो.. जात नाही ती जात यावर श्रद्धा आहे त्याची. त्याबळावर

पुढे जायची स्वप्ने पाहतोय तो.. त्याची स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यास त्याची जात समर्थ आहेच!

३

बी.शरद आपले आडनाव नाही लावत. फार पूर्वी आडनावा पाठोपाठ जात सांगायची प्रथा होती म्हणे. पण ती मागे पडली. तरी आडनावाच्या आडून जात कळून घेणारी मंडळी आहेतच.. मग त्यावर थांबून चालत नाही.. त्यातले पोटभेद पण आडनावावरून सांगतात कित्येक जण. शरदला ह्या सगळ्याचा तिटकारा. त्यामुळे तो आडनाव लावत नाही .. फक्त नाव. त्यावरून जो बोध घेता यावा तेवढा पुरा! तसा तो गप्प असतो. समाजात बोलका म्हणून प्रसिद्ध नाही तो.. बोलेल कसा?

तो बघतो सगळीकडे .. पहिला शरद दुसऱ्याकडे कसा तुच्छतेने पाहतो ते.. खालच्या वर्ग नि वर्णातून आलेला.. आता मिरवतोय कसा तोरा .. दुसरा शरद पहिल्याकडे तितक्याच तोऱ्यात पाहतोय .. कसा देत नाहीस माझे हक्क म्हणत .. पण बी. शरदबद्दल दोघांचे एकमत आहे. धर्मनिरपेक्ष? जात निरपेक्ष? ज्याला स्वधर्माभिमान नाही, जातीचा अभिमान नाही.. गर्व तर सोडा.. सर्व धर्म समान.. जातव्यवस्था नको असली काही मानवी अस्तित्वाच्या मूलतत्वांची पायमल्ली करणारे विचार जोपासत

माणूस म्हणवून न घेण्याच्या लायकीचा हा बी. शरद. यास खरेतर या जगात रहायचा हक्क नाही. अशा बिन कण्याच्या लोकांमुळेच तर आज आमच्या धर्माची अशी अवस्था झालीय.. जर ही मूल्यव्यवस्था नसेल तर प्राणी आणि माणसांत काय फरक राहिल.. आपल्या संस्कृतीची चाड नसलेला.. जोवर ही सामाजिक कीड नष्ट होत नाही तोवर देवादिकांनी सांगितलेला धर्म प्रस्थापित होणार नाही.. पहिल्या शरदने शत्रूंच्या यादीत भर घालताना विचार केला. अजून आपल्या राष्ट्रात कायदा काम करतो नाहीतर अशांची गचांडी बांधून कधीच या सर्वधर्मसमभाववाल्यास स्वर्गदर्शन घडवून नरकात धाडले असते..

दुसरा शरद पण तिसऱ्यावर असाच भडकतो.

या तिसऱ्या शरदासारखे लोक आमच्या सारख्यांच्या जातीवर डोळा ठेवून आहेत. यांना काय ठाऊक आमच्या पणजोबांचे हाल.. आजच्या माझ्या स्थितीवर जाऊ नका.. मान्य आहे आमच्याच जातीतले काही भाऊबंद अजून हलाखीत आहेत.. पण ती त्यांची चूक. माझ्याकडे बघा.. जातीच्या शिडीवरून मी वर चढणारच.. माझी आताची स्थिती पाहू नका .. आणि हा जात नको म्हणतोय.. नक्कीच कुणीतरी उच्चवर्णीय असणार. बोलतोय मोठया तोंडाने पण मनात त्याच्या आमच्याबद्दल द्वेष असणार नि असूयाही. जात नको म्हणविणाऱ्या तिसऱ्या शरदाबद्दल राग उफाळून येतो.. पहिल्या शरदाइतकाच द्वेष तो तिसऱ्याचा करतो.

बी. शरद मग गप्प बसून राहतो. तोंड उघडणार कसा? बहुसंख्य समाज लोकशाही चालवतो .. आपल्यासारख्या अशा अल्पसंख्य लोकांनी आपापल्या मर्यादेत राहावे हे समजून .. तितका शहाणपणा अंगी बाणवून आहे तिसरा शरद. किमान जिवंत रहाण्यासाठी गप्प बसणे हाच पर्याय आहे इतके त्याला आता कळू लागलेय.. आडनाव न लावून शांततेने तो सर्वांचा निषेध करतोच आहे.. कित्येकांच्या नकळत ..

## त्याचा राजकीय मॉल

आपला महाराष्ट्र उद्यमशील आहे. उद्यमशील हा शब्द आम्ही तसल्याच उद्यमशील वृत्तपत्रातून शिकलो आहोत हे जाता जाता सांगायला हवे.. तथाकथित नागरी भाषेत यास नस्ते धंदे म्हणून हिणवले जात असेल पण आम्हास उद्यमशील शब्द आवडला. त्यामुळे जुन्या गोष्टी वापरात काढायच्या धोरणानुसार तो जुना शब्दही इथे वापरत आहोत..

तर या प्रगतीशील महाराष्ट्रात उद्यमशील अशा शीलवंतांची कमी नाही. तिकडे टाटा बिर्ला असतील

तर आमचे किर्लोस्कर आहेत.. तिकडे अजून कुणी असतील तर आमचेही अजून कुणी आहेत.. पण कुणी नव्याने स्टार्ट अप.. नवीनतम कल्पनेचा नाविन्यपूर्ण आविष्कार असणारा व्यवसाय सुरू केल्याचे कुणी पाहिले आहे का?

झाले काय की त्यादिवशी नेहमीप्रमाणे घाईघाईने चाललो होतो. आता आम्हाला घाई कसली असणार नेहमी? पण तसे दाखविले नाही तर आमची पत कमी होण्याचा धोका आहे. तर आम्ही चालले असताना भाऊराव भेटले.. तेही आमच्यासारखेच गडबडीत होते.

"काय कुणीकडे?"

"कुणीकडे काय? खास गावाहून आलोया.. त्या पॉलिटिकल मॉलमधे. ग्रांपं ची इलेक्शन डिक्लेर झाली नव्हं का?"

"पॉलिटिकल मॉल? हे काय बुवा प्रकरण?"

"प्रकर्ण? हाय का? तुम्हाला इकडं राहून खबर न्हाय आणि गावागावातून लोकं येतात इकडं.."

आमच्या मागासलेपणाचे आम्हाला खरेच वैषम्य वाटले .. पॉलिटिकल मॉल.. आमच्याच इलाक्यात आणि चालवणारा आमचाच मित्र.. आणि आम्हाला

.. एका वृत्तपत्रकाराला त्याची खबरबातही असू नये?

जितेंद्र जगदाळे.. आमचा कॉलेजातला खास दोस्त. हरहुन्नरी आणि चबढब्या.

'काहीही करेन पण नोकरी नाही.. व्यवसाय .. स्वयंरोजगार .. आज आपल्याला स्वयंरोजगारीत तरूणाईची गरज आहे..'

तो म्हणालेला तेव्हा .. त्यातून तरी त्याच्या राजकीय कलाचा अंदाज आम्हाला तेव्हा यायला हवा होता. पण नाही! याबाबतीत आमचे सारेच आडाखे चुकले.. अगदी त्याच्या 'जितेंद्रियं' मॉलचा ही पत्ता लागू नये इथवर चुकले.. पण ही चूक आम्ही सुधारायचे ठरवले.. आम्ही दैनिक 'सभोवार'चे संपादक .. तेव्हा या मॉलला प्रसिद्धी द्यायची जबाबदारी आमच्यावर आम्ही स्वतःच लादून घेतली..

"संपादक सभोवार बोलतोय.. जितेंद्र जगदाळे आहेत का?"

"बोलतोय .."

इतक्या वर्षांनीही त्याचा आवाज मी ओळखला.. तो कसला ओळखतोय?

'आम्ही आमच्या पेपर साठी तुमच्या नाविन्यपूर्ण मॉलची माहिती घेऊ इच्छितो.."

"कोण? मध्या तू?"

"च्यायला.. जित्या तू ओळखलेस! कमाल आहे.."

"ते ठीक, पण हे संपादक बिंपादक बनायचे नाटक कशाला?"

"नाटक? अरे खऱ्याखुऱ्या पेपराचा खराखुरा संपादक .."

शुक्रवार दुपारची अपॉइंटमेंट घेतली जितेंद्रची.. रीतसर..

'जितेंद्रिय' नावाचा चकाचक मॉल उघडून काही वर्षे झाली. थिएटर काय, फूड कोर्ट काय अगदी गजबजलेला मॉल तो. त्याच्या एका छोट्याशा लक्षातही येणार नाही अशा दरवाजातून जितेंद्र आम्हाला आत घेऊन गेला. समोरची दुनिया वेगळी.. इकडची वेगळी. मॉलच्या आत अजून एक दुमजली इमारत होती.. जितेंद्र मला पाहताच पुढे होत म्हणाला,

"अरे वेलकम मध्या .. काय आहे आज अर्धा दिवस सुटी.. म्हटले आरामात गप्पा मारू. हा खास मॉलही दाखवतो तुला .. आणि काय एकदम संपादक वगैरे .. ऐकत नाही काय .."

"बस काय.. पण तुझी आयडिया एकदम भन्नाट आहे.."

इतक्या रामावतार भाजीवाला आत शिरला..

"रामावतार तुम इधर?"

"अरे, तो माल घेऊन आला असणार.. कितना है?"

"पच्चीस किलो साब.."

"अच्छा है ना?"

"हां साब. एकदम अच्छा. आधा फुटा हुआ, आधा एकदम नरम.. थोडा सडा हुआ भी है .. माल एकदम सडा हुआ अच्छा मिलेगा साब.."

"ठीक.. गाडी लेके आओ.."

पाठोपाठ अजून एक माणूस शिरला..

"लाया साब.."

"अरे महम्मद .. इतना देरीसे? कितना है?"

"पांचसौ.."

"ठीक, जाव.. मैं आता हूं.."

मग आमच्याकडे वळून म्हणाला, "चल, तुला दाखवतो काय ते.. माल पण उतरवून घेतो.. पहिल्यांदा सभा उधळणे सेक्शन पाहू.."

आम्ही गेलो तर रामावतार त्याचा माल उतरवत होता.. बाजूला मोहम्मद अंडी ..

"हे अंडी आणि टोमॅटो सेक्शन. अंडी तशी जास्त पहायला लागत नाहीत. पण टोमॅटो नरमच लागतात .. असा कन्फ्यूज होऊ

नकोस .. अरे सभा उधळायची तर हे सगळे प्रोव्हाइड करावे लागते. आम्ही होलसेल दरात देतो सगळे .."

आम्ही पुढे निघालो ..

"हा शाई विभाग. कुणाच्या अंगावर शाई फेकायची तर ती इकडे.. त्यात आम्ही इनोव्हेशन आणलेय.. म्हणजे लांबूनही अचूक शाई फेकायची असेल तर ह्या स्पेशल हाय स्पीड जेट पिचकाऱ्या आहेत.. त्या आम्ही खास डिझाईन केल्यात.. तुला सांगू लवकरच वुई विल गेट पेटंट फ़ॉर दोज.. आणि हा चप्पल विभाग .. कुणावर चप्पल फेकायची असेल तर अशा जुन्यापुराण्या चपला इथे मिळतील. फेकणारा स्वतःची चांगली चप्पल फेकेल तर जाताना काय अनवाणी जाईल? चपलांचा हार ही हवा असेल तर इथे देतो आम्ही.. मेकिंग चार्जेस मात्र अलग.."

विविध कोल्हापुरी, स्लीपर्स, तुटलेल्या चपला नीट मांडून ठेवलेल्या.. बाजूला चपलांच्या हाराचे सँपल्स लटकावून ठेवलेले..

"चल पुढे दाखवतो.. हा सर्वात महत्त्वाचा .. ह्यूमन रिसोर्स विभाग .. इकडे हवी तशी माणसं प्रोव्हाइड करतो आम्ही.. त्याला संलग्न हा मेकप आणि कपडे विभाग .. काय आहे कुठल्या सभेत कोण असणार ऑडियन्स हे ठरवावे लागते.. कामगार नेता आहे तर सभेत कामगार असणार .. शेतकरी नेता असेल तर शेतकरी..

समजा एखाद्या मध्यमवर्गीय लोकांची सभा आहे.. सभा अटेंड करणारा असो की

ती सभा उधळायचे काँट्रॅक्ट मिळाले तर असो, तसा ऑथेंटिक दिसणाराच प्रेक्षक हवा.. माणसं भाड्याने देतो आम्ही.. वेल ट्रेन्ड .. त्यांना सभेप्रमाणे कपडे नि मेकप करून पाठवतो.. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे इंटलेक्च्युअल ट्रेनिंग .. मॉब मध्ये काही हुशार माणसं आम्ही प्रोव्हाइड करतो.. ती बरोबर हव्या त्या वेळी हवे ते विषय उपस्थित करतात .. त्यासाठी त्यांना ट्रेनिंग देण्यासाठी हा विभाग. इकडे भाषा तज्ञ, राजकीय स्पेशालिस्ट, लेखक वगैरे आमचा इन हाऊस स्टाफ सारे उपलब्ध आहेत.. मेकप आर्टिस्ट पण सिनेमातले आता रिटायर्ड असे आहेत.. तुला सांगू आजवर कुणाला संशय ही नाही आला की हे सारे आम्ही सप्लाय करतो म्हणून.."

जितेंद्रियं मॉल च्या दोन मजल्यांत बरेच काही दडलेले दिसत होते. आम्ही पाहात होतो. जितेंद्र सांगत होता..

"आता हा मोर्चा विभाग. मोर्च्याला लागणारी सर्व सामुग्री.. इन्क्ल्युडिंग माणसं इथून पुरवतो आम्ही. घोषणा देणारे दहा टक्के जण एकूण माणसांपैकी पॅकेजमध्ये फ्री. कुठे राडा करायचा असेल

तर मात्र वेगळा चार्ज लागतो.. म्हणजे गोंधळ घालायचा असेल नुसता तर वेगळा नि ॲक्च्युअल जाळपोळ नि हाणामारीला वेगळा. कारण त्यात लीगल चार्जेस येतात .. आमची वकीलांची वेगळी फौज त्यासाठी आहे.. परत त्यात जो कोणी पकडला जाईल त्याच्या घरची आम्ही जबाबदारी घेतो. स्पेशल इन्शुरन्सचा हप्ता असतो त्यासाठी आमच्या रजिस्टर्ड माणसांचा. त्यामुळे कोणी कोर्टबाजीत अडकला तरी पुढे आम्ही सोडवणार याची खात्री असते.. त्यामुळे होतं काय की आमची माणसं मन लावून काम करतात.. आणखीन एक.. जाळपोळ करायला लागणारे सामानही आम्ही पुरवतो.. जुने टायर्स, रॉकेल, पेट्रोल  वगैरे. बस वगैरे जाळायची असेल तर मात्र कमीतकमी दोन दिवस आधी बुकिंग लागते. ती बसही आम्ही पुरवतो. ए टू झेड रिक्वायरमेंट पूर्ण झाल्याच पाहिजेत .. धरणे धरून बसायलाही माणसं पुरवतो नि उपोषणाला बसणारी देखील. गंमत म्हणजे उपोषणाचे दोनतीन प्रकार आहेत. एक तर उपोषणाला मुख्य माणूस पार्टीचा असावा लागतो. पण एकटा बसून काय इंप्रेशन पडणार म्हणून आगे मागे आमची माणसं बसतात. त्यात मग एकासारखी एक दिसणारी बसवावी लागतात. आठ तासांची शिफ्ट.. एक गेला की त्याच्यासारखा दिसणारा दुसरा बसतो. त्यातले कोणी उपोषणाने आजारी पडले तर चालत नाही. मात्र हल्लीच एका उपोषणाला तर खरोखरीच एकाला आजारी पडण्याचा अभिनय करावा लागला

होता.. अभिनय आणि राजकारणाचा जवळून संबंध आहे हे मी तुला सांगायला नकोच.. त्यामुळे अभिनय आणि नाटक उपविभाग ही आमच्याकडे आहे. रिटायर्ड नाट्यशास्त्राचे प्राध्यापक सांभाळतात तो."

आम्ही आ वासून पाहात नि ऐकत होतो ..

"आता पुढे जाऊ.. हा सभा मंडप विभाग. एकदा ऑर्डर मिळाली की ग्राऊंड बुकिंग पासून सगळी अरेंजमेंट करून मिळते इथे. इथे फर्स्ट कम फर्स्ट बेसिस वर काम चालते. कुठलीही पार्टी व्यर्ज नाही आम्हाला आणि कोणालाही आम्ही झुकते माप देत नाही. म्हणून मार्केटमध्ये आमची इमेज चांगली आहे. सगळयात महत्त्वाचे आम्ही इकडे श्रोते पुरवतो. दर माणशी दर तासाला दर फिक्स. नेता मुद्दाम उशीरा येणार असेल तर वेटिंग चार्जेस अलग. टाळया वाजवणे, घोषणा देणे यांच्यासाठी स्पेशालिस्ट स्पेक्टॅटर पॅकेजेस आहेत. त्यांना आमचा ट्रेनिंग विभाग तयार करतो. दुसऱ्या मजल्यावर दाखवेन तुला ते. पण सभा अरेंजमेंट हा सगळयात सोपा विभाग बाकीच्यांच्या तुलनेत. हवे असतील तर मुख्य नेत्याआधी बोलणारे वेळ भरून काढणारे वक्तेही पुरवतो आम्ही. किंवा पार्टी जी असेल त्यांना तयार भाषणे बनवून देतो आम्ही. आता हे बघ, ये इकडे, इकडे झेंडे, बॅनर्स, टोप्या, टीशर्ट, डोक्याच्या पट्ट्या .. पोस्टर्स आणि इतर लागेल तशी सामग्री प्रिंट करतो आम्ही.

बघशीलच तू.. सगळ्या पार्टीजच्या ऑर्डर आहेत आमच्याकडे. इथेपण नो फेव्हरिंग एनी वन.."

"हे नो फेव्हरिंग थोडं कठीण असेल नाही? सत्तेवरचे प्रेशर नाही आणत?"

"हुं.. पण त्यांना आता कळलंय.. आय वोन्ट बज्.. काय आहे, आज विरोधात आहे तो उद्या सत्तेत असू शकतो.. आज कुणाच्या खिजगणतीत नाही .. तो उद्या कुठल्या अधिकार पदावर असू शकतो. लोकशाही आहे ही. आम्हाला सारे समान .. इनफॅक्ट मी अंडरटेकिंगच साइन करून घेतो डीलच्या आधी.. त्यात सारी कलमे आहेत.. दाखवेन तुला ऑफिसात गेलो की.. चल पुढे जाऊ.."

आम्ही एका लायब्ररी वजा खोलीत शिरलो..

"हा विभाग आहे ना त्यात खूप सारी पुस्तके आणि कॉम्प्युटर विभाग आहे. त्यात आमची स्पेशालिस्ट मंडळी काम करतात. कुण्या पार्टीकडून प्रश्न आले, जुनी माहिती हवी म्हणून एन्क्वायरीज आल्या की आम्ही सारे रेफरन्सेस काढून देतो. त्यासाठी इतिहासाचे, राज्यशास्त्राचे प्रोफेसर आहेत इथे नोकरीला. आणि आमचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे आमच्याकडे विविध भाषेचे

तज्ञ अव्हेलेबल आहेत. काहीतर प्रसिद्ध लेखक आहेत. ते भाषणं तयार करून देतात हव्या त्या भाषेत. तुला तर ठाऊक आहे आपल्याकडे कोसाकोसावर बोली बदलताता. तेव्हा अगदी कानाकोपऱ्यातल्या बोली भाषेतही भाषणं बनवू शकतो आम्ही. तेवढा रिसर्च आणि पेड स्टाफ आहे आमच्याकडे.."

"वा! खूप विचार केलेला दिसतोयस.."

"करावाच लागतो रे. संसद किंवा विधानसभेतील भाषणं वेगळी .. जाहीर सभेतील वेगळी.. निवडणूक प्रचारातील वेगळी.. दंगल घडवून आणायची असेल तर एक किंवा ती शमवायची असेल तर वेगळी .. पक्षश्रेष्ठींना सूचक इशारा देणारी वेगळी, ॲक्च्युअल बंडखोरी करण्याची घोषणा करणारी वेगळी.. धडाकेबाज नेतृत्व प्रस्थापित करायचे असेल तर.. आपली प्रतिमा संवर्धन करणारी वेगळी. राजकारण म्हणजे शेवटी काय? जो जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त वेळ जास्तीत जास्त पटवून जास्तीत जास्त हिप्नोटाइज्ड अवस्थेत ठेवू शकतो तो लोकप्रिय नेता. तो घडवण्यासाठी लागणारे सारे आम्ही पुरवतो. बाकी त्याचे स्वतःचे प्रयत्न .. ते भोरे पाटील सरपंच झाले उंबरखेडा गावचे आता .. तिकडची उत्स्फूर्त दंगल इकडे पंधरा दिवस आधीच प्लॅन केलेली आम्ही. माणूस हुशार. बरोबर सारे घडवून आणले नि साधा कार्यकर्ता आज सरपंच झाला. स्वतःच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे.. म्हणून आम्ही ग्यारंटी देत नाही.. डा ॅक्टर कुठे गँरंटी

देतात? तसेच हे आहे.. पण वर्ड ऑफ माऊथवर सारे चालते.. बाहेरच्या चकाचक मॉल मागे असा पॉलिटिकल मॉल आहे हे कुणाला माहिती आहे? फक्त ज्यांना त्याची गरज पडते त्यांनाच.."

"खरंय.."

"हा साहित्य विभाग.. इथे कवी आणि लेखक आहेत आमचे खास. हा कविता उपविभाग .. त्यात साधे सरळ कवी आहेत आमच्या पे रोल वर. ते घोषणा बनवतात. वेगवेगळ्या विषयांवरच्या. बाकी मोठे प्रथितयश कवी नि लेखक ही आहेत. ते इमेज बिल्डिंग साठी एखाद्या नेत्याच्या नावावर कविता, अभ्यासपूर्ण लेख, ललित लेख वगैरे लिहितात.. आमच्या एका लेखकानी तर कमीत कमी पाच जणांची आत्मचरित्रे लिहून दिलीत आजवर.. ती ही गाजताहेत..

आता पुढे हा कार्यकर्ते विभाग. इथे कोणाला हवे तितके नि हवे तसे कार्यकर्ते पुरवतो आम्ही. साधे म्हणजे रोजंदारीवर.. आज इकडे उद्या तिकडे.. कुठेही जाणारे.. तर निष्ठावंत हवे असतील तर थोडा जास्त खर्च येतो.. म्हणजे ते ठरलेला काळ त्या नेत्याबरोबरच राहणार. त्यांना दुसरीकडे नाही पाठवत. नेत्यांना पण त्यामुळे सिक्युरिटी राहते. म्हणजे बघ, कित्येकदा कार्यकर्त्यांना स्वतःच्या महत्वाकांक्षा असतात. कोणी एकीकडून दुसरीकडे फुटतो. कित्येक जणांना स्वतःलाच पुढारीपण हवे असते.. किती दिवस आम्ही

नुसत्या सतरंज्या उचलणार म्हणत बंडखोरी करणारे ही असतात. एकदा निष्ठावान कार्यकर्ते पॅकेज घेतले की हा प्रॉब्लेम नेहमीसाठी सुटलाच. परत आम्ही दरवर्षी काँट्रॅक्ट रिन्यू करतो.. म्हणजे कार्यकर्ता वर्षानुवर्षे टिकून राहू शकतो. त्याचा पगार आमच्याकडून पॅकेजमध्ये समाविष्ट असतो. अशांच्या जिवावर नेता बिनघोर राहू शकतो.."

"वा! भन्नाट आहे.."

"तुला सांगतो, एका जितेंद्रिय मॉलने जितक्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यात ना तितक्या मनरेगाने पण नसतील दिल्या.. विचार कर.. इतक्या पार्टीज.. त्यांचे कार्यक्रम .."

"खरंय तुझं जितेंद्र .."

आम्ही अचंब्याने सारे पाहात होतो.. लिफ्ट मधून वर आलो..

"हा दुसरा मजला म्हणजे आमचा खास आहे."

"इथे तर क्लासरूम दिसताहेत .."

"तेच. इकडे आम्ही लेक्चर्स घेतो. ज्यांना आपली राजकीय कारकीर्द घडवायची किंवा पुढे आणायची आहे त्यांचे ट्रेनिंग होते इथे. उदाहरण घ्यायचे तर.. समज एखादा सरपंच आहे. त्याने गावात कामे केलीत किंवा नाही यापेक्षा त्याला कामे केलीत हे सगळ्यांना दाखवून कसे द्यावे .. प्रोजेक्शन कसे करावे याचे ट्रेनिंग

द्यावे लागेल. त्यात चमकदार भाषणे ठोकणे, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विषयांवर अभ्यासपूर्ण वाटतील असे विचार विविध व्यासपीठांवर मांडणे, राजकीय समज, समाजकारणातील समज इत्यादींमध्ये वाढ घडवून आणणे .. याशिवाय आम्ही विचारतो पार्टीला, त्यांची प्रतिमा कशी घडवायची आहे.. काहींना जहाल तर काहींना मवाळ, उदारमतवादी प्रतिमा हवी असते. काहींना आपली आधीची प्रतिमा बदलायची असते. लढाऊ नेता बनायचे तर भाषणात करायचे बदल वगैरे आमचे स्ट्रॅटेजिस्ट शिकवतात इथे. घराणेशाहीची चर्चा खूप होते, आमच्याकडे राज्यातल्या पंधरा मोठ्या घराण्यातली वीस मुलं सध्या शिकताहेत.. भाषणं कुठे कशी ठोकावीत, कुठे कशा समस्या निर्माण कराव्यात .. सोप्या समस्या कठीण भासवून सोडवून आपले नेतृत्व कसे प्रस्थापित करावे वगैरे कितीतरी गोष्टी आम्ही नव्या पिढीला शिकवतो. नसलेल्या समस्या किंवा ज्याचे उत्तर आपल्याला ठाऊक आहे अशा समस्या निर्माण करून सोडवणे यावर नव्या पिढीचे नेतृत्व एस्टॅब्लिश करण्यात हातखंडा आहे आमचा.. स्पेशलायझेन म्हण एक प्रकारचे. याशिवाय इमेज बिल्डिंग साठी पेपरात अभ्यासपूर्ण लिखाण छापून आणणे, इंटरनेटवरून आपला प्रचार करत राहणे, विरोधकांची बदनामी करून आपली प्रतिमा उंचावणे इत्यादीची पॅकजेस ही आम्ही देतो. त्यात आठवड्यात तीनदा मोठया अभिनेत्याकडून ॲक्टिंगचे धडे पण इन्क्ल्यूड करतो आम्ही कॉम्प्लिमेंटरी.

याशिवाय या मजल्यावर आमच्या लढाऊ बाण्याच्या माणसांचे घोषणा देण्याचे ट्रेनिंग, आक्रमक देहबोलीचे ट्रेनिंग .. वगैरे सगळे इथे होते.."

"छानच आहे ही कल्पना .."

"हो ना! सगळ्यात हिट आहे हा विभाग ..

आता पुढे बघ.. हा सर्व्हे विभाग. इथे आम्ही सर्व प्रकारचे सर्व्हे करतो. म्हणजे निवडणूक पूर्व, निवडणूक पश्चात. तसेच एखाद्या पार्टीला हवे ते निकाल प्रेडिक्ट करणारे ऑथेंटिक वाटतील असे सर्व्हेही आम्ही करून देतो. त्यासाठी हा सर्व्हे मॉडिफिकेशन विभाग. आमच्या स्टॅटिस्टिक्स डिपार्टमेंट खाली हा येतो.."

"स्टॅटिस्टिक्स डिपार्टमेंट?"

"यस्स. स्टॅटिस्टिकचे प्रोफेसर अटॅच्ड आहेत.. डाटा कंपायलिंग, ॲनालिसिस, प्रेझेंटेशन आणि मॉडिफिकेशन असे उपविभाग आहेत. तुला म्हणून सांगतो.. डाटा फॅब्रिकेशनचा खूप मोठा विभाग आहे पण तो सीक्रेट आहे. त्यात बिना सर्व्हे हवा तो डाटा आम्ही पुरवतो.. त्यासाठी अत्यंत हुशार स्टॅटिस्टिशियन्सची गरज लागते.. शेवटी पॉलिटिक्स प्रपोगंड्यावर चालते.. अभिनय महत्त्वाचा .. लोकांच्या हृदयात जागा बनवून घेतली की प्रत्यक्ष काम तितके महत्त्वाचे नाही .. ही एक प्रोसेस आहे.. कोणाची किती महत्वाकांक्षा आणि कॅपॅबिलिटी यावर सारे अवलंबून आहे.. पण

त्याला रियल एफर्ट्सची जोड लागते ती आम्ही पुरवतो.. म्हणून म्हणालो ना, हा दुसरा मजला सर्वात महत्त्वाचा. नेतृत्व घडवण्याची शाळा म्हण एक प्रकारे .."

आम्ही उतरून खाली आलो जितेंद्रच्या केबिनमध्ये. आम्ही खरे सांगू तर भारावलो होतो. इतकी नवीन .. नाविन्यपूर्ण कल्पना आणि तिचा हा असा आविष्कार .. बोलायला शब्द नव्हते ..

तरीही विचारायचे म्हणून म्हणालो,

"एवढया साऱ्या राजकीय लोकांबरोबर काम.. तुला भीती नाही वाटत?"

"अरे, प्रोटेक्शन इतरांना देता येते.. ते स्वतःला घेता येतंच ना? आणि एक.. इमेज महत्त्वाची. मार्केटमध्ये मी आमची एक इमेज बनवलीय.. इम्पार्शियल असण्याची .. आता सगळ्या पार्टीज ना ठाऊक आहे.. त्यामुळे नो एन्मिटी.. सगळेच आपले दोस्त ..

आधी आम्ही एखाद्या पार्टीशी लॉंग टर्म कॉंट्रॅक्ट करायचो.. आता ते बंद केले आम्ही. कारण मग बाकीच्यांचा मार्ग बंद होतो. लोकशाहीत हे ठीक नाही, नाही का? मला स्वतःला राजकीय मत नाही .. डावे पण माझे, उजवे पण माझे.. पुढारलेले माझे नि दलितही माझे .. कुठलाही धर्म व्यर्ज नाही.. कोणतीही पार्टी व्यर्ज नाही. सर्वांना सारखीच मदत आणि सर्वांपासून सारखेच अंतर.. तुला

सांगितले होते ना तसे हे अंडरटेकिंग सही करून घेतो आम्ही.. फर्स्ट कम फर्स्ट सर्व्हड्.. आणि रिझल्टची कसलीच गॅरंटी नाही .. पण प्रयत्न मात्र शंभर टक्के .. आणि लोकांना माहिती झालीय.. इथे कोणतीच पार्टी फेव्हरीट नाही.. सत्ताधारी ही नाही नि विरोधी ही नाही. ॲब्सोल्यूटली इम्पार्शियल.. जो पहिला येईल त्याचे काम .."

"आणि एकच सभा अरेंज करायचे काँट्रॅक्ट मिळाले नि नंतर उधळायचे.."

"फर्स्ट कम फर्स्ट.. अरेंज करायचे ठरवले तर उधळायचा काँट्रॅक्ट नाही घेत मी .. यात अजिबात बेइमानी नाही. पण दुसरी कोणी उधळणारा असेल तर प्रोटेक्शनचे पॅकेजेस आहेत आमच्याकडे.. पण अरेंजिंग पार्टी हॅज टू डिक्लेअर द थ्रेट ॲंड पे अस.. पुढचे आम्ही पाहून घेतो.. सेम वे स्वतःला ही मी प्रोटेक्ट करून ठेवतो.. थोडी रिस्क आहे पण ती कशात नाही? नुसता रस्ता ओलांडून जायचे तर त्यातही रिस्क असतेच की नाही?"

"बापरे! हे कठीण आहे!"

"कठीण आहे पण करावे लागते रे.. सगळीकडे काँटॅक्ट्स लागतात स्पेशली पोलिसांत वगैरे. पण हळूहळू गेम समजायला लागतो.. पार्टीज नाऊ रिलाय ऑन अस.. एकदा पेमेंट केले की जनरली नो हेडेक.."

"हे अगदीच आऊट ऑफ द वर्ल्ड आहे बाबा .."

"थ्यांक्स.. तू स्वतः पत्रकार आहेस.. खास दोस्त म्हणून सगळे दाखवले .. छापू मात्र नकोस .. तुला हे सांगायला नकोच.."

"खरंय तुझं.."

"किंवा नाहीतर असे कर..  एखाद्या विनोदी लेखाचा विषय बनवून लिही.. दिवाळी येतेय जवळ.. छापून टाक.."

"छान कल्पना.."

"की लिहून देऊ तुला? लेखकांची कमी नाही इथे.. छाप तुझ्या नावाने .."

आम्ही म्हणालो, "नको.. तितकी ताकद आहे लेखणीत.. पत्रकार झाला म्हणून त्याने विनोदी लिहू नये असे थोडीच आहे? लिहीन मी!"

तर हीच ती जितेंद्रिय मॉलची गोष्ट. मॉल नि त्याच्या मालकाचे नाव काल्पनिक .. बाकी सगळे सत्य!

# शंकासुरांचा वध!

**ना. भगवानदास मोहिते पाटील**

**राज्यमंत्री, महसूल खाते..**

.. साहेबांचा शपथविधी कालच पार पडला.. सरपंच पदावरून आमदार.. आमदारकीतून राज्यमंत्री. प्रगतीपथावरील महाराष्ट्रात ते ही तसेच प्रगतीशील आहेत..

.. साहेब म्हणजे सार्वभौम. सत्ताधीश. साहेबांनी या राजकारणात येण्याआधी खूप अभ्यास केला. राजकारण आणि अभ्यास .. लोकांचे खूप गैरसमज असतात.

त्यांना वाटते या राजकारण्यांचा सारा वेळ कट कारस्थानात जातो. अर्जुनाला माशाचा डोळा दिसावा तशी त्यांना फक्त

सत्तापदाची खुर्ची दिसते.. दिसतेच. पण त्यात गैर ते काय? कोणत्या क्षेत्रातल्या लोकांना त्या क्षेत्रातले उच्चपद खुणावत नाही? अगदी राजकारणाच्या क्षेत्राशी समांतर गँगवाले घ्या. गल्लीतल्या दादाला पुढे मागे अजून मोठा नामचीन गुंड बनायची लालसा असते की नाही? डाॅन बनणे ही महत्वाकांक्षा असतेच की नाही? किती वर्षे आपल्याच गल्लीत शेर बनून राहणार तो? चाकू सुरीवरून ॲडवान्स्ड पिस्तुलापर्यंत प्रगती करण्याची इच्छा असणारच त्याची. ह्याहीपेक्षा साधी उदाहरणे घेऊ.. लोक मेहनत का करतात? त्या त्या क्षेत्रात वर येण्यासाठी. प्रत्येकास अशी महत्वाकांक्षा असते. गायकास रफी..किशोर..मुकेश व्हायचे तर गायिकेस लता.. आशा. क्रिकेटरास धोनी नाहीतर तेंडुलकर. म्हणजे उच्चपदाची आस कोणाची जात नाही. सिनेमात कुणी असेल तर त्यालाही बनायचे नंबर वन. तर साहेब कसे अपवाद असणार? ज्या सत्ताकारणात त्यांनी झोकून दिले त्यात नंबर वनच्या खुर्चीचे ध्येय ठेवावे हे नैसर्गिक आहे.. फक्त त्यास कुणी सत्तेची हाव म्हणतात कुणी सत्तेची भूक. असो. मानवी स्वभाव असा विचित्र आहे. स्वतः सोडून इतरांकडे बोटे दाखवणे आवडते त्यास. म्हणजे गल्लीबोळातील कुणी कारकून उठतो नि वरच्याकडे बोट दाखवून म्हणतो.. किती भ्रष्टाचारी..! हाच सामान्य इसम आपल्या ऑफिसात बसला की टेबलाखालून शंभराच्या नोटा घेताना शेंबूड आपल्या नाका हे विसरतो.. आता कारकून आणि खुर्चीवरील

अधिकार पदस्थ.. दोघांच्या आपापल्या किमतीत फरक असणारच की नाही? तर ते असो.

तर सांगत होतो साहेबांच्या अभ्यासाबद्दल. राजकारणात येण्याआधीपासून साहेबांची नि आमची जिगरी दोस्ती. अर्थात आम्ही फक्त साहेबांच्या बाजूस बसून मम म्हणायचो. कधी आपले मत द्यायचोही. पण साहेबांचे पाणी काही वेगळेच हे आम्ही तेव्हाच जोखले होते. साहेब उपलब्ध संधींचा अभ्यास करायचे. साहेब ग्रामपंचायतीत पोहोचले.. सरपंच झाले.. अशा एकेका मुक्कामावर पोहोचले की तेथवर कसे पोहोचलो याचाही विचार करायचे.. तसेच आता..

साहेबांनी मंत्रीपदाची शपथ घेतली नि काल आम्ही आमच्या या यशाची मीमांसा करत बसलेलो. सांगायचे म्हणजे साहेबांइतके स्वावलंबी दुसरे कुणी नसेल.. साहेब म्हणतात, राजकारणात कुणी कुणाचा काहीही नसतो.. मित्र किंवा शत्रूही! म्हणून सारे काही स्वतःचेच स्वतःला करावे लागते. आजूबाजूस कार्यकर्त्यांची फौज असते. साहेबांचा हुकूम झेलायला तत्पर लोक असतात. अगदी स्वतःस निष्ठावंत म्हणवून घेणारे अनुयायी आहेत.. पण विश्वास कोणावर ठेवावा? साहेब म्हणतात अगदी आरशातल्या स्वत:च्या प्रतिमेवरही विश्वास ठेवता येत नाही .. तेव्हा त्यामुळे ही मीमांसा

करणे ही स्वतःवरच आले.. अर्थात यास आमचा एक अपवाद. आम्ही म्हणजे साहेबांचे सहावे इंद्रिय!

तर ती मीमांसा.. म्हणजे साहेब यशाचे पैलू पडताळून पाहतात.. म्हणजे पुढच्या वेळी अजून पुढे जाण्यास त्याचा फायदा घेता येतो. साहेब म्हणतात, कुणी म्हटले आहे की माणूस चुकांतून शिकतो.. ते ठीक, पण माणसाने यशातूनही शिकायलाच हवे.. म्हणजे आम्ही इथवर का आणि कसे पोहोचलो ते आम्हास माहिती झाले की अजून पुढे जाण्यास मदत होईल.. आकांक्षापुढती गगन ठेंगणे म्हणतात.. कालचा सरपंच.. आजचा राज्यमंत्री .. उद्याचा कॅबिनेट .. नंतर मुख्यमंत्री पदाची खुर्ची.. मग दिल्ली दूर नाही ..

आमचे विरामगाव म्हणजे साहेबांचा सुभा. सगळ्या गावाची प्रगती साहेबांनी घडवून आणली. म्हणजे अगदी दवाखान्यापासून ते टेलिफोन लायनी.. मोठाली दुकाने ते सिनेमा थिएटरं. पाइप लायनीतून पाणी.. अजून काहीबाही. दहा पंधरा वर्षांपूर्वी गावात काहीच नव्हते यापैकी. साहेबांनी विचार केला .. गावातून पुढे यायचे तर गावही पुढे यावयास हवे. प्रगतीसाठी संधी हवी तर गाव डोळ्यांत भरावयास हवे.. उदाहरणच घ्यायचे तर.. मातीचे रस्ते की डांबरी सडका .. दुसऱ्यात संधी जास्त. गावात कुणी आला की

प्रथम रस्तेच पाहातो. काळयाभोर सडकेकडे पाहाताच त्याला गावच्या प्रगतीचा अंदाज येतो.. आम्ही दरवर्षी त्यांचे नूतनीकरण करवतो .. तसेच सगळे पाण्याच्या लायनी .. दवाखाने आणि दुकानांचे ही तसेच. म्हणजे एकूण प्रगतीच्या आराखड्यात ही सारी कामे बसवणे महत्त्वाचे. दृष्य प्रगती मागे स्वतःची अदृष्य प्रगती करवून घेणे.. हा साहेबांच्या आजवरच्या यशस्वी राजकारणाचा मूलमंत्र. त्यात मग हेवेदावे आले.. कुरघोड्या आल्या.. विरोध करणाऱ्यास गप्प करणे नि गप्प बसवणे आले.. साम दाम दंड भेद.. चाणक्य नीती आली.. आपल्या पुरातन काळात राजनीतीचे धडे देऊन गेलेल्या चाणक्याचे नीतीचे धडे गिरवणे आले.. साहेबांना आपल्या भूतकाळाचा प्रखर अभिमान. साहेब म्हणतात, हा अभिमान महत्त्वाचा. म्हणजे कुणी त्या वारश्याची चिकित्सा करू नये याबद्दल साहेब आग्रही असतात. आपल्या पूर्वजांहून आपण शहाणे आहोत का? त्यांच्या शिकवणुकीची चिकित्सा करणे म्हणजे आपल्याला आपल्या संस्कृतीचा अभिमान नसणे. हे प्रश्न न विचारणे साहेबांच्या स्वभावात त्यातूनच भिनले असावे .. साहेबांना देखील कुणी प्रश्न विचारलेले आवडत नाही .. तेव्हाही आणि आताही. तर आम्ही दोघांनी यशाचा अभ्यास केला.. त्याचा संबंध या प्रश्नकर्त्यांशीच आहे.. आणि आज त्यातील एक अत्यंत महत्वाच्या धड्याबद्दल इथे सांगतो आहोत आम्ही.. तो म्हणजे हे विविध शंकाकुशंका काढणारे नि प्रश्न विचारणारे.. मिडियातले

शंकासुर आणि साहेबांच्या प्रगतीस कारण आहे तो त्यांनी केलेला या शंकासुरांचा वध!

आम्ही सांगितले आधी.. तसे आमचे गाव प्रगती करतेय.. अगदी कुणाच्या नजरेत भरण्याबरोबर नजरेत येईल अशी! साहेबांचा कारभारच असा.. गतिमान. सगळीकडे धडक अॅक्शन. गावात रस्ते नसतील तर दर वर्षी त्याचे नविनीकरण कसे होणार .. ते नसेल तर काँट्रॅक्टर पाया पडावयास कसे येणार? दुकानांच्या परवान्याचे ही तसेच. साहेबांचा स्थानिक कारभार आपल्याच नियमांनी चालणार. इकडे कायदाही साहेबांचा.. साहेबच पोलिस नि साहेबच न्यायाधीश. साहेबांबरोबर राहून आमच्या लक्षात आलेली गोष्ट एक.. कामाचा वेग महत्त्वाचा. सरकारी काम नि वर्षानुवर्षे थांब हे इतर ठिकाणी ठीक पण आमच्या सुभ्यात एक घाव दोन तुकडे. दफ्तर दिरंगाई साहेबांना पटत नाही नि पचतही नाही. कुठलाही निर्णय साहेब खूप विचारांती घेत नाहीत. त्या विचारातील कालापव्ययात विचारांचा क्षय ठरलेला. वर होणारी दिरंगाई. गावाचे कल्याण झटपट व्हायचे तर निर्णय झटपट हवेत.. एकच उदाहरण द्यावे तर एके ठिकाणी शेतजमिनीवर बांधून काढलेला शॉपिंग कॉम्प्लेक्स. काही शेतकऱ्यांना जमीन गमवावी लागली पण त्याच दुकानांत त्यांच्यासकट कित्येकांसाठी रोजगार निर्माण झाले.. वर झकपकीत दुकानामुळे गावाची कळकट प्रतिमा

बदलता आली ते वेगळेच. काही शेतकऱ्यांनी निर्णयाविरूद्ध बोंबाबोंब केली.. त्यातील एक दोघांना बिचाऱ्यांना त्यात मृत्यू ही आला. पण आमचा तो शॉपिंग कॉँप्लेक्स त्यांच्या बलिदानाला स्मरून दिमाखात उभा राहिला.. बेभरवशाच्या शेतीऐवजी दुकानात राबणारे पगारी शेतकरी.. साहेब म्हणतात, विकास म्हणजे अजून दुसरा काय असतो? कामाच्या अशा धडक पद्धतीने गावाचे भले होते .. गावकऱ्यांचे प्रेम मिळते.. साहेबांची लोकप्रियता वाढत राहते.. गावाचा विकास केल्याबद्दल गावकरी कृतज्ञ राहतात .. साहेबांची राजकीय नि आर्थिक शक्ती वर्धिष्णू होत राहते.. साहेब म्हणतात..

.. आणि इथेच या शंकासुराचा जन्म होतो..

आपल्या लोकशाहीचा हा शाप आहे.. साहेब अनभिषिक्त सम्राट आमच्या गावाचे. पण तरीही निवडणुका कोणास चुकल्यात? आम्हीही त्या लढवतो. जिंकणार आम्हीच हे ठाऊक असूनही. लोकशाहीत ह्या निवडणुका म्हणजे पैशाचे काम. पाण्यासारखा पैसा वाहवावा तेव्हा पाच वर्षाची सोय होते.. अगदी जिंकण्याची खात्री असूनही साहेबही अपवाद नाहीत त्यास. वेगवेगळ्या विकास कामांची गंगा गावातून वाहताना साहेबांच्या घरी देखील थोडे पाणी देऊन जाते. लक्ष्मी पाणी भरते म्हणतात..

तो वाक्प्रचार यातूनच आला असावा की काय? पण मुद्दा शंकासुरांचा आहे.. साहेबांच्या विविध योजनांची चिरफाड करावयास त्यांचा जन्म झाला की काय.. आम्हाला एकदा शंका येऊ लागली.. साहेब म्हणाले, खरेय. एखाद्याचे भले पाहवत नाही या लोकांना ..

गाव खूप मोठे नाही आमचे. तिथे ह्या कानाची त्या कानाला कुणकुण लगेच लागते. विरामगाव आवाज, विराम टाइम्स, चौफेर, अविराम.. अशा नावाची वृत्तपत्रे निघतात. साहेबांनी सुरूवात केली राजकीय कारकीर्दीस तेव्हा त्यांच्या पत्रकारांस अभिमानाने बरोबर घेऊन निघायचे. साहेबांच्या कौतुकाच्या बातम्या छापून यायच्या. त्यांची छबी दिसायची पहिल्या पानावर नित्य. काही वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. मग या पेपरवाल्यांच्या अंगात काय आले कुणास ठाऊक.. साहेबांच्याच व्यवहारांबद्दल बातम्या छापू लागले. सुरूवात केली ती अविराम ने.. पुढे अजून एकाने. पेपराचा खप वाढवायचा आणि काय.. तशी आमची यंत्रणा सज्ज होती. टाइम्सवाला रातोरात गडगंज श्रीमंत झाला.. चौफेरला सगळ्या सरकारी जाहिरातींचा शब्द मिळाला.. अविराम मात्र न थांबता लिहीत होता.. त्याला विराम देणे गरजेचे होते.. पण देवाघरी न्याय आहे.. अविरामच्या छापखान्यास शॉर्टसर्किटने आग लागली.. नि त्याच्या हरकतींना विराम मिळाला ..

आम्ही यातून शिकलो.. धडाच घेतला म्हणा ना. एकतर हे पेपरवाले कुणाचे नसतात. निर्भीडपणा नि निर्भयतेच्या नावाखाली काहीही कधीही छापतात.. कुठून कुठून पुरावे गोळा करतात स्वतःला डिटेक्टिव्ह समजून.. त्यांची तोंडे बंद करण्यात आपला अमूल्य वेळ वाया घालवणे.. नाही आम्हाला मंजूर. गावाचा विकास अशाने मागे ढकलला जाईल. त्यातल्या त्यात काही पेपरवाले समजूतदार असतात .. पण कधी कुणी आपल्या पत्रकार बाण्याचा अभिमान वाटून उलटेल सांगता येत नाही. असतात असे काही निद्रिस्त ज्वालामुखी! म्हणून साहेबांनी निर्णय घेऊन टाकला .. पत्रकारांशी दोस्ती म्हणजे सापास दूध पाजणे.. ही गोष्ट अर्थात काही वर्षांपूर्वीची. साहेब एखादा अपवाद वगळता सगळ्यांशी फटकून वागू लागले. कुणाला आपली बातमी देणे नाही नि कुणाशी काही घेणे देणे नाही. एखाद दुसरा निष्ठावंत पगारी पत्रकार पदरी बाळगला की सारी सोय होते.. त्यात ह्या स्वयंघोषित निर्भीडांचा ससेमिरा कशाला? अर्थात तेव्हा आजचे हे टीव्ही चॅनेल्स जास्त नव्हते. पत्रकार ही आपल्या सत्यान्वेषणाच्या नशेत असायचे तेव्हा. पुढे काळ बदलला. चॅनेल्सची बोंडूकं घेऊन क्षणोक्षणी बातम्यांचा रतीब घालण्याचे दिवस आले.. बातम्या देण्याबरोबर बातम्या घडवण्याचीही जबाबदारी त्यांच्यावर आली हळूहळू. स्थानिक पातळीवर केबल टीव्हीचे चमको पत्रकार निर्माण झाले.. काम थोडे खार्चिक झाले.. पण गावाच्या विकासाच्या सकारात्मक

बातम्या दाखवण्यासाठी साहेबांनी एक चॅनेलच विकत घेऊन टाकला. एकतरी पत्रकार नि एकतरी चॅनेल आपल्या पदरी बाळगणे महत्त्वाचे हे आम्ही शिकलो म्हणाना.. त्यामुळे आमच्या कामाची माहिती आणि महती चोहिकडे पसरवता येते..

थोडक्यात काय तर, साहेबांना कारकीर्दीच्या सुरूवातीसच ध्यानात आले.. प्रश्न विचारणारे, शंकाकुशंका काढणारे हे शंकासुर.. हेच लोकशाहीचा आडोसा घेऊन समाजाची दिशाभूल करणारे खरे असुर. ते विकासात अडथळे आणतात. सुसाट प्रगतीच्या गाडीचा ब्रेक असणारे हे शंकासुर.. त्यांचा रीतसर बंदोबस्त करून ठेवल्यानेच आज इथवर आलेत. साहेबांना पुराणकालीन संस्कृतीचा कोण अभिमान! आपल्या विविध देवादिकांचा महिमा वर्णताना त्यांना कोणाना कोणा दैत्याचा .. असुराचा वध करावा लागे.. तसा ह्या शंकासुराचा वध करून साहेब पुढे आले आहेत. वध म्हणजे ..

.. पत्रकारांचे आयुष्य खडतर याची आम्हास कल्पना आहे. धकाधकीच्या आयुष्यात घडणाऱ्या अपघातांत कित्येकांना अकाली प्राण गमवावे लागले आहेत .. त्या बिचाऱ्यांचा अपवाद. पण वध होण्यास दरवेळी यमसदनच पहावे लागण्याची गरज नाही.. म्हणजे तो वध काहीवेळेस लाक्षणिक अर्थाने ही असेल.. म्हणजे

सदा माइकचे बोंडूक घेऊन प्रश्न विचारणाऱ्यांची तोंडे बंद करणे वा आपल्याला हवी तशी, हवी तेव्हा, हवी तितकी उघडवणे.. हा लाक्षणिक वध.. तो जास्त परिणामकारक. कारण त्यातूनच आपली विकासकामांची जंत्री हवी तशी आपल्या जनतेपर्यंत पोहोचवता येते.. आता तर तंत्रज्ञानाने सारेच सोपे करून ठेवलेय.. सोशल मिडिया नावाची सोय झालीय.. हवा तो मजकूर हवा तेव्हा हवा तसा पसरवण्याची सोय ही विकासासाठी क्रांती म्हणावी. आजच्या माहितीयुगाचा हा फायदा. साहेबांना तो झटक्यात ध्यानी आलेला. माहिती कानोकानी पोहोचवणे आणि ती ही हव्या त्या स्वरूपात .. आपली प्रतिमा बनवून तिचा प्रसार करणे.. जनमानसाच्या मनात विकासपुरूषाची प्रतिमा बनवून त्यासाठी मागेपुढे कुठे न पाहणारा हा नेता असे चित्र उभे करणे.. आणि या सर्वांस छेद कोणी देऊ पाहणारे शंकासुर असतील तर त्यांचा बंदोबस्त करणे.. आमचे काम सर्वदूर पोहोचवणारे आमचे पगारी आयटी एक्सपर्टच हल्ली शंकासुरांचा बंदोबस्त करतात. एखाद्या शंकासुराची असली नसलेली अंडीपिल्ली बाहेर काढणे म्हणजे यांच्या डाव्या हातचा मळ. साहेब म्हणतात, दोन रेषा आहेत समजा.. एक आपली, एक त्यांची .. आपली रेषा मोठी करायची असेल तर सोपा मार्ग म्हणजे त्यांची रेषा पुसत जाणे.. म्हणजे आपली आपोआप मोठी होते.. हे व्हायचे तर शंकासुरांच्या पिलावळांना त्यांची जागा दाखवलीच पाहिजे. त्यांच्याबद्दलच समाजात संशय पसरविला तर आपली रेषा

आपसूक मोठी दिसत जाईल.. साहेबांच्या या द्रष्टेपणास फळे आलीत.. त्यामुळे आता प्रश्न विचारणारी जमात नामशेष होऊ घातलीय. विकासाचा वारू आता चौफेर उधळेल. साहेब समाधानी आहेत आता..  "आम्ही न कोणा पेपरवाल्यांच्या न कोणा चॅनेलवाल्यांच्या प्रश्नास उत्तरे देण्यास बांधील आहोत.. आमचा विश्वास प्रश्न विचारणाऱ्यांवर नाही. आम्ही पत्रकारांस सामोरे जात नाही .. ना पत्रकार परिषदा घेतो. आम्ही तिकडील दोरच कापून टाकले आहेत. वेगवेगळया शंकासुरांस आम्ही संपवून टाकले आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणवणाऱ्या पण प्रत्यक्षात विकासगंगेस ठिकठिकाणी अडवणाऱ्या शंकासुरांचा वध हा आमच्या राजकीय कारकीर्दीचा एक स्तंभ म्हणून उभा केला आहे आम्ही. त्याची फळे आम्हास मिळत आहेत आज." साहेब आमच्याशी खाजगीत बोलताना म्हणाले त्यादिवशी.. ते खरेच आहे!

आज साहेब मंत्री झालोत. राज्यमंत्रीपद फार मोठे नाही याची कल्पना आहे त्यांना. साहेबांहून मोठे दिग्गज पक्षश्रेष्ठी म्हणून वर बसलेले आहेत. साहेब  अजून पुढे जातीलच. एक ना एक दिवस या राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर बसण्याची त्यांची महत्वाकांक्षा पूर्ण होईलच.

.. पण तोवर.. आजही आमच्या विरामगावाचे साहेब अनभिषिक्त राजे आहेत.. यात कुणा शंकासुरांस.. कुणी अजून नजरचुकीने शाबूत असल्यास.. शंका नसावी..

# अखंडपुरातील विकास गंगा

एक एप्रिल हा पतंगरावांच्या आयुष्यातला आनंदाचा दिवस असतो. बाकी जगात एप्रिल फूल म्हणून भले ही साजरा होत असेल तो पण बाकी जगाशी अखंडपुरास देणेघेणे नाही.. त्यांच्या अखंडपुर गावात तो गेले सहा वर्षे उत्सवासारखा साजरा होतो.. कां न व्हावा?

श्री. पतंगराव ढोले पाटील म्हणजे अखंडपुरातील मोठे प्रस्थ. वडिलोपार्जित जमीन जुमला. शेती. घरदार. राबणारे मजूर आणि वाड्यावर नोकर चाकर.

त्या पायावर कळस चढवणारे अखंडपुरातले एक कर्तृत्ववान नेतृत्व म्हणजे श्री.पतंगराव.

दाराशी आधी बैलगाडी झुलायची त्यांच्या वडलांच्या काळात. एक घोडागाडी ही बाळगून होते ते. काळाप्रमाणे बदल व्हायलाच हवा. पतंगराव हुशार खरे. काळाची पावले ओळखून त्यांनी पावले टाकली.. तशी हुशारीही त्यांना वारशात मिळालेली..

त्यांचे वाडवडील गावचे जमीनदार. सावकारी हा जोडधंदा.. पतंगरावांचे वडील भगवंतराव हुशार खरे. मर्यादित जमिनीवरून मिळणाऱ्या मर्यादित उत्पन्नाच्या मर्यादा त्यांच्या ध्यानात आल्या. आजूबाजूची गरिबी त्यांना दिसत होती..

त्यासाठी सावकारीस त्यांनी जोडधंद्याऐवजी मुख्य व्यवसाय बनवण्याकडे पावले टाकली. वसूल न झालेल्या कर्जातून जप्त कराव्या लागलेल्या जमिनींतून आपली जमीनदारी ही त्यांनी वाढत्या चंद्रकलेप्रमाणे वाढवत नेली. घरीदारी अशी सुबत्ता येत गेली. ऋद्धीसिद्धी पाणी भरत होत्या असे म्हणायची पद्धत असते ना एक .. तसेच काही. पण पतंगराव विशीत आले .. एक दिवस भगवंतरावांचा अचानक मृत्यू झाला. सगळा कारभार पतंगरावांवर येऊन पडला. शेती नि जमिनी.. कर्जाऊ रकमेचे हिशेब ..

त्यात मजुरांना कुणीतरी उकसवणारे चळवळे कार्यकर्ते गावात शिरलेले. थकलेल्या कर्जापायी जमिनी भगवंतरावांनी मोठया हुशारीने कमावल्या होत्या. चळवळया लोकांनी तिथे शेतकरी नि मजुरांना त्यांच्या हक्कासाठी लढायला शिकवणे सुरू केले.. संकटे एकट्याने येत नाहीत हे खरेच. पण कर्तृत्ववान माणूस अशा संकटांस संधी समजून लढतो. पतंगरावांनी ही तेच केले. घरचा कारभार तर हाती होता.. गावचा कारभार ही हाती येणे हाच त्या संकटावर उतारा .. सत्ता असली की गावच्या जमिनीवरील सात बाराचा उतारा हवा तसा बदलू शकू ह्याची जाण होती त्यांना.

तसे पतंगराव हुशार खरे. पुस्तकी शिक्षण हे खरे शिक्षण नव्हे याची जाणीव अगदी शाळेत असताना झालेली .. त्यामुळे जीवनाच्या शाळेत प्रत्यक्ष शिक्षण घेण्यासाठी नववीतच शाळा सोडून दिलेली. त्यांना परिस्थितीचा अंदाज यायला वेळ लागला नाही. बदलत्या वातावरणात स्वतःत बदल घडवून आणणे.. हा जीवशास्त्रीय सिद्धांत हाडीमांशी रूजलेला. हे शिकण्यासाठी शाळा कॉलेजातले पुस्तकी शिक्षण कशाला हवे? या सगळ्या परिस्थितीवर मात करायची असेल, सगळ्या चळवळींची वळवळ थांबवायची असेल तर गावची सत्ता आपल्या हाती हवी.. ती मिळवणे कठीण असले तरी अशक्य नाहीच.. इतकी लढून मिळवलेली लोकशाही नाहीतर काय कामाची? हात सैल सोडले

की निवडणुकांतून वर येण्याची संधी प्रत्येकास देते ती. त्याबरोबर थोडी दहशतीची फोडणी दिली की निवडणुकीच्या यशाची पाककृती अगदी बरोबर जमून येते .. तशी त्यांनी जमवून आणलीच. यश साजरे करण्यासाठी पतंगरावांनी पंगती उठवल्या. गावजेवणात अर्धपोटी शेतकरी नि मजूर ढेकर देत जेवले.. थोड्याच दिवसांत पतंगराव गावचे सर्वेसर्वा झाले. त्यांच्या आधीचे सरपंच त्यांचे तगडे विरोधक खरे पण शहरात एकदा गेले काय नि तिकडच्या रस्त्यावर एका भरधाव ट्रकखाली चिरडले गेले काय.. पतंगरावांच्या हाती गाव आले.. चळवळ थंड पडली.

पतंगराव गावच्या देवीचे परमभक्त. सश्रद्ध अगदी.

सत्ता हेच सत्य .. सत्याला मरण नाही आणि सत्यमेव जयते.. अशी श्रद्धा असलेले. त्यांच्या देवीवरील श्रद्धेनेच त्यांचा उत्कर्ष घडून आला. बाकी मोठ्या घरातील पुढील पिढ्या लाखाचे बारा हजार करतात .. वडिलोपार्जित संपत्तीचा चुराडा करतात .. तिथे पतंगरावांनी हाती असलेल्या लाखाचे बारा लाख करण्याची किल्लीच सरपंच बनून हस्तगत केली. बैलगाडीत फिरले ते त्यांचे वाडवडील. पण प्रगती साधत गावात पहिली चारचाकी गाडी पतंगरावांनीच आणली. त्यासाठी गावाच्या बाहेरून एक डांबरी रस्ता ग्रामपंचायतीने बनवून घेतला.. हा गावातील पहिला रस्ता.

विकास विकास म्हणजे तरी दुसरा काय असतो? त्या विकासाकडे डोळे दिपवून गावकरी पाहात होते. पतंगरावांच्या कृपेने त्यांच्याच शेतावर का होईना पण मजुरी मिळत होती. हाताला काम होते. रोजगार होता. गावाला चार घास मिळत होते खायला. शेतकरी नि मजूर घाम गाळत होते.. पतंगरावांचे नेतृत्व बहरास येत होते..

दैव माणसाची मात्र परीक्षा पाहात असते. सारे काही ठीक झाले तर दैवास ते पाहवत नसावे की काय? पतंगरावांच्या कर्तृत्वाचा वारू असा उधळत होता. पंचविशीत शेजारच्या गावच्या मोहित्यांची शेवंती कारभारीण म्हणून आली. लग्न थाटात नि पाटलांच्या इतमामाला साजेसे मोहित्यांनी करून दिले. अखंडपुरातील सगळ्यांना एका दिवसासाठी का होईना पोटभर जेवण मिळाले. आठवडाभर लग्नसोहळ्याची चर्चा गावभर होत राहिली .. पुढे पतंगरावांना पहिले कन्यारत्न झाले. दुसऱ्या वेळी तरी आपला वारस पोटी येईल म्हणत पतंगरावांनी गावात बर्फी वाटली. पण दैवगती अशी असावी.. सहा वर्षात चार कन्या पदरी पडल्या .. पतंगराव तसे नाउमेद होणारे नव्हते. पण तरीही त्यांच्या हाती यातले काय होते? जे जे होईल ते ते पहावे म्हणत पतंगराव आपली गादी चालवणाऱ्या पुत्ररत्नाची वाट पाहात होते..

सहा वर्षांपूर्वी तो दिवस उगवला. एक एप्रिल. पाचव्या प्रयत्नात पतंगरावांच्या पदरी यश पडले. पुत्ररत्नाचा जन्म झाला.. परत गावजेवणे झाली. सगळीकडे आनंदी आनंद झाल्याचे सरपंच पतंगरावांनी जाहीर करून टाकले. पुत्राचे नाव मोठया कौतुकाने कौतुकराव ठेवले. आपल्या गादीचा चिमुकला वारस वाढताना पतंगराव पाहात होते. दरवर्षी एक एप्रिल, म्हणजे कौतुकरावाचा जन्मदिन थाटात साजरा होत होता.. गावचे नवनेतृत्व जन्माला येण्याची तारीख ती. गावभर आनंदाची लहर येत होती. अगदी सरपंचांच्या हुकुमानुसार.

आजचा वाढदिवस मात्र अजून खास होता. कौतुकराव शाळेत जाऊन एक वर्ष झाले होते. घरचा लाडाकोडात वाढलेला कौतुकराव. शाळेतल्या लाकडी बाकड्याऐवजी मऊ गादीचा स्वत:चा बेंच घेऊन जाई. सरपंचांचाच हुकूम तो. मास्तर कसे टाळणार? कौतुकरावाचे शाळेतही कौतुक होतेच. बाकी विद्यार्थ्यांनाही कौतुकरावाचे कौतुक होतेच. शाळेतला अभ्यास ही त्याच्या कलाने चाले.. तो पाच सहा वर्षाचा चिमुरडा असेलही.. पण जन्मजात गुणांमुळे मास्तरांना आदेश देई.. त्याप्रमाणे शाळेत शिकवणे चाले.. अशात एक वर्ष हा हा म्हणता निघून गेले.. कौतुकराव पहिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले.. अर्थातच उत्तम गुणांनी. ते प्रगती पुस्तकावरील स्वतःचे नाव नि गुणांचे आकडे भलेही

कौतुकरावास स्वतःला वाचता येत नसतील.. पण त्यांच्या पहिलीची परीक्षा उत्तीर्ण होण्याचा आनंद संपूर्ण गावास झाल्याचा आदेश सरपंचांनी काढला. या वर्षी कौतुकरावाचा जन्मदिन अजून थाटात होण्यासाठी अजून एक कारण मिळाले .. गावातील नवनेतृत्व शाळेत शिकून शहाणे होत होते.. शाळेतील पहिलीची परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण होऊन उच्च शिक्षणासाठी दुसऱ्या इयत्तेत दाखल होत होते.. पतंगरावांना कौतुकरावाचे कौतुक वाटावे असेच होते सारे..

अखंडपुरात एक एप्रिल चा दिवस थाटात साजरा होई गेली पाच वर्षे. या वर्षी त्यात दुधात साखर पडावी असे झाले.. कौतुकरावाचा कौतुक सोहळा पार पडला. गावाच्या विकासात बांधलेल्या एकमेव रस्त्यावरून चालणाऱ्या गावकऱ्यांना मोठमोठे फलक दुतर्फा लागलेले दिसले ..

***ज्ञानियांचा राजा..***

कौतुकराव पतंगराव ढोले पाटील.. पहिलीची परीक्षा पहिल्या प्रयत्नात पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकाने पास झाल्याबद्दल आणि सहाव्या वाढदिवसाबद्दल अभिनंदन आणि शुभेच्छा..

त्यावर कौतुकरावाची छबी एकीकडे. दुसरीकडे पतंगराव .. नि खाली शुभेच्छुक म्हणून पतंगरावांच्या हाताखालील कार्यकर्त्यांचे छोटेखानी फोटो..

अख्ख्या गावाने असले बोर्ड आजवर पाहिले नव्हते .. पतंगराव काही कामानिमित्त शहरात आलेले काही महिन्यांपूर्वी.. तेव्हा तिकडे रस्तोरस्ती असे बोर्ड लागलेले पाहिलेले त्यांनी. तिकडे शहरी भाषेत होर्डिंग म्हणतात म्हणे. पण ही विकासाची गंगा आपल्या अखंडपुरातही आणायचीच.. हा निश्चय करून ते गावी परतलेले.

आज तो दिवस उजाडला.. रस्त्यावर दुतर्फा बोर्ड उभारले गेले. शेजारच्या तालुक्याच्या गावातून खास बनवून घेतलेले ते. गावकऱ्यांनी प्रथमच हा प्रकार पाहिला. मोठ्या कौतुकाने कौतुकारावाचा फोटो झळकलेला पाहिला. गावचा तो रस्ता त्या बोर्डांनी सुशोभित झाला.. आदेशानुसार गावात आनंदीआनंद झाला..

.. आणि विकास विकास म्हणजे तरी दुसरे काय असते म्हणत साऱ्या गावानी विकासगंगेत हात धुवून घेतले..

# नि:प्रश्नं सदा सुखी!

लहानपणापासूनच तो तसा. त्याच्या लहानपणीच्या लहान मेंदूत मोठेपणीही काही विशेष फरक नाही पडला. एखाद्याचा मेंदू विकसित होतो.. लहान मेंदूचा मोठा मेंदू होतो.. मनुष्य मोठा झाला की शहाणा होत जातो.. कित्येक प्रश्नांची उत्तरे स्वतः शोधतो.. कित्येकांची शोधतच नाही .. किंवा सोयीस्कर ती उत्तरे शोधून काढतो. पण 'तो' वेगळा आहे. त्याला प्रश्नच पडत नाहीत.. अगदी पहिल्यापासूनच. म्हणजे त्याचे म्हणणेच असे.. 'जग जसे बनले आहे तसेच्या तसे स्वीकारले तर प्रश्न पडण्याची

गरजच काय? जर तसे नसते तर आजवर ते टिकून राहिले असते का?' त्याच्या या बिनतोड प्रश्नावर कोणी काय उत्तर देणार?

थोडक्यात तो स्वतःला 'अँटी सॉक्रेटिस' म्हणवून घेई. सॉक्रेटिसला प्रश्न विचारण्याची सवय होती म्हणे. कुठल्याही उत्तराहून प्रश्न महत्त्वाचे .. ते पडणे महत्त्वाचे आणि विचारणे महत्त्वाचे .. असे काही सॉक्रेटिसचे म्हणणे असेल तर याचे त्याच्या अगदी विरूद्ध टोकाचे. 'आजवर प्रश्न पडलेल्या माणसासाठी नि ते न पडलेल्यासाठी असा कोणता बदल या जगात दिसला आहे?' न राहवून तो हा प्रश्न मात्र विचारतो!

या विषयावरून आमचा वाद होत असे नेहमीच. म्हणजे तेच.. त्याला जिज्ञासा का नसावी? त्याला प्रश्न का पडू नयेत? हा प्रश्न मी त्याला विचारतो.. तिथून वादास सुरूवात होते..

"फार पूर्वी जगातील एकेका गोष्टींबद्दल प्रश्न पडले म्हणून तर नवीन शोध लागले" .. मी म्हणतो.

"तू काही म्हण.. शोध लागले असतील ही.. पण नसते शोधले तरीही लागलेच असते.."

"म्हणजे?'

"म्हणजे इतकेच.. विधीलिखित. जे होणार ते ठरलेले. पूर्वनियोजित. त्यात बदल अटळ आहे.. अगदी तू मला हा प्रश्न विचारणे नि मी हे उत्तर देऊन तुला निरूत्तर करणे.. हे देखील."

"म्हणजे ज्यांना प्रश्न पडतात ते देखील विधीलिखित?"

"हा प्रश्न तुला पडू शकतो.. मला नाही! मी अँटी सॉक्रेटिस आहे.."

"अँटी सॉक्रेटिस? ही काय नवीन भानगड?"

इथे त्याने मला सॉक्रेटिसच्या प्रश्नोपनिषदाबद्दल सांगितले. प्रश्नोपनिषद शब्द त्याचाच. सॉक्रेटिस प्रत्येक बाबतीत नाक खुपसत प्रश्न विचारायचा म्हणे. पण त्याला ते नामंजूर होते. उगाच कुतूहल नि जिज्ञासा या गोंडस नावाखाली प्रश्न विचारणे म्हणजे काहीतरी खुसपटं काढणं असं त्याला वाटायचं.

शाळेत असताना त्याच्या या अँटीसॉक्रेटिस पवित्र्याबद्दल मला कौतुक होते. शिक्षकांना प्रश्न पडलेच नाहीत तर परीक्षाच रद्द होतील या आशेने. पण तसे कधीच घडले नाही. असा मुळापासून म्हणजे रॅडिकल विचार करणाऱ्यांची उपेक्षा ही काय आजची गोष्ट नाही नाहीतरी! त्यामुळे परीक्षा होत. त्यात रीतसर दिवे लागत.. ते का लागतात याची घरी चिरफाड होई.. काय केले की तू सुधारशील.. असा प्रश्न घरी विचारला जाई.. मी प्रश्न विचारून

भंडावून सोडणारा.. आणि कुठलाच प्रश्न न पडणारा तो.. तो मात्र अभ्यासात पुढे होता..

"अरे, सगळं सोपं नि सिंपल आहे! घरी म्हणाले, अभ्यास कर.. मी करतो. आपल्या सरांनी सांगितले, गृहपाठ कर.. मी करतो. उगाच का करू? असला प्रश्न पडत नाही मला. लिही म्हटले की लिहायचे. खेळायला जा म्हटले की खेळायचे. नसते प्रश्न विचारत बसायचे नाहीत .."

लहानपणी ही स्ट्रॅटेजी त्याला हात देऊन जायची. शाळेत त्यामुळे चमको मुलांत त्याची गणना व्हायची.

कॉलेजात तो गेला असणार नि पुढे नोकरी केली असणार ती ही सांगितले गेले म्हणून .. आपल्या आयुष्याचे पुढे काय करावे .. हा प्रश्नही त्याला पडला नसावा! पण त्यामुळेच की काय.. तो सगळ्यांत पुढे.

आयुष्यात यशस्वी व्हायला जे काही लागते ते त्याच्याकडे होतेच. नसत्या शंका कुशंका नव्हत्या. आज्ञाधारकपणा होता.. चौकसपणा नि प्रश्न पडून त्यावर विचार करणे यात वेळ न दवडण्याने असेल, पण त्याची गाडी सुसाट सुटली होती..

"तुम्ही लोकं काय करता ना.. इकडेतिकडे काही बाही विचार करत बसता. तुम्हाला प्रश्न पडतात खूप. मी पाहिले आहे.. प्रश्न

पडणे म्हणजे वेळेचा अपव्यय. आपल्याला रेडिमेड उत्तरे मिळत असताना प्रश्न कशाला पाडून घ्यावेत?"

त्याचा हा बिनतोड प्रश्न! त्याने नोबॉल टाकावा तसा विचारलेला!

या बाबतीत मात्र त्याचे चिंतन मूलभूत म्हणावे असे होते. एकदा आम्ही असेच बसलेलो असताना त्याने त्याबद्दल सांगितलेले मला..

"तुमच्या लोकांचे काय आहे ना.. यू ऑल आर अ कन्फ्यून्ड लॉट. अरे तुम्हाला सगळ्या बाबतीत शंका. विज्ञानात शंका.. म्हणजे बघ ना.. जीवशास्त्रात शरीराचे काम कसे चालते.. हे वाचून समजून घ्यावे .. कठीण वाटले तर डोकेफोड करीत बसावे .. पण मला सांग आपल्या शरीराला ते सारे अगोदरच ठाऊक आहे. त्यासाठी आपल्याला अन्नपचन कसे होते की हृदयाचे काम कसे चालते हे माहिती असण्याची गरज नाही.. अरे न्यूटनचे नियम ठाऊक नसूनही गुरूत्वाकर्षण तसेच काम करते.. रसायनशास्त्रातल्या क्रिया आपल्याला ठाऊक नसल्या तरी तशा घडतातच. आपल्याला त्यांची माहिती हवीच हा अट्टाहास कशाला?"

"पण साल्या पेपरात तर तू तोडफोड करतोस.. उगाच नाही टॉपमध्ये असतोस .."

"ते मी आज्ञा पालन करतो म्हणून. अभ्यास करा म्हटले की तो करायचा.. उगाच का नि कशाला कशाला? तुम्ही लोकं जी अजून विचार करता ना त्यामुळे पंचाईत होते.. तुम्हाला सगळेच प्रश्न पडत असतात .. म्हणजे बघ ना, शास्त्र नि गणित एकवेळ बाजूला ठेऊया .. पण बाकी प्रश्न तुम्हाला पडतात की नाही? म्हणजे समाजव्यवस्था शतकानुशतके चालत आलीय. ती अशी का? हा काय प्रश्न झाला? समाजात विषमता का? जातिभेद का? हे काय प्रश्न आहेत? चालीरीती नि वंशपरंपरागत रूढी टिकल्या त्या काय उगाच? उगाच त्याबद्दल डोके खाजवीत बसावे.. अरे मी तर त्याबद्दल तावातावाने प्रश्न विचारणारेही काही महाभाग पाहिलेत. आता साध्या साध्या प्रथा का पडल्या हा काय प्रश्न होऊ शकतो? आपले पूर्वज होतेच महान. आपली संस्कृती होती महान. आपले सारे काही होते महान. त्यांना प्रश्न विचारून लहान तोंडी मोठा घास घेण्याचा प्रयत्न करणार तर तो घशात अडकणारच नाही का?"

"म्हणजे समाजाने बदलू नये?"

"बदलावे! त्याच्या सामूहिक नशीबाप्रमाणे बदलावे! पण तो कसा बदलावा नि कसा नाही.. का बदलावा असल्या गोष्टींत आपण नाक खुपसू नये. तो बदलेल तेव्हा ते बदलही आपण

मुकाटयाने स्वीकारावेत. उगाच शंकासुरासारखे प्रत्येक गोष्टीचा किस पाडणे कशाला? बाकी काही नाहीतरी माझ्या व्यक्तिगत सुखी आयुष्याची ही किल्ली आहे समज.."

हे सारे एकाएकी का आठवावे?

काल रस्त्यातून जाताना बाजूने एक लांबलचक गाडी थांबली.. मला नावाने हाक मारत त्यातील गृहस्थाने मजेत दिसतोयस.. अशी प्रश्नवजा सुरूवात केली..

गप्पा झाल्या मोजून दोनचार मिनिटे. एवढया लांबलचक सरकारी गाडीत बसलेल्या त्याने माझ्यासारख्याला इतकी मिनिटे द्यावी हे ही खूप होते. तो 'तो'च होता.. तो बोलत होता .. त्याच्या बोलण्यात शक्य तितके प्रश्नचिन्ह न वापरता बोलत होता तो.. त्याला बघताच मला आठवलेले ते एकदा मागे बोलताना म्हणालेला तो.. 'मला विचारशील ना तर प्रश्नचिन्ह ह्या विरामचिन्हावरच बंदी आणली पाहिजे.'

.. प्रश्न आणि प्रश्नचिन्हांवर बंदी घालण्याची भाषा बोलणारा तो.. कुठेतरी सरकारी उच्चपदावर पोहोचला असणार तर त्यात नवल नाही!

"अरे, दिल्लीत असतो. गव्हर्नमेंट ऑफिशियल. जॉइंट सेक्रेटरी टू फायनान्स.."

बाप रे! याची मजल इथवर पोहोचली! त्याच्याच बरोबरीचा फायनान्स मधला मी एका को-ऑपरेटिव्ह बँकेत कॅशियर आहे.

तो आज भेटला नि उगाच प्रश्न पडला.. माझे काय चुकले? शाळेतील हूडपणा गेल्यावर मी पुढे सुधारलो. चांगल्या मार्कांनी ग्रॅज्युएट नि पोस्ट ग्रॅज्युएटही झालो. नोकरीला लागलो. आज्ञापालनापेक्षा असं का आणि असंच का असले प्रश्न पाडत राहिलो स्वतःला. त्यात झाले एकच.. प्रश्न पडत राहिले नि मी मागे पडत गेलो.. एका नोकरीतून दुसरी.. तिकडून तिसरी. शेवटी सध्याची ही को ऑपरेटिव्ह बँकेतील .. इतके सगळे करून शेवटी त्यातून मी साधले ते काय?

'निर्लज्जं सदा सुखी' म्हणतात.. तसा हा 'नि:प्रश्नं सदा सुखी' होता. त्याचे युक्तिवादही तसे बरोबर होते. मला सतत प्रश्न पडत असतात. तो म्हणाला त्याच प्रकारचे. विज्ञानातले प्रश्न सोपे म्हणावेत तसे. म्हणजे एखाद्या वैज्ञानिकाने चिकाटीने नि आपली सारी प्रतिभा वापरून मेहनत केली तर उत्तरे मिळूही शकतात. पण गॅलिलिओला पृथ्वी गोल आहे नि सपाट नाही या त्याच्या शोधाबद्दल शिक्षा का झाली.. याचे उत्तर शोधले आहे कुणी? याची ही उत्तरे कदाचित मिळतील पण त्याच्यावर उपाय काय.. हा प्रश्न पडला असेल तर त्याचे उत्तर मिळेल का कधी? असे अनंत प्रश्न आहेत.. समाज व्यवस्था नावाखाली नि रूढी नि परंपरा या नावाखाली .. त्यांच्याबद्दल पडले प्रश्न तरी उत्तरे आहेत कुणाकडे?

'तो' म्हणतो तेच खरे.. उगाच प्रश्न पाडून घेऊन आपले आयुष्य दु:खी करून घेणे.. कुणी सांगितले आहे? 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' याचा अर्थ हाच असावा?

आज त्याच्या गाडीतून ऐटीत चालला होता तो. रेडिमेड उत्तरांच्या जोरावर भराभर शिड्या चढून गेला असणार. सरकारात प्रश्न न विचारणाऱ्यास खास वागणूक मिळते म्हणतात. वरिष्ठांच्या हो ला हो म्हणणारे होयबा म्हणवले जातात. तो नुसता होयबा नाही. तो प्रश्न न पाडून घेणारा अतिकुशाग्र बुद्धीचा अधिकारी आहे. त्याला सगळीकडून विशेषतः सरकारातील उच्चपदस्थांकडून मागणी असल्यास नवल नव्हते. त्याच गुणाच्या जोरावर तो अजून पुढे जात राहिल. त्या एका गुणाच्या बळावर तो सुखी राहिल .. पुढच्या पिढीसमोर आदर्श ठेवेल..

नि:प्रश्नं सदा सुखी!

# आमचे ज्ञानार्जन.. २४×७

कुणीतरी म्हटलंय .. जीवन ही अखंड शिकत राहण्याची गोष्ट आहे असे काहीतरी. अजून कुणी म्हणालेला.. मी खरा हुशार होतो पण शिक्षणाने मला बिघडवले.. आम्ही खरंच सांगतो .. आम्हास दोन्ही पटते.. म्हणून आम्ही उगाच जास्त शिक्षणामागे नाही लागलो. काय उगाच पुस्तकी शिक्षणाने पुस्तकी किडा बनून आपलेच आयुष्य कुरतडायचे? पण जीवन नामक उघड्या पुस्तकातून आम्ही शिकणे सोडले नाही नि सोडणार ही नाही .. पण तुम्हाला सांगतो, हे जीवनशिक्षण होते ना ते

धीम्या गतीने. पुढच्याच ठेच मागचा शहाणा म्हणतात ना.. तर पुढच्याकडे लक्ष ठेवा..त्यात परत पुढचा कोण ते शोधणे आले.. त्याला ठेच लागेल त्याची वाट पहा .. तेव्हा कुठे तुम्ही मागून शहाणे होणार! त्यात तो किंवा ती सावध असेल नि पायात चांगले बूटबिट घालून चालत असेल.. नि रस्ताच मुळात चांगला असेल.. तर ठेच लागण्याची बोंब.. तर पुढच्यास ठेच लागलीच नाही तर आपण शिकावे ते काय? थोडक्यात हे थोडे संथगतीने चालणारे शिक्षण आहे. हे ही आम्ही कुठे शिकलो? या जीवनशाळेतच. म्हणजे उघड्या डोळ्यांनी पाहिले तर शिकायला मिळते खूप..

काही वर्षापूर्वीची गोष्ट. तेव्हा आजूबाजूला फक्त टीव्ही वरच्या जाहिरातींतून शिक्षण मिळायचे.

तसे रोजचे पेपरबिपर यायचे पण त्यासाठी वाचन महत्त्वाचे .. हल्लीच आम्ही मिळवलेले ज्ञान सांगते की दृक श्राव्य ज्ञान जास्त सहज आत्मसात होते.. हल्ली म्हणजे .. तोच नवा ज्ञानस्रोत. आता वाचन मनन चिंतन या गोष्टी कालबाह्य झाल्यात हे खरे. काळाप्रमाणे बदलणे ही गोष्ट आम्ही शिकलोय.. आता ज्ञानाची गंगा सर्व भिंती नि अडथळे मोडून तोडून सगळीकडे वाहू लागली आहे. दुथडी भरून. त्यात आपली घागर भरून घेणे सहज शक्य आहे.. ते वर्षानुवर्षे तप नि ज्ञानसाधना वगैरे करण्याचे दिवस गेले.

पूर्वी मोठा व्यासंग वगैरे करायचे विद्वान लोक. म्हणजे आधी विद्वान म्हणवून घेतले की पाठोपाठ व्यासंग करावाच लागायचा त्यांना. कित्येक महारथींनी तर रात्रीचा दिवस केला ज्ञानार्जनासाठी म्हणतात. प्रचंड मोठे ग्रंथ वाचायचे म्हणे.

तत्वज्ञान कोळून प्यायला हे सगळे करावे लागत असे तेव्हा. तेव्हाचे दिवसमान वेगळे. म्हणजे जो कोणी व्यासंगी म्हणवून घेऊ इच्छितो त्याला तेव्हा हे सारे करावेच लागायचे. तशी फॅशनच होती म्हणाना. पण फॅशनप्रमाणेच दिवसही बदलतात. मूठभर ज्ञानी लोकांची मक्तेदारी आता मोडीत निघाली. ग्रंथालयाच्या भिंती आता मोडल्या गेल्या. ज्ञान चोहीकडून उपलब्ध झाले. काळमान बदलत चालले. फार पूर्वी जंगलात जाऊन एका पायावर वगैरे वर्षानुवर्षे तप करावे तेव्हा कुठे कुणी ऋषि म्हणून रेकग्निशन द्यायचे. ती पद्धत नंतर बंद झाली. काही वर्ष कुणी जवळच्याच एखाद्या पिंपळाबिंपळाच्या झाडाखाली डोळे मिटून बसून दिव्य ज्ञानाची प्राप्ती करायला लागले. मग झाडं सोडून लोकं घरी बसूनच अभ्यास करायला लागले. तेव्हा तेलाचे दिवे रात्र रात्र जाळून नि डोळ्यांवर ताण पाडून ग्रंथवाचन चाले. पण आता ज्ञानसाधनेसाठी नि ज्ञानप्राप्तीसाठी ग्रंथांची आवशक्यता नाहीशी झाली. तप वगैरे आऊटडेटेड आधीच झालेले. स्वतःला अति शहाणे समजून ज्ञानप्राप्ती करणाऱ्या अल्पसंख्याकांची बोलती आणि चलती आता बंद झाली. ज्ञानगंगेस घातला गेलेला बांध फुटला.. खरेतर धरण

फुटले. सर्वसामान्य बहुजन ज्ञानाच्या महापुरात भिजून चिंब झाला. त्या स्वतःच विद्वान म्हणवणाऱ्यांची सद्दी संपली. समानतेच्या या युगात आता बहुसंख्यांस ज्ञानप्राप्तीचा सुलभ मार्ग मिळाला. वर्षानुवर्ष केलेला कूर्मगती व्यासंग नि अभ्यास अगदीच आऊटडेटेड झाला. हल्लीच्या फास्ट युगात हे व्हायचेच होते. अगदी शालेय.. महाविद्यालयीन.. उच्च अतिउच्च वगैरे शिक्षण घेऊन त्याचा तोरा मिरवणाऱ्यांची तोंडे बंद झाली.. कुठेही न जाता आपल्या हाती ज्ञानाची किल्ली आली..

ही सारी क्रांती तंत्रज्ञानाची. तंत्र'ज्ञान' म्हणजे परत कसले तरी ज्ञान आले.. ते विकसित करणारी काही सुपीक डोकी आली.. करोत बापडे. पण आता त्या तंत्रज्ञानावर आधारित सुधारित शिक्षण आणि ज्ञानप्राप्तीचे मार्ग आले. आधी दुनिया मुठ्ठीमें करायला मूठतरी आवळावी लागे. आता ती कराग्रे वसू लागली. हाताच्या बोटाने भ्रमणध्वनीवरून सारे काही क्षणार्धात समोर येऊ लागले. जादूच्या चिरागातून जिन बाहेर येऊन हुकूम मेरे आका म्हणायचा तशी ॲलेक्सा पण आली. आधी मॅगी नामक पक्वान्न बनवायला दोन मिनिटे तरी लागायची आता त्याहून कमी वेळात ज्ञानसागरातले मोती वेचायची सोय झाली. एखाद्यास विद्वान व्हायचे असेल तर मॅगी बनवून ती खाईपर्यंत विद्वत्ता मिळवण्याचे क्रॅश कोर्सेस गुगलनामक विद्यापीठात उपलब्ध झाले. तरीही हे

गुगल विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार ज्ञान देते. त्याहूनही अधिक सामान्य जनांस असामान्य असे सामान्य ज्ञान देणाऱ्या विद्यापीठाच्या शाखा व्हॉटस्ॲप आणि फेसबुक नामक ठिकाणी उघडल्या गेल्या. पहाटे पहाटे पक्ष्यांचे कूजन पूर्वी चाले. हल्ली ही करत असतील.. ठाऊक नाही. आम्ही हल्ली उशीरा निजे (त्यामुळे) उशीरा उठे त्यास ज्ञान आयुरारोग्य भेटे या सुवचनानुसार चालतो. भल्या सकाळी अकरा वाजता आम्ही दिवसाची सुरूवात सुवचनानी नि तत्वज्ञानानी करतो. क्षणभंगुर आयुष्याचे क्षण न क्षण वापरा असे काही वाचल्यावर आम्हास ती पाच तास झोपही जास्त वाटू लागते. भ्रमणध्वनीवरून ज्ञानार्जनाच्या संधी सोडून निद्रिस्त व्हावे .. आमचे आम्हास शरमिंदा व्हावयास होते.. मग देअर इज ऑल्वेज ॲन अनदर डे असा तत्वज्ञानवजा सुविचार आमच्या भ्रमणध्वनीवर वाचला की आम्हास जीवनशिक्षणाचा नवीन धडा मिळतो. दुप्पट हुरूपाने आम्ही ज्ञानसागरातील काही ज्ञान तुषार संचय करावयास लागतो.

या विद्यापीठात काय नाही? आहार विहार शास्त्रापासून आरोग्यापर्यंत.. अर्थकारण.. समाजकारण.. राजकारण.. पुरातन संस्कृती ते तत्वज्ञान ते अध्यात्म.. प्राचीन कालीन वैज्ञानिक प्रगती बद्दल आम्ही अभिमानाने ऊर दाटून येईतोवर चर्चा करतो.. ती कितीही अशास्त्रीय असेल पण उज्जवल इतिहासाबद्दल अभिमान

आणि गर्व आम्ही इथूनच शिकलो. राजकारणाचे धडे आम्हास प्रत्यक्ष चाणक्याकडून येथे मिळतात. भारतवर्ष नामक देशाच्या इतिहास भूगोलाचे धडे आम्ही शालेय इतिहासानंतर हल्ली येथेच घेतले. पुरातन संस्कृतीबद्दलचा आमचा अभिमान येथील अभ्यासानंतरच उफाळून येऊ लागला आहे. आमचे थोर पूर्वज आपला वारसा सोडून गेले त्यास शतके लोटली.. पण आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाने तो वारसा परत आम्हास उमजून येऊ लागला आहे. शतकानुशतके चाललेली जातपात नामक कालातीत व्यवस्था नि त्यामागील शास्त्रीय आधार आम्हास येथेच शिकावयास मिळाला आहे नि त्यामुळे अभिमानाने आमची छाती भरून येत असते . जुन्या रूढी अन् परंपरा याच आधुनिक तंत्रज्ञानाने आमच्यापर्यंत पोहोचवल्या. बहुतेक सर्व उज्वल प्रथांचा इतिहास आम्ही समजून आहोत. सती प्रथा अन् केशवपनासारख्या प्रथांचा शास्त्रीय आधार आता समजणे बाकी असले तरी आमच्या या शिक्षणात एक न एक दिवस आम्ही हे सर्व शिकूच याची आम्हाला खात्री आहे. आरोग्यशास्त्र ही तर या विद्यापीठांची स्पेशालिटी आहे. आम्ही तर आधुनिक वैद्यकीय शास्त्र हे थोतांड आहे या निर्णयावर येऊन पोहोचलो आहोत. वेद्यकीय शास्त्र आठ ते दहा वर्षे अभ्यासा अंती आत्मसात होते म्हणतात .. यासारखे धादांत असत्य नसेल. या लोकांच्या मेंदूतील जळमटे एकदा आमच्या विद्यापीठातून धुवून घेतली तर सर्दी खोकलाच नव्हे तर दातदुखी

पासून मोठमोठे हृदयविकार, मधुमेहा पासून कॅन्सर पर्यंत सर्व आजारांवर उपचार किती सहज सोपे आहेत ते या मंडळींस समजून येईल. आणि उगाच वर्षानुवर्षे अभ्यासाचा तोरा मिरवणे बंद होईल. राजकारण विशेषत: समकालीन राजकारण हा या विद्यापीठातच शिकवला जाणारा विषय आहे. कधी सत्ताधारी तर कधी विरोधी पक्षांची तळी उचलण्याचे शिक्षण देणारे हे विद्यापीठ आहे. लोकशाही देशात अशा ज्ञानाची महती पटल्याने मोठमोठया पदांवरूनही राजकारणी या विद्यापीठात मानद सेवा पडद्याआडून देत असतात असे आम्ही याच विद्यापीठात एके ठिकाणी वाचले आहे. तत्वज्ञान ही या विद्यापीठातील एक अत्यंत महत्त्वाची शाखा आहे. सुलभीकरण हा या शिक्षणाचा व्यवच्छेदक विशेष आहे. गीता सांगितली श्रीकृष्णाने.. ती समजून देण्यासाठी ज्ञानेश्वरांपासून टिळकांपर्यंत कित्येकांनी प्रयत्न केले. पण त्या तत्वज्ञानाचे सामान्य जनांसाठी सुलभीकरण फक्त या विद्यापीठातील क्रॅश कोर्सेस मध्येच झाले आहे. समाजाच्या उतरंडीत सर्वात खालच्या पायरीवरील कुणासही ते सहज उपलब्ध व्हावे याहून मोठी शैक्षणिक क्रांती दुसरी कोणती असेल?

थोडक्यात काय.. तर चोहिकडून ज्ञानाचा मारा होतोय.. घेता किती घेशील दो कराने म्हणत चोवीस तास पुरे पडणार नाहीत इतके विविध प्रकारचे ज्ञान उपलब्ध आहे. परत एकाच विषयाचे एका

वेळी नाही.. तर एकाच वेळी अनेक विषय.. जीवनाची फिलॉसॉफी.. केसांपासून ते नात्यांपर्यंत सगळ्यातील गुंता कसा सोडवावा .. थंड चहा ते गरम कॉफी.. मेथी मटार मलाई.. पासून मूर्ग मसल्लम..  पुरातन भारतातील संस्कृती .. राजकारण ते समाजकारण .. पुरातन संस्कृती ते आधुनिक विज्ञान.. शहाणे करून सोडावे सकल जन या बाण्याने चालणारी ही विद्यापीठे. आम्ही अखंड ज्ञान प्राप्तीमागे असतो त्यामुळे. चोवीसतास ही कमी पडावेत असा क्षणशः कणशः ज्ञान संचय आम्ही करत आहोत.. आमचे ज्ञानार्जन असे चोवीस तास आठवड्यातले सात दिवस.. वर्षाचे तीनशेपासष्ट दिवस सुरूच असते ..

आता त्यात खंड पाडून नि वेळात वेळ काढून आम्ही हे का सांगत आहोत? आजवर कुणापर्यंत ही ज्ञानगंगा पोहोचली नसेल तर त्यास ही जाणीव करून द्यावी म्हणून. कारण जे जे आपणासी ठावे ते इतरांसी सांगावे असे आम्ही येथेच शिकलो आहोत हल्ली ..

तेव्हा.. बघता काय.. सामील व्हा!

## समकालीन समर्थ

ह.भ.प. बबनराव पंडितराव.. कोरडगावचे नवीन आमदार आणि आता नामदार.. शिक्षण राज्यमंत्री. तसे बबनरावांचे तीर्थरूप श्री. आबासाहेब पंडितराव म्हणजे कोरडगावातील मोठे प्रस्थ.. पण हयात सगळी विरोधी पक्षात गेलेली. अगदी सरपंचपदावर कोणीही असो त्याला विरोध.. वर नैतिक दरारा त्यांचा. पण सगळ्याचा उपयोग काय? आबासाहेब न सरपंच झाले, न आमदार झाले न मंत्री. अगदी क्षमता असूनही. पण त्यांच्या चिरंजीवांनी ही चूक सुधारली... हे बबनरावबुवा

कीर्तनकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत पंचक्रोशीत. त्यांच्या कीर्तनाला गाव लोटत असे. पुढे राजकारणात व्यग्र झाले नि कीर्तनाला सवड मिळेना. पण आता मंत्रीपदावर बबनराव बसले पण कीर्तनकाराचा पिंड स्वस्थ बसू देईना. मंत्रीपदाची शपथ घेऊन झाली नि गावदेवीच्या देवळाच्या भव्य पटांगणात बबनरावांनी आपले मंत्रीय झाल्यानंतरचे पहिलेवहिले कीर्तन केले. त्यांच्या राजकीय सभांना गर्दी जमवली जाई तशीच मंत्रीमहोदयांच्या कीर्तनालाही अलोट गर्दी जमली हे सांगणे नकोच.

बबनरावबुवांच्या मुखी संतवाणी वसती करून असते. त्यामुळे कीर्तनात संतांचे अभंग नि उदाहरणे असल्यावाचून त्यांचे कीर्तन पूर्ण होत नाही. तुकाराम आणि ज्ञानेश्वरांचे अभंग त्यांच्या मुखी असतातच.. पण त्यांचा खासा अभ्यास समर्थ रामदासांचा. मनाचे श्लोक.. दासबोध.. करूणाष्टके.. सगळे काही मुखोद्गत बुवांना. मंत्री झाल्यावर आपल्या उत्कर्षाचा मंत्र कोणता हे सांगण्यासाठी असेल.. आज बुवांनी समर्थांच्या मनाच्या श्लोकांचा आधार घेऊन रसाळ निरूपण केले..

आपल्या राजकीय उन्नतीचा उंचावणाऱ्या आलेखाचा पट उलगडून दाखवला. त्यातून होतकरूंस शिकण्यासारखे खूप काही आहे. राजकारणच नव्हे तर आपापल्या कुठल्याही क्षेत्रात वर येण्यासाठी आवश्यक अशा बाबींबद्दल मार्गदर्शन बबनराव बुवांनी आपल्या सुमधुर आवाजाने नि रसाळ वाणीने केले आहे. ते

उद्बोधक आहे नि रंजकही. बुवांचे कीर्तन प्रत्यक्ष बघणे आणि ऐकणे हा एक आनंददायी सोहळा असतो.. पण सर्वांच्याच भाग्यात हे नाही. तेव्हा अन्यांसही त्याचा लाभ व्हावा म्हणून त्यांचे हे कीर्तन सादर आहे.. वाचा त्यांच्याच शब्दांत..

जय जय रामकृष्ण हरी.. जय जय रामकृष्ण हरी..
पुंडलिक वरदे हारी विठ्ठल ..
श्री एकनाथ नामदेव तुकाराम..
ज्ञानेश्वरमाऊली.. भक्तांची सावली ..
विठोबा माऊली.. भक्तांना पावली ..
जय जय रघुवीर समर्थ

कोरडगावच्या बंधुभगिनींनो.. आज परत कीर्तनकार म्हणून गावदेवीच्या पटांगणात उभा राहताना मला त्यादिवशी मंत्रीपदाची शपथ घेताना झाला तितकाच आनंद होत आहे. सारी तुमची म्हणजे जनता जनार्दनाची कृपा.. तेव्हा तुमच्यापुढे नतमस्तक होऊन नि आभार मानून गावदेवीचे स्मरण करून या कीर्तनास सुरूवात करतो..

नाचू कीर्तनाचे रंगी
ज्ञानदीप लावू जगी..

तर महाराजा..
समर्थ रामदासस्वामी काय सांगून गेले..

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळी कोण आहे

समर्थ सांगून गेलेत.. सेवक व्हा.. कुणाचे? समर्थाचे.. तर महाराजा.. समर्थाचिया ह्या सेवकाकडे कोणी वाकड्या नजरेनं बघत नाही .. हा बबनराव.. आपली ग्रामपंचायत होती.. तिची महापालिका झाली.. पंचायतीचा सदस्य नगरसेवक झाला .. महापौर झाला.. नंतर आमदार आणि त्याचा आता मंत्री झाला.. लाल दिवा गाडीवरी विसावला .. कसा महाराजा? समर्थाचिया सेवेतूनी..

समर्थ द्रष्टे .. समर्थांनी सांगितले आम्ही आइकिले.. आम्ही समर्थ वचन पाळिले.. एकतरी ओवी अनुभवावी.. आम्ही सारे मनाचे श्लोक अनुभवले .. कसे? तेच सांगतो महाराजा ..

जय जय रघुवीर समर्थ..

अहल्या शिळा राघवें मुक्त केली
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली॥

चिरंजीव केले जनी दास दोन्ही
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥

समर्थ म्हणतात..

शिळा उद्धरली राघवाच्या चरणांनी.. तसा बबनराव उद्धरिला समर्थांच्या पावलांनी .. खरंय की नाही.. समर्थ म्हणजे कोण? समर्थ म्हणजे आमचे पक्षश्रेष्ठी महाराजा .. जया वर्णिता शीणली वेदवाणी .. असे आमचे पक्षधुरीण.. आम्ही त्यांचे उचलले जोडे.. तयांनी आम्हा पायी घातिले तोडे .. थोडे थोडके नि साधे नाही.. मंत्री पदाचे महाराजा ..

तर

मना सज्जना हीत माझें करावें
रघुनायका दृढ चित्ती धरावें॥

तर लोक हो.. रघुनायक म्हणजे कोण? आमचे पक्षधुरीण बरं.. रघुनायकास ध्यानी मनी स्वप्नी बसवावे.. समर्थ सांगून गेलेत..

न बोलें मना राघवेवीण कांहीं
जनी वाउगें बोलता सुख नाही॥

करीं रे मना भक्ति या राघवाची
पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची॥

तर आम्ही त्यामुळे सर्व चिंता त्यागिली. सदैव त्यांच्याच चिंतनात आम्ही वेळ घालवितो.. अंथरूणातून उठताच प्रभातसमयी ही त्यांचेच नाव..

प्रभाते मनी राम चिंतीत जावा

पुढे वैखरी राम आधी वदावा॥

राम म्हणजेच राघव.. रघुनायक.. म्हणजे आमचे पक्षातील वरिष्ठ. आणि वैखरी म्हणजे वाणी बरे महाराजा.. आपल्या ईशभक्तीचे सुख अवर्णनीय आहे.. त्या भक्तीने होतो तो दुःखाचा नाश .. तेव्हा समर्थ म्हणतात.. दुःखाची स्वयें सांडि जीवी करावी..

महाराजा.. समर्थच सांगून गेलेत.. भक्तीचे बळ अतुलनीय आहे.. भक्तीचे फळ अपूर्व आहे.. तेव्हा

मना सज्जना भक्तिपंथेचि जावें

तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें॥

आपापला श्रीहरी आपल्याला पावलाच पाहिजे ..

भक्तीने काय साध्य होत नाही? फक्त आपापला रघुनायक आपण शोधावा.. कां? कारण समर्थ म्हणतात .. मना राघवेंवीण आशा नको रे.. तोच त्राता, तोच उद्धार कर्ता.. तोचि कर्ता आणि करविता.. त्यामुळे उठता बसता कार्य करता जळी स्थळी आपला रघुनायक पहावा..

मना उन्मनी शब्द कुंठीत राहे।
तो रे तोचि तो राम सर्वत्र पाहे

मंडळी, आपला राघव म्हणजे कोण? तर जया वर्णिती वेद-शास्त्रे-पुराणे. समर्थ सांगतात .. आपले नेतृत्व म्हणजे त्रिलोकी प्रसिद्ध असे .. तेव्हा त्यांची महती काय वर्णावी महाराजा .. आणि त्यांचा कोप ओढवून घेतला तर..

बळें आगळा राम कोदंडधारी
महाकाळ विक्राळ तोही थरारी॥

पुढे मानवा किंकरा कोण केवा
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥

तर अशा या सर्वशक्तिमान जगन्नियंत्याचे प्रभातकालीन स्मरण केल्याने काय होते? जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा. समर्थ सांगून गेलेत ..

जगी पाहता देव कोट्यानुकोटी

जया मानली भक्ति जे तेचि मोठी॥

म्हणे दास सायास त्याचे करावे
जनीं जाणता पाय त्याचे धरावे॥

समर्थांचा आदेश. पाळणे भाग आहे महाराजा.. आणि असे जे करतात.. ते धन्य.. जनीं तोचि तो मानवी धन्य होतो.. समर्थ त्यांना कामधेनुची उपमा देतात.. ज्यांच्या योगे सत्तायोग घडून येतो.. त्यांची तुलना अन्य कुणाशी कशी करावी?

मना राम कल्पतरु कामधेनु
निधी सार चिंतामणी काय वानूं॥

जयाचेनि योगे घडे सर्व सत्ता
तया साम्यता कायसी कोण आतां॥

अशा कल्पवृक्षाखालील कामधेनूकडून मनोरथ पूर्ण होणारच महाराज.. पण समर्थ हे सांगतानाच पुढे सबुरीचे बळही सांगून जातात. सदा नम्र रहा.. मनास जास्त संवेदनशील बनवणे म्हणता

आपल्याच अधोगतीस निमंत्रण..  वरिष्ठांपुढे मान तुकवित रहा.. वाकवित रहा.. लवचिक व्हा ..

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे
मना बोलणे नीच सोशीत जावें॥

स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे
मना सर्व लोकांसि रे नीववावें॥

रामदासांची ही शिकवण पाळण्यास कठीण.. कधी मनस्ताप होईल.. कधी क्रोध अनावर होईल .. पण मन:शांति ढळू न देणे.. समर्थच इशारा देतात.. न होतां मनासारिखें दु:ख मोठे.. तर समर्थ सांगून गेलेत.. नीट लक्ष देऊन, कान देऊन ऐका जनहो ..

जनीं सर्वसूखी असा कोण आहे
विचारें मना तुंचि शोधुनि पाहे॥

आपणास हवे ते पद, हवे तेव्हा, हवे तसे मिळेलच असे नाही .. पण संयम ठेवा. नको रे मना क्रोध हा खेदकारी.. रागावर नियंत्रण

ठेवा. समर्थ म्हणतात, पुढे सर्व जाईल काही न राहे .. क्रोधाने फक्त खेदच निर्माण होतो महाराजा .. तर यावर उपाय काय? एकच..

रघूनायकासारिखा स्वामि शीरीं
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी॥

नाहीतर काय होईल महाराजा.. बघा समर्थवाणीची ताकद बघा. तीनशे वर्षांपूर्वी काळाच्या पुढे पाहणारे समर्थ रामदास.. काय म्हणून गेले?

मना सांग पां राखणा काय जाले
अकस्मात ते राज्य सर्वै बुडाले॥

नीट समजून घ्या.. अकस्मात ते होऊन जाते. आपले राज्य आपले संस्थान कितीही मजबूत असो.. श्रेष्ठींची मर्जी खफा झाली तर.. अकस्मात होणार होऊनि जाते.. तेव्हा महाराजा, पक्षाची सेवा करावी.. अखंड सेवा.. अविरत सेवा.. चारचौघात जास्त बोलू नये .. पण आपापल्या राघवाची महती मात्र सांगित जावे ..

मना रे जनीं मौनमुद्रा धरावी
कथा आदरे राघवाची करावी॥

नसें राम ते धाम सोडूनि द्यावे
सुखालागिं आरण्य सेवीत जावे॥

समर्थ सांगतात .. जिथे आपले धुरीण नाहीत तिथे आपले काय काम? त्यापेक्षा वनवास पत्करला .. त्यांच्यासाठी नित्य जीव झिजवावा.. आणि अशा या

जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही अशा सर्वोत्तमाचा दास बनून रहावे .. हाच आपला धर्म आहे..

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा
सदा रामनामें वदे नित्य साचा॥

स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥

तर अशा भगवंताची कृपा आपल्यावर झाली तर काय कमी आहे आपल्याला?

अखंडीत भेटी रघूराजयोगू
मना सांडीं रे मीपणाचा वियोगू॥

तर अशा राजयोगाची फळे मिळतात. मिळाल्यावाचून राहात नाहीत .. एकदा समर्थाघरिचे श्वान त्यास सर्वही देती मान इतके लक्षात आले की मग सारेच सोपे सुलभ.. मग

समर्थाचिया सेचका वक्र पाहे
असा सर्व भुमंडळी कोण आहे॥

तेव्हा..

जगीं होइजे धन्य या रामनामे
क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमे॥

त्यांनतर आपापला रघुनायक आपल्याला अभय देईल. मग आपण आपल्याला हवे ते करण्यास मुक्त ..

जयाचेनि नामें महादोष जाती
जयाचेनि नामें गती पाविजेती॥

जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥

पण महाराजा.. मग घोडे अडते कोठे? अहंभाव.. कोरडाच अभिमान.. मी पणा.. तो सोडा.. आपापल्या राघवाचरणी लीन व्हा. समर्थ सांगतात .. मना वीट मानू नको बोलण्याचा

नको रे मना शीकवूं पूढिलांसी
अहंभाव जो राहिला तूजपासी॥

अहंभाव ज्या मानसीचा विरेना
तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना॥

बहु नाम या रामनामी तुळेना
अभाग्या नरा पामरा हे कळेंना॥

अशांना समर्थ अभागी म्हणतात.. पामर म्हणतात..  तर अशा पामरांनी करावे ते काय?

जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची
तया भोजनाची रुची प्राप्त कैची॥

हरीचिंतने अन्न सेवीत जावे
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें॥

अन्यथा.. अन्यथा तुला विचारतो तो कोण? जिवा मानवा किंकरा कोण पुसे.. थोडक्यात जन हो.. आहे हे असे आहे..

अती आदरें सर्वही नामघोषे
गिरीकंदरी जाइजे दूरि दोषें॥

हरी तिष्ठतू तोषला नामघोषें

विशेषें हरामानसीं रामपीसें॥

श्रेष्ठींचा नामघोष करत रहावा. प्रभातकाळी तर चिंतन करावेच पण उठता बसता कार्य करिता रघुनायकाचे स्मरण करीत रहावे ..

सदा सर्वदा राम सन्नीध आहे
मना सज्जना सत्य शोधुन पाहे॥

तर जन हो.. राघवाची भक्ती हीच असे शक्ती. तेव्हा आपापला राघव शोधा लोक हो.

जया मानला देव तो पुजिताहे
परी देव शोधुनि कोणी न पाहे॥

तेव्हा त्या राघवाची सदा सर्वदा भक्ती करा.. नामस्मरण करा. नामस्मरणाचा महिमा अगाध आहे. समर्थ सांगून गेलेत..

सदा सर्वदा योग तुझा घडावा
तुझे कारणी देह माझा पडावा॥

भक्तीची ही अनोखी ताकद आहे महाराजा.

तेव्हा, सदा सर्वदा प्रीती रामी धरावी.. श्रेष्ठींचे गुण पहा.. ते या गुणामुळेच धुरीण जाहले हे समजा. उगाच उडदामाजी काळे गोरे, काय निवडावे निवडणारे म्हणून रडत बसू नका..

नसे पीत ना श्वेत ना श्याम कांही
नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं॥

जगी पाहता देव कोट्यानुकोटी
जया मानली भक्ति जे तेचि मोठी॥

तर जन हो.. लोक हो.. मोठया भक्तिभावाने हे निरूपण ऐकावयास आलेल्या श्रोतृवृंदास.. ह.भ.प.बबनराव पंडितराव यांचे खास सांगणे आहे..

मुखे बोलिल्यासारिखे चालताहे
मना सद्गुरु तोचि शोधुनि पाहे॥

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी काय करावे जन हो. समर्थ सांगून गेलेत.. आपल्या आपल्या राघवाचा शोध घ्या.. त्याची भक्ती करा.. आपल्या राघवापुढे नतमस्तक व्हा.. त्याची सेवा करा.. त्याचे आदेश पाळा .. यश तुमचेच आहे..

म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे
मना संत आनंत शोधुनि पाहे॥

आमचे एक शाळासोबती मुंबईत बसमध्ये कंडक्टर आहेत.. ते सदैव एक संदेश देत असतात.. पुढे चला.. पुढे चला.. तर आपणही आयुष्याच्या मार्गिकेतून पुढे सरकत रहावे.. आपापल्या देवाने दाखवलेल्या मार्गावर मार्गक्रमणा करत रहावे.. मना सर्वदा हित माझे करावे हे सदैव ध्यानी ठेवावे.. आज राज्यमंत्रीपद आहे.. उद्या पुढचे काही .. अजून पुढे अजून पुढील काही. एक दिवस असा येईल महाराजा .. आम्हीच स्वतः धुरिणांत गणले जाऊ.. जनता जनार्दन आणि वरिष्ठ नेतेगण या साऱ्यांच्या कृपादृष्टीने.. महाराजा आयुष्य सुंदर आहे.. ते अजून सुंदर करा.. आयुष्य तलम कापड असेल तर त्यावर भरतकामाची नक्षी विणा .. समर्थ सांगून गेलेत तसे

मना सर्वदा सज्जनाचेनि योगें

क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे॥

क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी.. तेव्हा प्रत्यक्ष क्रिया करा.. जय जय रघुवीर समर्थ ..

बोला पुंडलिक वरदे हारी विठ्ठल ..

श्री रामदास ज्ञानदेव तुकाराम..

जय जय रामकृष्ण हरी

जय रामकृष्ण हरी..

जय जय रघुवीर समर्थ..

## मस्का पॉलिशी!

मधु माजगावकर रस्त्यात भेटला.. अगदी खुशीत दिसत होता. मधुच्या चेहऱ्यावर मधुर हास्य.. म्हणजे एका कानापासून दुसऱ्यापर्यंत तोंड विस्फारून विलसत असलेले हासू तोंडावर. नेहमी चिराईताचा काढा घेऊन भटकणारा तो आज अचानक हसताना दिसतोय? सूर्य उत्तरेकडे उगवला की काय? एरव्ही हसण्यासाठी पैसे लागावेत म्हणून असा निर्हसरा असावा असा संशय यायचा मला. पण आज गाडी खुशीत होती.

"काय एकदम मजेत?"

"अर्थात .. अर्थातच. चल तुला चहा पाजतो.."

जवळच्या शंकरविलास हिंदू हॉटेलात बसून आम्ही त्या जागेचे भाडे वसूल केल्यासारखे बसलो. एक एक कप चहाच्या पैशात गप्पा मारायला जागा मिळाली.

"अरे, तुला सांगू, प्रमोशन मिळाले मला. म्हणून खूश आहे मी."

"अर्थात. खूश होण्यासारखीच गोष्ट आहे. ग्रेट."

"तेवढेच नाही. माझ्या पुढच्या दोनतीन जणांपुढे गेलो मी. म्हणजे साधारण दोन वर्षे आधी प्रमोशन .."

मधू तसा कॉलेजात हुशार फारसा नव्हता. कामाला बरा म्हणावे तर बाकी ठिकाणी तो गलथानपणासाठीच प्रसिद्ध होता. मान मोडून काम करणे त्याची खासियत होती असेही नव्हते. मागे एकदा त्याच्या ऑफिसात गेलेलो तर हे महाशय काम सोडून इकडे तिकडे टिवल्याबावल्या करत फिरत होते.

"काम काय रे होत राहाते. जगात कोणाचे कोणावाचून अडते आणि अडलेय का? उगाच ते सारे कामसूपणाचे बेअरिंग घेत जणू ऑफिस आपणच चालवतो असा आव आणतात.."

"पण मग तुझे काम?"

"हा.. हा.. तुला नाही कळणार. सकाळपासून मी दुसऱ्याच कामात बिझी आहे. बॉसच्या घरी प्लंबर पाठवायचाय. ते अरेंज करतोय.."

खूप वर्षे झाली तेव्हाची ही गोष्ट आठवली मला. मधूच्या चेहऱ्यावरच्या रेषा फक्त बॉसचे नाव घेताना हसल्यासारख्या हलत होत्या. बाकी वेळी निर्विकार.

थोडक्यात अशा या मधूला एकाएकी इतरांना डावलून प्रमोशन मिळावे यात मला आश्चर्य वाटावे यात आश्चर्याची काही बाब नव्हती. पण त्याच्यासमोर ते दाखवणे प्रशस्त दिसले नसते, म्हणून तोंडदेखलं म्हणालो, "अरे वा! चांगलाच आहेस तू. शेवटी एफिशियन्सी पेज.. हो की नाही ..?"

"डोंबलाची एफिशियन्सी मित्रा."

स्वतः मधुच स्वत:बद्दल असे म्हणत होता! तेही त्याच्याच प्रमोशनसाठी त्याच्याच पैशांनी चहा पाजताना!

"या जगात काम करूनच दाम मिळत असतं तर जग फार वेगळे झालं असतं. ससा आणि कासवाच्या गोष्टीत कासव जिंकते. जिंकायलाच हवे. शेवटी लहान मुलांसाठी निरागस नि निष्पाप मनाने वाचायची गोष्टय ती. खऱ्या आयुष्यात हरूनही ससा जिंकू शकतो. रीतसर कासव जिंकलाय हे दिसूनही. म्हणजे तो अंपायर आपल्या बाजूला हवा इतकंच. मग कासवासारखी ढोरमेहनत.. खरेतर कासवमेहनत कशाला करावी? आपली मेहनत योग्य जागीच वापरा की.."

"म्हणजे? मेहनतीला किंमत नाही?"

"आहे. आहेच. पण त्याहीपेक्षा जास्त महत्त्वाच्या गोष्टी जगात आहेत.. आपला प्रॉब्लेम कुठेय ठाऊकै..?"

"कुठेय?"

"अरे, आपण जन्मापासून ते मोठे होईतो पोरांना असल्या आदर्शवादी गोष्टी ऐकवतो. पोरंच ती. त्यांना त्या वयात पटतात गोष्टी. मोठे होत गेले की त्यांना बाहेर जग दिसते ते नेमके उलटे. त्यातील शहाणे मग समजून जातात.. शिकतात स्वतःच. जे काही बोधकथांत वगैरे सांगतात ते गोष्टीतच ठीक. त्यात सत्याचा लवलेश नाही. गोष्टींत काय, हवे ते घडवता येते. पण त्यात खरी त्या गोष्टींची चूक नाहीच.. बघ ना. आता असे तर सांगून चालणार नाही .. ससा कासवाशी शर्यत हरला.. पण पंचांनी कुठला तरी नियमावली काढली बाहेर.. त्यातल्या कुठल्यातरी कलमाच्या उपकलमाच्या कुठल्यातरी उप उप कलमान्वये कासव शर्यतीतून डायरेक्ट बाद केला गेला. ससा जिंकला. आधी खरी गाजरं खात झोपलेला. आता खुशीची गाजरं खात आनंदात झोपला घरी. खरी घडणारी गोष्ट हीच. पण आपली व्यवस्था हे सांगण्याच्या आड येते. गंमत म्हणजे प्रत्यक्ष कृतीत हे केले तर चालेल .. म्हणजे आपण करू ही. पण बोलून दाखवून चालायचे नाही. कोणाला असे कर .. अमुक ठिकाणी असा वशिला लाव.. कुणाला कसे खिशात टाक..

असले जीवनोपयोगी सल्ले कुणीच देत नाही. दिलेले चालत नाहीत. कारण मग तुम्हाला मग प्रतिष्ठा मिळणार नाही .. अजून गंमत म्हणजे मात्र ही प्रतिष्ठा याच उपायांनी व्यवस्थित विकत घेता येते.. आहे की नाही गंमत? जितकी गाठीला पुंजी अधिक तितकी प्रतिष्ठा अधिक! तिथे मग धनप्राप्तीचा मार्ग महत्त्वाचा नाहीच. फक्त बोलून दाखवून चालायचे नाही. धनाचा स्त्रोत सांगून चालायचे नाही.. थोडक्यात काय बी वर्ल्डली वाईज .."

"पण याचा संबंध तुझ्या प्रमोशनशी?"

"अर्थात. अर्थातच आहे. माझ्या दोन सीनियर्स ना मागे टाकायचे तर दोन मार्ग होते. ससा किंवा कासव.. कासवासारखी मेहनत करून राबून मिळाले असते यश किंवा नसतेच मिळाले. पण सशासारखे वागून मात्र हमखास .."

"म्हणजे?"

"तुला वाटेल मी कसा बिनधास्त सांगतोय .. पण सांगितले म्हणून काही बिघडत नाही. शेवटी उघड गुपित आहे ते. कुणी माझ्या मागून बोलेलच. ते मीच बोलतो की. उगाच पाठीमागे गाॅसिप कशाला .."

"म्हणजे काय?"

"म्हणजे? मस्का पॉलिशी इज द बेस्ट पॉलिसी! मागे कसे ऑनेस्टी इज द बेस्ट पॉलिसी म्हणायचे तसे मस्कापॉलिशी इज द

बेस्ट पॉलिसी! मस्का म्हणजे लोणी किंवा बटर. मराठीत कुणी मस्का मारणे म्हणतात तर इंग्रजीत बटरींग अप! म्हणजे भाषा बदलली तरी वाक्प्रचारात बदल नाही! युनिव्हर्सल प्रकार असणार हा! स्थळ, काळ नि भाषा.. कसलेच बंधन नाही. तू म्हणशील हे प्रकरण काय आहे.. तर सांगतो. आमच्या ऑफिसातला बॉस.. पहिले काही वर्ष होता अय्यरन नावाचा. त्याच्यासाठी मी इडली आटा नि सांबार पावडर घरपोच घेऊन जायचो. कधी डोसा तर कधी मेदूवडापीठ ही. त्या काळात मी दाक्षिणात्य बनत चाललो होतो.. म्हणजे स्त्री दाक्षिण्यासारखे.. दक्षिणी बॉस दाक्षिण्य! अय्यरसाहेब मग ट्रान्सफर घेऊन गेला. जाईपर्यंत आय वाॅज हिज बेस्ट एम्प्लाॅयी होतो. अगदी सर्टिफिकेट पण मिळाले तेव्हा. अय्यरनसाठी दाक्षिणात्य स्किल्स डेव्हलप केली. काही मद्रासी शब्दही शिकलो. लुंगी घालून ऑफिसात जायचे बाकी होते तोच अय्यरनची बदली झाली. नि आला तो बॉस डायरेक्ट उत्तरप्रदेशी, तिवारी. म्हणजे आता इडली डोशाचे घाणे बंद. आता नव्याने हिंदी शिकणे आले. तुला तर माहितीच आहे आपले हिंदी किती ग्रेट असते ते. पण मी शिकलो. आहिस्ता आहिस्ता हमने हिंदीका ज्ञान हासिल किया. तिवारीच्या घरची कामे मी जाता येता करायला लागलो. अगदी त्याच्या लहान मुलास कधी शाळेत सोडण्यापासून. चंद ही दिनोंमें मानों हम उनके खास हो गए. तिवारीजी का हमपर खास लोभ. हमसे और हमारे कामसे वे बहुत

प्रभावित हुए. अरे, बाकी कामं काय कोणीही करेल. बॉसच्च्या डोक्यावरचे ओझे हलके केले की त्याची एफिशियन्सी वाढते की नाही? एका दृष्टीने ते ही ऑफिसचेच काम नाही का?"

मधूचे लॉजिक बिनतोड होते.

"एकच पॉलिसी ठेवावी. आपल्या वर जो कोणी असेल .. म्हणजे ज्याच्या हाती आपल्या भविष्याची दोरी.. तो.. त्याला खूश करून सोडावे. तो खूश तर आपण खूश. आणि त्याला काय वाटेल त्याचा विचार करू नये. बहुतेक वेळी तो ही त्या ठिकाणी असल्याच उपायांनी पोहोचलेला असतो. तेव्हा नि:शंक मनाने कामाला लागावे."

"मला वाटतं अजून एक चहा घ्यावा.."

"घे की. ब्रेड बटर पण मागव. बटर महत्त्वाचे .."

पुढच्या चहाच्या कपाबरोबर तो बटरचे महत्त्व सांगत बसला.

"तुला सांगतो सगळीकडे हे बटर महत्त्वाचे. बाकी मेद किंवा चरबी कितीही बदनाम असो, वंगण म्हणून तीच कामी येते. म्हणजे कुणाला हिणवायला कुणी म्हणते, काय चरबी चढलीय .. किंवा आंग्ल भाषेतही .. फॅट हेड वगैरे. कुणी काही करताना चूक केली की फॅट फिंगर.. कुणाला चिडवायला किंवा डिवचायला.. फॅटसो.. भाषेचे बंधन नाही .. अगदी घट्ट शर्टातून तुंदिलतनू पोट बाहेर डोकावावे तसे भाषेचे कुंपण तोडून मेद बाहेर ओसंडत असतो. पण

चाकं काय किंवा एखादे मशीन काय .. कुरकुरायला लागले की त्याची ती कुरकुर बंद करायला हेच वंगण कामी येते.. इतके की आंग्ल भाषाही त्याला वेल ऑ इल्ड मशिनरी म्हणते. थोडक्यात शास्त्रात घर्षणाने होणाऱ्या गोष्टींचे वर्णन असते.. नुसतीच कुरकुर नव्हे, तर उष्णता निर्माण होणे.. भागांची झीज होणे, ऊर्जा वाया जाणे.. इत्यादी अनेक गोष्टी हे घर्षण घडवून आणते.. ते टाळायचे तर त्यात वंगण हवेच.. आणि वंगण म्हणजे काय? तर त्यात तेलासारखे स्निग्ध पदार्थच कामी येतात त्यासाठी .."

थोडक्यात ब्रेडबटरमधला बटर हा फारच उपयुक्त पदार्थ असणार ..

"तर आपण काय करावे माहिती आहे का? जिथे जिथे गरज आहे तिथे तिथे हा मस्का लावत सुटावे. एकदा घर्षण कमी झाले ना की पुढे सगळे सुरळीत होत राहाते. तिवारी गेल्यावर बोस म्हणून बंगाली बाबू आले नवे बॉस.. आमार शोनार बांग्ला म्हणत मी मासे खाऊ लागलो. एरवी पक्का शाकाहारी.. मत्स्याहारी झालो. गरज पडली नाही म्हणून नाहीतर मासेमारी ही केली असती. रवींद्रसंगीत ऐकायला लागलो. दोनचार बंगाली सिनेमाही पाहिले बोलायला विषय हवा म्हणून. शांतिनिकेतनाबद्दलही बोलायला लागलो. आपल्याला काय, काही करून बाबूमोशाय खूश झाल्याशी मतलब. असे नवनवीन बॉसेस बदलत राहतात म्हणून आपल्याला तसे बदलावे लागते. पण कुणीही येवो.. आपली पॉलिसी एकच..

मस्का पॉलिशी. योग्य लोकांना योग्य वेळी योग्य तितका मस्का लावणे .. घर्षण कमी झाले की यंत्र व्यवस्थित चालते. ऊर्जा वाया जात नाही. मस्का लावणे हेच वंगण आहे. काही लोकं ना उगाच आपल्या इगो मध्ये अडकून बसतात. नि मग नशिबाला दोष देत मागे पडतात .."

"हे तू इतक्या सहज सांगतोयस?"

"अर्थात. आधी म्हणालो ना, आपल्याकडे हिप्पोक्रसीच जास्त. बोलायचे एक करायचे भलतेच. शिकवणूक वेगळी, वागणे वेगळे .. परत घोषणा काय? सत्यमेव जयते! मी सत्यावर विश्वास ठेवतो. उगाच काहीतरी गोलमोल सांगत नाही तुला. पण माझ्या प्रमोशनचे रहस्य हे आहे. अरे बोस बाबू इज ब्हेरी ब्हेरी ह्याप्पी विथ मी. ही हॅड टू गिब्ह मी प्रामोशान.."

पुढेही मधु काही काही सांगत होता. दोन कप चहा नि ब्रेडबटर च्या साथीने प्रॅक्टिकल आयुष्यातील एका सत्याचे दर्शन त्याने घडवले. सांगताना काहीही सांगोत कुणी, हॉनेस्टी .. किंवा ऑनेस्टी इज द बेस्ट पॉलिसी..

.. मस्का म्हणजे बटर लावल्यावर नुसती माशी म्हणजे फ्लाय ही बटर फ्लाय होते की नाही? तर मधुच्या ब्रेन वा ॅशिंगनंतर पटलेय मला, मस्का पॉलिशी हीच बेस्ट पॉलिसी!

## बुटक्यांच्या देशात ..

आम्ही निघालो तर समोरचा दरवाजा अगदीच छोटा होता..

देशच बुटक्यांचा..

.. तर दरवाजा कशाला उंच हवा? अर्थात आम्ही तसे भिंतींतूनही जाऊ शकतो. आमच्या आत्म्याला कोण अडवून ठेवणार?

पण आम्ही दरवाजातूनच आत शिरलो.. शिस्त हवीच. आत्मा असलो म्हणून काय झाले?

आजूबाजूस सगळीकडे झुडपं होती.

वृक्ष म्हणावा असा कोणी नाही ..

गवत चोहीकडे माजलेले.. अस्ताव्यस्त वाढलेले..

नाही म्हणायला काही झुडुपांवर फुलं उमललेली. तेवढाच नयन सुखकारक भाग.

फुलं पण तशी छोटीशीच.. रानफुलंच ती पण त्या झुडपांच्या मळक्या हिरव्या रंगामध्ये तेवढाच उठून दिसणारा फुलांचा रंग.

गवतावर इटुकली पांढरी फुलं.

छोटी छोटी फुलपाखरं उडत होती.

दूर दूर पर्यंत असलेच दृश्य. छोटी झाडे.. छोटी पाने.. फुलं छोटी.. फळ येणारी झाडंच नसावीत?

आम्ही पुढे जात होतो.

अजून पर्यंत एकाही माणसाचं दर्शन झालं नव्हतं. एरवी निसर्गाची हिरवाई कशी मनमोहक दिसते. इथे मळलेला हिरवा रंग. बहुतेक ती माती उडून पानांवर बसलेली.. चिटकून.

पावसाची सर आली तरच धुवून निघेल.

मळकट रंगच तो. कशाने तरी धुवून काढायलाच हवा. तशी सोय असते.

एकदा धुवून काढले की पुन्हा पहिल्यासारखेच तजेलदार होता येतं.. धुवून काढायला कधी पाऊस लागतो..

तशी पवित्र नदीत डुंबण्याची सोय आहे.. पण ती माणसांसाठी. झाडांना ती सोय नाही.

पुढे मग माणसांचा प्रदेश लागला.

माणसंच माणसं. सगळीच बुटकी. पेंग्विन नावाचे पक्षी जसे लायनीत चालतात तशी चाललेली. तशी सगळीच माणसं सारखी दिसायला. एकासारखी एक..

आम्ही पाहात पाहात पुढे निघालो..

सगळे बुटके शिस्तीत चाललेले. कदमताल करत.

आम्ही त्या शिस्तीने प्रभावित होत होतो. बुटके सारे तोंडातून एकही शब्द न काढता चालले होते.

सगळ्यांनी आपले हात मागे बांधून घेतलेले.

आम्ही बुटक्यांच्या त्या देशातले एकासारखे एक सगळे पाहून भारावून गेलो.

आम्हाला याची सवय नव्हती म्हणावे, तर तसे काही नाही. आम्ही देखील याच देशातील.

आम्ही इथेच जन्मली. आम्ही मेलो ते देखील इथेच. पण आमच्या वेळी हे असे नव्हते.

नव्हते म्हणावे तर नव्हतेच असे नाही.

पण आम्ही वेगवेगळ्या उंचीची माणसं होतो. अशी शिस्त आमच्यात नव्हती. ना ही आमचे हात असे स्वतःच बांधून मागे धरून आम्ही चालायचो. चालायचो ते इतस्ततः विखरून.

ना शिस्त ना काही.

आमची तोंडं चालायची. कित्येक तर एकमेकांशी एकाच वेळी बोलायचे.

कुणी भांडायचे, कुणी कुणाची उणीदुणी काढायचे. कुणी गुणगान करायचे, कुणी शिव्याशाप.

कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही असली स्थिती. म्हणजे परिस्थिती.

त्या गलक्याने सारे काही अशांत अशांत..

आता बराच बदल घडलाय..

आणि बऱ्यासाठीच घडलाय तो.

आमच्या वेळीही असे बनण्याचा प्रयत्न चालायचा. पण तसे घडले मात्र नव्हते.

आम्ही गेलो त्यानंतरची ही प्रगती असावी..

आम्ही सारे निरखून पाहात हरखून गेलो होतो.

अशा शिस्तीत प्रगती किती दूर असणार?

तशी काही तर समोरच दिसत होती.

म्हणजे आम्ही चाललो होतो तो रस्ता अत्यंत गुळगुळीत आणि रूंद होता. बुटक्यांच्या प्रचंड फौजा जायच्या तर तो तसा हवाच..

अर्थात आधी रस्ता तसा बनला की आधी फौजा हे मात्र आम्हाला कळत नव्हते.

आम्ही चाललो होतो.

समोर शिस्तीत एका सारख्या एक दिसणाऱ्या बुटक्यांच्या फौजा चाललेल्या, एखाद्या मिशनवर निघाव्यात अशा.

आणि एखाद्या मशिनचा पट्टा चालावा तशा.

एखाद्या सैनिकी शिस्तीत सारे चालू होते.

पावलांचा खाड खाड आवाज सोडला तर सारे काही शांत शांत होते.

आम्ही आजूबाजूस पाहिले ..

म्हटले अशा शांततेत पक्ष्यांचे तरी आवाज येतील. आणि समोरच्या निरभ्र आकाशात नि आसमंतात मोठमोठे पक्षी तरी दिसतील. पण नाही.

सगळीकडे फक्त चिमण्या.

बाकी पक्षी गेले कोठे?

आम्ही अजूनच निरखून पाहिले .. होते.. सगळे पक्षी होते.

अगदी झेप घेणारा गरूड नि दिगंतरा जाणारी घार ही..

पण सगळयांचा आकार चिमणीइतका.

त्या शांततेत नि एकीकरणात कावळेही चिव चिव करायला शिकलेले दिसत होते.

असल्या शिस्तीचे आम्हाला अप्रूप वाटल्यावाचून राहिले नाही.

आम्ही पाहिले तर एकासारखी एक घरे दिसू लागली. सारी घरे उंचीने छोटी.

बुटक्यांना उंच घरे कशाला हवीत?

आणि एकसारख्या एक बुटक्यांसाठी घरे ही एकासारखी एक दिसत होती.

आपापले घर येताच एक एक बुटका त्यात शिरत होता.

पण बाकी बुटक्यांच्या फौजा मात्र अखंड चालतच होत्या.

आता आम्ही थकत चाललो होतो.

आत्मा झाला तरी त्यास थकवा येणारच.

तसा आम्हालाही आला होता.

परतावे म्हटले तर पाय निघत नव्हता.

आमच्या वेळीस बेशिस्त अन् अस्ताव्यस्त देश असा एकसंध झालेला पाहून आमचे एरवी डोळे भरून आले असते.. पण आत्म्यांना ती सोय नाही.

आम्ही तसेच रेटत पुढे निघालो..

खरेतर त्या फौजांचे दृश्य असे की त्यावरून नजर हटू नये.

.. आणि वरून चालता चालता आम्ही कशावर तरी जोरदार धडक दिली..

आत्म्यास तशी उडण्याची सोय आहे.

आणि या बुटक्यांच्या देशात आम्ही वरून उडता उडता कशाला धडक देऊ असा संशयही आम्हाला नव्हता आला.

तेव्हा त्या फौजांच्या कवायती सदृश चालण्याचे मनोहारी विहंगम दृश्य पाहता पाहता आम्ही कशाला तरी धडकलो होतो..

तो एक पुतळा होता..

"सॉरी हां.. मला अंदाज नव्हता इथे इतके उंच काही असेल म्हणून .. इतक्या बुटक्यांच्या प्रदेशात इतके उंच काही.."

"नाही.. मी इथे नाही .. माझा पुतळाही नाही .."

"मग माझी धडक ..?"

"अरे भिंतीतून आरपार जाणारा आत्मा असा पुतळ्यावर आपटेल की काय?"

"ते ही खरेच.. मग?"

"मी ही आत्माच.. घुटमळता.."

"म्हणजे आत्म्यांची धडक?"

"म्हणजे काय? आत्म्यांचीच धडक ही."

"पुतळा.. म्हणजे कुणी मोठी व्यक्ती असणार तुम्ही .."

"मी? मला नाही ठाऊक किती मोठा होतो मी. पण माझा पुतळा पाडला गेला. कुणी त्यावर बंदुकीच्या गोळया चालवल्या, कुणी हातोड्यांचे घाव घातले. मी आधी गेलेलोच .. मग पुतळ्यातूनही गेलो.. पण माझा आत्मा घुटमळतोय येथे .."

"अरे रे.. पण ही प्रगती पाहून तुमचे डोळे निवले असतील.. असा एकसंध .. एक दिल .. एकासारखा एक देश.."

"तुला काय वाटते? पण ते माझ्या या घुटमळणाऱ्या आत्म्याला पटत नाही ना.. इथली शांतता जीवघेणी आणि हे यंत्रमानवासारखे एकाहून एक बुटके.. नाही पाहवत .."

"पण मला तर सगळीकडे प्रगतीच प्रगती दिसतेय.. मी आलो तेथपासून इथवर.. रस्ते नि पूल.. वाहतूक नि वेग.. सुबत्ता नि संपन्नता .. ना कोठे बेशिस्त.. ना बकालपणा.. सारे एकसुरात.."

"की एकसुरी? अरे, आम्ही स्वप्ने पाहिली ती माणसांना उंच बनवायची.. पण प्रत्यक्षात झालं ते उलटेच.. एकासारखे एक सगळे .. ते बनवण्यात सगळ्यात लघुत्तम म्हणजे छोटा कोण त्यासारखे

सारे बनवून साच्यातून काढले जातात .. त्यांच्या फौजा मग हव्या तशा हव्या तितक्या फिरवल्या जातात. इतक्या बुटक्यांसाठी इतके पूल न रस्ते हवेतच.."

"म्हणजे तुम्हाला नाही आवडले? की नाही पटले?"

"अरे, इथे आम्हाला नि आमच्या आत्म्याला विचारतो कोण? चित्त जेथ भयहीन म्हणत आम्ही स्वप्ने पाहिली.. आता सगळीकडे भयहीन नव्हे .. भयाण शातंता .. आत्म्याला ओरडता येत नाही. नाहीतर मी ओरडून शांततेचा भंग केला असता .. आणि त्याहूनही वेदनादायक काय ठाऊक आहे?"

"काय?"

"अरे, इथे कुणाला उंच व्हायचेच नाहीये.. काही उंच तर मुद्दाम बुटके झालेत. इथल्या व्यवस्थेत सगळ्यांना बुटकेपणातच धन्यता वाटतेय.."

"हं.. सारेच बुटके.. बुटक्यांच्या देशात.."

"तुला भाषा नाही येत नीट .. देश बुटक्यांचा असेल.. पण सारे बुटके नाहीत .."

"मग?"

"अरे, बुटक्यांत आणि खुज्यांमध्ये फरक असतो.. ह्या साऱ्या एका साच्यातून निघालेल्या या खुज्यांच्या फौजा.. आणि हा खुज्यांचा देश.."

आम्ही काही म्हणणार तोच तो पुतळ्यातला आत्मा की आत्म्याचा पुतळा नाहीसा झाला. आत्माही नाहीसा होऊ शकतो? हे आम्हाला एक नवीनच माहिती झाले.

आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. खाली नजर लावून पाहिले..

त्या खुज्यांच्या फौजा कदमताल करत कोणाच्यातरी कुठल्यातरी इशाऱ्यावर निघाल्यासारख्या सैनिकी शिस्तीत चालल्या होत्या..

.. आवाज त्यांच्या पावलांचा येत होता..

.. आणि बाकी सगळीकडे शांतताच शांतता होती..

## कोंडो विठ्ठलाची संक्षिप्त बखर

मलकापूर नामक एका राज्याच्या मालकाची ही बखर. मालक म्हणजे तेथील सत्ताधारी. लोकशाही असल्याने निवडणूक नामक चाळणीतून स्वतःच्या अक्कलहुशारीने बाहेर निघालेला नि त्यानंतर निर्वाचित राजेशाही चालवणाऱ्या श्री.दगडोजी धोंडोजी पळसे पाटील यांच्या कर्तृत्ववान कारकीर्दीची ही बखर. आम्ही लिहिणार.. कोंडाजी विठ्ठल मलकापूरकर. मलकापूर राज्याचे स्थानिक. सात पिढ्या आमच्या याच देशात वाढल्या. त्यामुळे आम्हास हे सारे इतिहासाचे

जे काही कडू-गोड बाळकडू वंशपरंपरागत मिळाले आहे. आमचे राजे श्री.रा.रा.पळसे पाटील यांच्या कर्तृत्वाचा आलेख इतिहासात नोंद करावा व चिरंतन जपला जावा या एका प्रयोजनाने आम्ही ही बखर लिहित आहोत. एक बदल मात्र आम्ही केला आहे. पूर्वी ज्या राजाचे वा राज्याचे नाव द्यावयाचे त्या नावे बखर ओळखली जाई. परंतु आम्ही मात्र आमच्या बखरीस आपलेच नाव देत आहोत. म्हणजे इतिहासावर आमचे नाव कोरण्याची ही एकच संधी आहे हे समजून. तर प्रस्तुत आहे कोंडो विठ्ठलाची बखर..

इतिहास संशोधनासाठी जुन्या पुराण्या बखरींचे महत्त्व परत सांगण्याची गरज नसावी. बखरींतून तत्कालीन संदर्भ लागतात. त्यावेळची सामाजिक

राजकीय परिस्थिती समजू शकते. बखरीमधील भाषा ही तत्कालीन असावी. त्यातील भाषेचे संदर्भही तत्कालीन असावेत. तेव्हाच्या विविध घटनांवर त्यात भाष्य असावे. आज एखादा संशोधक ते घेऊन बसतो .. भाषेचा अभ्यास करावा लागतो.. मग बखरीमधील मजकुराचा. म्हणजे इतिहास संशोधनात बखर वाङमय महत्त्वाचे. आणि त्यातून  खरंतर याहून महत्त्वाचे म्हणजे इतिहास संशोधन क्षेत्रात त्यामुळे काही रोजगार निर्मिती ही होते. म्हणजे भावी बेरोजगारीवर एक इलाज म्हणावा का?

असो. आम्ही आज कित्येकांस गतकाळातील घडामोडींवर डोकेफोड करताना पाहतो. कधी कधी दया येते. म्हणजे तेव्हाच्या घटनांवर लख्ख प्रकाश पाडणारे काहीच लिहून ठेवले नसावे? काही ठिकाणी ते सापडतेही. पण त्यासाठी किती मेहनत? तेव्हा त्या भावी इतिहास संशोधकांचे काम सुलभ करावे हा ही एक उद्देश आमच्या मनी आहे. तर अशा विविध बाबींचा सांगोपांग विचार करून आम्ही ही बखर लिहून ठेवत आहोत. पुढे मागे आम्ही नसू पण आमच्या ह्या बखरी त्यावेळच्या इतिहास संशोधनात महत्त्वाचा भाग बनतील. आमची भाषा हा तेव्हाचाही अभ्यासाचा एक विषय असेल. आमच्या भविष्यकालीन जनांना त्यातून आजच्या वर्तमानात म्हणजे भविष्यकालीन भूतकाळात डोकावता येईल. भविष्यातील पिढ्यांची चिंता आम्ही नाही तर कोण वाहणार. तेव्हा सांप्रत राजकीय सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारी ही संक्षिप्त बखर भविष्यकालीन पिढ्यांस नजरेसमोर ठेवून लिहित आहोत. सांप्रतकाली भूर्जपत्रे उपलब्ध नसल्याने ह्या साध्या कागदावर लिहिणे भाग आहे. भूर्जपत्रांवर लिहिले असते तर यास अधिक ऑथेंटिकत्व मिळाले असते असे वाटते. असो. नाइलाजाला काय इलाज?

## कोंडो विठ्ठलाची बखर

स्थळ मलकापुरी. वीस साल आधीची बाब. स्थानिक राज्यकारभारावर पकड ठेवोन असलेले राजे भागोजीराव रावराणे यांचा वचक पूर्ण देशी. भागोजीराजे दर पाच वरीस जाहले की निवडणूक नामक यज्ञ घडवून आणत. अश्वमेधासारिखा निवडणूक अश्व संपूर्ण देशभरात फिरवून आणिला जाई. त्यास अडवण्याची हिंमत कोणाची? ऐसी हकिकत कित्येक दशके चालली. भागोजींचा अश्व फिरणे केवळ एक उपचार म्हणून बनून राहिला. आणि भागोजींचे राज्य अबाधित राहिले. गावोगावी भागोजींचे गुणगान होऊ लागले. जनेच्छा असो वा नसो रयतेस ते करणे भाग पडो लागले. जनतेस असंतोष व्यक्त करणेही कठीण ऐसा समय आला. आणिक त्याउलट तीस संतोष व्यक्त करणे भाग पाडावे असे आदेश भागोजींच्या सही शिक्क्याने निघाले. जनतेस दुसरा पर्याय नसल्याने तीस तसे करावे लागत होते. म्हणजे मन एक सांगते अन शरीर दुसरेच काही सांगते ऐसे जाहले. भागोजीराजे आपलियाच मस्तीत गुंग जाहले. अश्वमेधाचा निवडणूक अश्व धाडण्याचा समय आला की त्यांस मस्तीतून जाग येई. देशकालात अनागोंदी माजली. जनतेस परेशानी सर्वत्र होवोन देश येथून तेथून कष्टी जाहला. स्थानिक जनांस हालअपेष्टा जास्त. सगळीकडे बेबंदशाही माजलेली. ऐसी हालत की रयत भंडावून भरडून निघालेली. परंतु भागोजीराजे सत्तासिंहासनावर मांड ठोकोन होते तसेच राहिले.

मलकापुरीचा वाढता असंतोष भागोजीराजेंच्या सत्ताधुंद नजरेतून सुटला. जाहले ऐसे की निवडणुकीचा घोडा दौडवण्याचा समय समीप आला. मलकापुरी दगडोजी धोंडाजी पळसे पाटील नामक तरण्या बांड युवकास हा अश्व अडवून यज्ञ जिंकण्याची ईर्ष्या निर्माण जाहली. आजवरच्या अश्वमेधाने बेसावध आणिक सत्तामदांध भागोजी राजे यांचे त्याकडे दुर्लक्ष जाहले. आपल्या साम्राज्यावरील न मावळणाऱ्या सूर्यास स्मरोन भागोजीराजेंनी अश्वास दिग्विजयास बाहेर सोडिले. इकडे पळसेपाटलांनी गनिमी कावा अवलंबिला. अश्वमेधाचा उधळलेला वारू अडवून त्यावरून स्वार दस्तुरखुद्द दगडोजी राजधानीत पोहोचले. भागोजींस पळता भुई थोडी जाहली. दगडोजी सिंहासनारूढ जाहले. आणि दगडोजींच्या राज्यास प्रारंभ जाहला. भागोजीरावांच्या संपलेल्या सद्दीबद्दल रयतेस ना खेद ना खंत जाहला. आजवर भागोजींच्या जुलुमातून होणाऱ्या सुटकेचे स्वप्न दाखवणारा कुणी मलकापुरी क्षितिजावर उगवला याचेच जनतेस अप्रूप. त्यात पळसेपाटील अति हुशार. जनरोष अन जनप्रक्षोभास इतकी वर्षे त्यांनी हवा देऊन त्या ठिणगीचा अग्नी चेतविला, त्याची धग भागोजीराजांस लागली असती तर राजे सावध जाहले असते. परंतु आपल्या उबदार महालाच्या आत सुरक्षित राजे गाफील राहिले अन

दगडोजी पाटलांनी त्याचा पुरेपूर फायदा उठविला. त्यात रयतेस आपण स्वत: एकमेव तारणहार असल्याचे स्वप्न पाडणे हा

पळसेपाटलांचा हातखंडा. भागोजीराजे नामक असुराचा संहार करण्यास दगडोजी एखाद्या देवासम धावोन आले अन दुष्ट संहार करोन मलकापुराचा उद्धार करविला.. हे चित्र रयतेच्या ध्यानी मनी चित्ती बिंबविण्यात दगडोजी यशस्वी जाहले. अन तेथेच त्यांची अश्वमेधातील विजयश्री निश्चित जाहली. आणि मलकापुरी पंत गेले अन् राव चढले हा इतिहास लिहिला गेला.

दगडोजी पळसेपाटील मलकापूरचे राजे जाहले. अश्वमेधातून आलेला नवा तरणाताठा अन् उमदा राजा म्हणून सगळीकडे त्यांचे स्वागत जाहले तर नवल नव्हते. पळसेपाटील महाराजांनी अशी सुरूवात अतिशय रूबाबदार रूपात केली. जन सर्व भारावून आपल्या नव्या राजाची अश्वारूढ छबी पाहण्यात गुंग जाहली. भागोजीराजाचा घोडा अडविणारा राजा महान असणार यांत जनांस शंका नव्हती. आणिक अशी शंका नसण्यास दगडोजी राजांची स्वत:ची युक्ती कारणीभूत होती. दगडोजीराजे तरूण होतेच. त्यात तडफदार. अत्यंत तल्लख बुद्धीचे तेज लाभलेल्या पळसेपाटीलांच्या या धाकल्या पातीने भागोजींच्या राज्याची लक्तरे वेशीवर टांगण्यास सुरूवात केली ती अश्वमेधाच्या आधीपासून. कोणास वाटेल की यज्ञ जिंकल्यानंतर त्याच खंड पाडोन दगडोजी कामास लागले असतील. परंतु अत्यंत चलाख पळसेपाटीलांनी गत कालीन दुर्दशेचे स्मरण जनतेस सतत करोन देणे ही शक्कल

लढविली. आपली रेषा दुसऱ्यापेक्षा मोठी करण्यास दुसऱ्याची रेषा लहान करणे हे अति सुलभ, हे तंत्र दगडोजींनी आत्मसात केले. मलकापूरच्या साऱ्या समस्यांचे मूळ भागोजीरावांच्या कारकीर्दीत कसे हे जनतेस समजावणे, स्वतः राजा म्हणून राज्यास पुढे नेण्याहून सुलभ इतकी व्यावहारिक बुद्धी दगडोजीरावांठायी होतीच. तिचा वापर करीत दगडोजी सिंहासनावरून राज्य हाकू लागले.

दगडोजी अत्यंत हुशार आणिक तल्लख बुद्धीचे. त्यांनी भागोजीराजांचा द्वेष सोडिला नसला तरी भागोजीराजे कित्येक वर्षे सिंहासनारूढ का आणि कसे जाहले याचा बारीक अभ्यास करणेही सोडिले नाही. रयतेस कशा प्रकारे झुलवावे याचा गाढा अभ्यास करोन ते कामास लागले. त्याबरोबर त्यांनी स्वतः साठी प्रकट आणि जनांसाठी अप्रकट ऐश्या चतु:सूत्री तयार करविल्या आणिक त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिधले. राजाचा निर्देश हा आदेश अन् हुकूम हे सर्वांस आजवर ठाऊक झालेले. त्यामुळे सक्त अंमलबजावणी होणार याबद्दल कोणाचिया चित्ती यत्किंचितही किंतु नव्हता. जनसामान्यांची अलिखित चतु:सूत्री येणेप्रमाणे:

१. राजाज्ञा न पाळणे हे देवाज्ञा होण्यास निमंत्रण

२. राजद्रोह हा राजाशी द्रोह, तद्नुषंगे राज्याशी.

३. राजाच्या कोणत्याही निर्देशास कोणत्याही प्रकारचा किंतु चित्ती आणणे हे सरकार दरबारी पाप अन् यथायोग्य सजेस पात्र

४. राजाज्ञेनुसार राज्यातील सकल जन सुखी घोषित केली जातील. या उप्परही कोणी दु:खी आत्मा आढळल्यास त्यास प्रथम क्रमांकाचे सूत्र विनाचवकशी लागू होईल.

दगडोजी ऐसे सुज्ञ. समस्त रयत टाकाच्या एका फटकाऱ्यात सुखी घोषित केल्याने समस्तांस तकरारीस वाव राहिला नाही. सुखी जन तकरार करण्यास घाबरू लागली. तकरार करणारी ती दु:खी हे हळूहळू जनमानसात रूजविले गेले. दगडोजींस तसा धीर अमाप. हे बीज रोविले गेले.. तयाचे रोप अन् तद् नंतर वृक्ष होण्यास लागणारा समय हाच आपल्या भावी सम्राटपदाची बीजरोपणी असल्याचे त्यांनी मनोमनी ताडले. त्याची फळे लगडली. जन सर्व या सवयीस रूळून गेले. तकरार करण्याची सवय जनांची सुटली किंवा त्यांनी ती सोडिली. राजाज्ञेची आता गरज राहिली नाही. दगडोजी राजेंच्या एका इशाऱ्यावर जनता समजो लागली. असल्या धैर्यवान धडक राजाच्या कवतिकात गुंगली. राजाची इच्छा ही जनाच्या भलाईची इच्छा हे ताडून सुखाने राहू लागली. दगडोजींच्या पुढे आता कसलाच अडसर राहिला नाही. सुखनैव राज्यकारभारात राजे गुंतले. मलकापुरास सोनियाची खाण म्हणत म्हणत त्यातून सोनियाचाच धूम्र काढण्याची स्वप्ने दाखवू लागले.

मलकापुरी तद्नंतर दगडोजी सम्राट जाहले. परंतु तैसा प्रकट दिंडोरा पिटला गेला नाही. तिकडील निवडणुकीतून राज्यावर येणाऱ्यास जनतेचे सेवक संबोधिण्याचा प्रघात असल्यामुळे ऐसे

नामकरण कागदोपत्री जाहले नसले तरी चक्रवर्ती सम्राट दगडोजी पळसेपाटील हे बिरूद जनमानसाच्या मनात मात्र पक्के जाऊन बसले. दगडोजीराजेंच्या प्रयत्नांती जनसामान्यांस विचार करणे हेच एक महत्पाप अन् देशविघातक ऐसे पटो लागले. राजेच्छा हाच देशाच्या उद्धारासाठी नि उत्कर्षाकरिता पर्याय असोन त्यास कोणताही अन्य पर्याय नसल्याचे पटोन जनसामान्य सम्राट दगडोजी यांच्या गुणगानात रममाण जाहले.

दगडोजी राजे यांनी ऐसी बाजी मारोन नेली. जन मनात वेगळे स्थान बनवून ते जनतेच्या हृदय सिंहासनावर आरूढ जाहले. पंचवर्षीय अश्वमेध हा एक उपचार बनोन राहिला. सम्राट दगडोजी पळसेपाटील यांच्या राज्यावरोन आता सूर्य मावळेना जाहला. दगडोजी राजे परंतु तल्लख होते. त्यांनी राज्यभर चौफेर नजर ठेविली होती. अलिखित चतु:सूत्रीचे काटेकोर पालन सुरू ठेविले होते. लाखांच्या पोशिंद्यास जनपालनार्थ काही उपद्रवी नागरिकांस बळी चढवावे लागले तर ते देशकालाच्या भल्याकरिता असल्याने त्यास सामान्य जनांचे कडवे समर्थन लाभो लागले. हळूहळू ऐसे होता होता जनसामान्य राजास विरोध करणाऱ्याचा बंदोबस्त स्वतःच करो लागली अन् आपल्या राजाचे कवतिक करणाराची बडदास्त. कोणत्याही देशविरोधी कीडीचे देशात पालन करण्याहून त्यांस तडिपार करणे अथवा परलोकी धाडणे इष्ट.. ते नच जमल्यास शृंखला परिधान करोन कारागृहे भरणे इष्ट.. अंतिम देशकालाच्या

हिताकरिता हे सारे करणेच इष्ट ऐसे जनसामान्यास पटो लागले. या सर्वांमुळे दगडोजी राजेंस अत्यंत संतोष जाहला. ज्यांसाठी सारे आयुष्य वेचिले ते जनसाधारण राजेंच्या कार्यास वाहून घेऊ लागले. ऐसे की दगडोजी राजे म्हणजेच मलकापूर अन मलकापूर म्हणजे दगडोजी राजे ऐसे समीकरण प्रस्थापित जाहले. काही कालावधीत दगडोजी तारणहार भगवंताचा अवतार असल्याची वदंता पसरविली गेली. जनसामान्यास ते पटले. कित्येक स्थळी दगडोजींची मंदिरे उभारली गेली.

दगडोजी राजेंनी तैसी बहुत कार्ये आरंभिली. परंतु त्यातील महत्तम कार्य म्हणजे देशभक्ती जनमानसात रूजविली. आपल्या सम्राटाहून अन्य कोणी देशहित चिंतक कोणी नसून सम्राटहित ते देशहित, दगडोजी राजेंची कोणतीही पडत्या फळासारखी आज्ञा हीच देशहितकारक, कोणतेही धोरण हे देशहिताकरिताच याबद्दल जनमानसी कोणताही संदेह नसणे ही देशप्रेमाची नवीन व्याख्या रूढ केली गेली. महाराजांहून अलग विचार करणे अथवा तो चित्ती आणणे हे 'देश हा देव असे माझा' मानणाऱ्या जनमानसी पापाचरण ठरो लागले. ऐश्या जनांचा नि:पात हेच देशोद्धाराचे सूत्र ऐसे जनीमनी ठसवोन महाराज अन्य कारभारात मग्न जाहले.

प्रत्यक्ष राज्यकारभारात दगडोजी तल्लख होते. त्यांस परिस्थितीचा अंदाज जलदीने येत असल्याने तीवर मात करणे सुलभ असे. बाकी परिस्थिती म्हणजे काय? देश म्हटले की संकटे

आलीच. ती मधील देशांतर्गत नि देशाबाहेरील संकटे भागोजीरावांच्या वर्षानुवर्षे दुर्लक्षामुळे अन चुकीच्या धोरणांमुळे याबाबत जनमानसात कोणताही किंतु राहू नये याबद्दल त्यांनी खासे प्रयत्न केले. प्रयत्न तेथे यश हे ठाऊक असल्याने संकटांचा सामना जनसामान्य भागोजीराजेंस दोष देऊन करो लागलीच अन राजाज्ञेनुसार सुखी अन संतुष्ट राहू लागली. संकटे सुलतानी असली तरी ते संकट येताच अस्मानी असल्याचे भासविण्याचे कसब राजेंच्या अंगी होते. राजाज्ञा होताच त्यांची तैनाती फौज अशा प्रचारात स्वतःस झोकून देई. अस्मानी संकटे ही भगवंताच्या इच्छेनुसार येत असल्याने त्या जगन्नियंत्याच्या मनी देशाचे काहीतरी भले असावे अशा मनाने मलकापूरवासी संकटास सामोरे जात. अशा अस्मानी संकटांत तोंड देण्यास दगडोजींसारखे राजे लाभले म्हणून ईश्वराचे खास आभार मानत. संकटांस संधी मानणारे फार थोडेथोडके लोक असतात. दगडोजी राजे यांतील शिरोमणी. त्यामुळे अशा आपत्तींतून त्यांची प्रतिमा अजून उजळून उठे. वर्षानुवर्षे ऐसे चालत राहिले. जनसामान्य विचार करणे विसरोन गेली अन सुखसागरात डुंबू लागली. दगडोजी राजेंच्या राज्यावरील सूर्य आता मावळेना झाला. पंचवार्षिक अश्वमेधावेळी मात्र दगडोजी अति सावध पवित्रा घेत. भागोजींचा अश्व त्यांनी अडविलेला, तैसा कोणी आपला अडवू नये याकरिता डोळ्यात तेल घालून देशभर लक्ष ठेवित. याठिकाणी गाफील राहणे अयोग्य

हे त्यांस पक्के ठावकी असे. अशा अश्वमेधाच्यावेळी जनतेस सत्य असत्य काल्पनिक वा खऱ्या देशी वा परक्या संकटाचा बागुलबुवा दाखवला की जन भयभीत होऊन उठत. दगडोजी राजे मलकापुरीचे एकमेव तारणहार असोन, त्यांच्याशिवाय सद्गति नाही याची खातरी पटोन त्यांस परत राज्यपदी बैसवित.

राजेंचे अनंत उपकार मलकापुरावर असल्याने जनसामान्य त्यांची मंदिरे उभारू लागले. त्यात जितेपणी एखाद्यास भगवंताचा दर्जा मिळणे अन् असला प्रत्यक्ष देवाचा अवतार भूतली जन्मोन त्याने प्रत्यक्ष मलकापुरी राज्य करणे याबद्दल मलकापूरकर सदैव ऋणी राहिले. आम्ही या सर्वांचे प्रत्यक्ष साक्षीदार. आज लिहिते समयी परत अश्वमेधाच्या वारूस सजविणे सुरू आहे. गावोगावी याची पूजा अर्चना होवोन हा अश्व राजधानीत पोहोचेल हा उपचार निव्वळ बाकी असोन पुढील पंचवर्षे जनसामान्य दगडोजीराजेंस गादीवर बसवोन निर्घोर राहतील. आम्हीही तैसेच. ऐसे होण्यास भाग्य लागते. मलकापूरीच्या भाग्योदयास ललामभूत आमच्या लाडक्या सम्राट दगडोजी राजे पळसेपाटील यांस शत शत नमन करीत हा लेखनप्रपंच संपवीत आहोत.

इति लेखनसीमा ।।

# आपण आणि ते

१

"लग्नाची बोलणी सुरू होणार ..

त्यात काका म्हणाले, 'चांगले स्थळ आहे.. आपल्यापैकी आहे मुलगा..'

मन कसं भरून आलं. आपल्यापैकी आहे म्हणजे चिंता मिटली. नाहीतर लोक काय म्हणतील.. खरंतर लोकांची चिंता नाही. इतक्या शतकांचा वारसा आणि परंपरा, रूढी आणि रीती मोडाव्या लागणार नाहीत .. हे एकदम बेस्ट झालं.. बाकी मुलगा चांगला आहे की नाही .. ते इतकं महत्त्वाचे

नाही, नाही का? आपल्यापैकी आहे तो.."

२

"तिकडे काय कायम अशांतता. दंगेधोपे सगळी कडे. कालच मोठा दंगा झाला म्हणे. दंगा म्हणजे जाळपोळ, तरवारी घेऊन एकेकाचे गळे कापले म्हणे. दुकानं जाळली. बायका पोरांचे हाल झाले. पण चांगली गोष्ट म्हणजे सगळी त्यांची लोकं होती मेलेल्यांत. आपल्यापैकी कुणी नाही. असंच पाहिजे .. माजलेत ते.."

३

"अहो, आपलं मत ..? निवडणुकीत आपल्यापैकी जो त्यालाच द्यायचं. म्हणजे तो कसा का असेना, आपल्यापैकी हवा. त्यांच्यातला असेल कितीही चांगला.. त्याला काय चाटायचाय? आपल्यापैकी कुणी असला म्हणजे झालं.. मी तर तसेच करतो.. तुम्ही पण करा.. त्यांना निवडून आणून डोक्यावर बसवायचं काय आपण?"

४

"तो ना? अरे मदत तर करायला हरकत नाही. तसा गरजवंत आहे तो. बरा आहे. पण एकच प्रॉब्लेम आहे.. आपल्यापैकी नाही तो. म्हणजे तसं आपलं परकं नाही करू, पण करून करून मदत आपल्यापैकी कुणाला केली तर जास्त बरं नाही का? म्हणजे

आपल्यापैकी कुणाला मदतीची गरजच नाही असं थोडीच आहे? सत्पात्री मदत केली की समाधान नि आपल्या समाजापैकी कुणाला असेल तर अधिकच समाधान.."

५

"माजलेत ते लोकं. अरे सगळीकडे पहावे तर त्यांचाच शिरकाव. कुठेही जा. ते सापडणारच. माजणार नाहीत तर काय? आपणच डोक्यावर चढवून ठेवलेय. आणि आपल्या लोकांत एकी नाही ना. उद्या तेच बहुसंख्य आणि आपण अल्पसंख्य होणार बहुधा. सांगून ठेवतो, सतर्क रहायलाच हवे आपण. ते कधी पुढे निघून जातील सांगता येत नाही .."

६

"तो? अगं काय पाहिलंस त्याच्यात? म्हणजे बाकी सगळं असेल ठीक पण आपल्यातला नाहीए तो.. लोकं शेण घालतील तोंडात .. असे शेण खाल्ले तर.."

७

"साहेब.. जरा पहा की नोकरीचं. म्हणजे त्याला पाठवतो मी. काय तो इंटरव्ह्यू वगैरे घ्या. घेऊन टाका. म्हणजे सोपस्कार सारे पार पाडा.. कोणाच्या डोळ्यांवर नको यायला. पण त्याला सिलेक्ट कराच .. आपल्यापैकीच आहे. आपणच सपोर्ट आपल्या लोकांना नाही केला तर कोण करणार? हो की नाही?"

८

"आज या ठिकाणी श्री.अमूक तमूक यांचा सत्कार करताना मला खूप आनंद होत आहे. श्री.अमूक तमूक यांनी आपले नाव उज्ज्वल केले आहेच पण सगळयात आनंदाची बाब ही की ते आपल्यापैकी एक आहेत. त्या लोकांच्या नाकावर टिच्चून त्यांनी आपले नाव या ठिकाणी उज्ज्वल केले आहे.. "

९

"स्का ॅलरशिप? करून टाकू.. म्हणजे आपल्यापैकी फक्त हवा तो किंवा ती. त्यांना मदत करू. आपले विद्यार्थी वर आले पाहिजेत.. शेवटी आपण आपल्या समाजाचे देणे लागतोच की नाही?"

१०

"काय साहेब.. उगाच अडवून धरताय? अहो ओळखले नाहीत दिसतंय.. मी तुमच्यापैकीच एक की. आपल्या माणसांचे काम नाही करणार तुम्ही तर कोणाचे करणार? आपल्या माणसाला असे अडवून धरणे शोभत नाही .. घ्या तुम्ही थोडे पैसे पण आपल्या माणसांकडून थोडे कमी घ्या.."

११

"नाही साहेब, तसं त्या वस्तीत घर दाखवलं असतं.. थोडं स्वस्तात मिळेल पण तुम्ही त्यातले दिसत नाहीत. घर कसं आपल्या

माणसांत हवं. त्यांच्यात रहायला मजा नाही येणार साहेब.. भाड्याने घेणार तरी लोकं तयार होत नाहीत तुम्ही तर विकत घेण्याचं म्हणताय .."

१२

"अहो, घर तुम्ही लाख घ्यायला तयार असाल पण तिकडे लोकं विकायला तयार असतील तर ना? कितीही पैसे मोजा.. ते आपल्याच लोकांना विकणार घर. बाकीच्यांना संपूर्ण मज्जाव .."

१३

"साहेब, तुमची निकड आहे म्हणून घेऊन जातोय. भाड्याने मिळेल घर पण साहेब तुम्ही तसलं काही खात नाही म्हणून सांगा. त्यांना तसलं तिथे चालत नाही.. तुम्ही खा बाहेर कुठे .. आता घर हवं तर खोटं बोलावे लागेल.. त्यांच्यातल्याच लोकांना देतात ते घर म्हणून .."

१४

"त्याचं काय? अहो उगाच कौतुक नको. आपल्यापैकी थोडीच आहे तो. मिळाली संधी नि गेला पुढे. नसते लाड .."

१५

"त्यांना या पुढाऱ्यांनी लाडावून ठेवलंय. मतं हवीत म्हणून. मी म्हणतो यांना मतदानाचा हक्कच कशाला हवा? तो फक्त आपल्या लोकांनाच द्यायचा. म्हणजे आपोआप लायनीवर येतील.."

१६

"आपली गोष्ट वेगळी. आपण सुशिक्षित लोकं. त्यांच्यासारखे अडाणी नाही आपण.. आपण विचार करू शकतो नि त्या अडाण्यांना काय.. दिली एक हिरवी नोट की टाकतील मतं.. आपल्यासारखं थोडीच आहे.. पण आपल्याला एक मत नि त्यांना ही एकच मत.. लोकशाही म्हणे.."

आपण आणि ते..

संत महात्मा लोक सांगून गेले.. सगळी एकाच देवाची लेकरं.. संत नि महात्मेच ते. त्यांना तसे सांगावेच लागते. आणि प्रॅक्टिकल दुनियेचा त्यांना अनुभव तो काय? सगळेच सारखे असतील तर त्या देवाने त्यांना बनवताना असे वेगवेगळे का बनवले असेल? काहीतरी उद्देश असणारच ना त्या विश्वकर्म्याचा? आपण ओळखायला हवा तो.. आपल्यापैकी कोण नि त्यांच्यापैकी कोण.. ओळखायला नको? शेवटी असे 'आपण आणि ते' असले विभाजन व्हायलाच हवे.. अगदी विज्ञानातही शास्त्रीय भाषेत ही असले वर्गीकरण केले जातेच .. तर समाजशास्त्रीय विभाजनही करायला हवेच. आणि सगळ्यांना सोपे पडावे असे दोनच विभाग आहेत त्यात : आपण आणि ते..

मानवजातीची याहून समर्पक विभागणी कोणी करू शकेल?

## भावनाबाई आणि अस्मितताई

आटपाट नगर होते. त्या नगरात दोन मैत्रिणी राहात होत्या. सख्ख्या बहिणी सारख्या. भावना आणि अस्मिता नावाच्या. भावनाबाई लहान तर अस्मितताई मोठी . मैत्रिणी असल्या तरीही दोघ्या सख्ख्या बहिणीसारख्या. म्हणजे एकीला ठेच लागली की दुसरीच्या डोळ्यात पाणी. एक दुखावली की दुसरीही लगेच दुखावली जाई. त्यात दोघी अति संवेदनशील. लाजाळूच्या पानांची काय कथा? त्यांना हात लावला की मिटतात. पण भावनाबाई आणि अस्मितताई तर कोणी हात लावेल याची नुसती शंका

आली तरी शहारून उठत. म्हणजे त्यांच्या त्या संवेदना किती नाजूक असाव्यात की कुणास कळूही नयेत नि फट् म्हणता ब्रह्महत्या व्हावी तशा त्या दुखावल्या जाव्यात. दुखरी नस म्हणून एक प्रकार असतो म्हणे. म्हणजे जिच्यावर हात ठेवला की वेदना जाणवतात. लगेच आणि प्रकर्षाने जाणवतात. तशा दोघींच्या सगळ्याच नसा दुखऱ्या. कुणी कुठे हात ठेवावा? किंवा हात ठेवण्याचा विचार करावा नि उगाच बिचाऱ्या दोघींना दुखवून ठेवावे.

आटपाट नगरात मात्र त्या दोघींची काळजी घेणारे खूप सारे होते. तेही उच्च पदस्थ. ते आधी उच्चपदस्थ झाले नि मग काळजी घेऊ लागले की त्या दोघींची काळजी घेऊन मग तसे झाले याबद्दल मतभेद होऊ शकत असतील, पण त्या स्थानांचा या दोघींशी जवळचा संबंध असे हे

नक्की. अस्मितातांई नावाच्या कित्येक ताया नगरात होत्या. प्रत्येकीस आपापली ओळख करून देण्याचे काम हे सारे करत. कुणी त्यांस राजकारणी म्हणत तर कुणी समाजधुरीण. समाजास दिशा देण्याचे महान कार्य करत असताना अस्मितातांईंची ओळख जनसामान्यांस ते करवून देत. मग विविध अस्मितातााया जाग्या होत. कोणी भाषा भगिनी, कोणी प्रांत भगिनी, कोणी पंथ भगिनी, कोणी जात भगिनी तर कोणी पोटजात भगिनी.. आणि या सर्वांवर एक म्हणजे धर्मभगिनी अशा वेगवेगळ्या अस्मितातांई नगरभर वास्तव्यास होत्या.

तशा त्या असल्या तरी काही अस्मितातााया निद्रितावस्थेत असतील तर त्यांना उठवण्याचे महान कार्य हे राजकारणी करीत असत. या महान कार्यानंतर तेथील जनसामान्यांस हे पटू लागले की मतदानोत्सवात मतांची बेगमी करत हे सारे समाजधुरीण सत्तापदी विराजमान होत. अस्मितातांई याकामी त्यांस अत्यंत उपयोगी पडत असत. त्याचबरोबर भावनाबाईंची काळजी घेणे ओघानेच येई. म्हणजे अस्मितातांईंची धाकटी बहीण भावनाबाई. या भावनाबाईंच्या संवेदना बोथट होऊ नयेत याची सदैव काळजी घेणे हे महान कार्य नेते लोक करीत असत. त्यामुळे ही भावनाबाईंची अवस्था सदैव चिघळती जखम असावी अशी असावी याची काळजी घेणे हे या समाजनेत्यांचे काम ते चोख बजावून समाजास योग्य दिशेने नेत. कुणी कुत्सित लोक निवडणुकीत स्वतःस मत

मिळावे या दिशेने जे नेतात त्यांस नेता म्हणतात असे सांगत. पण या भावनाबाई जितक्या पटकन दुखावतील तितक्या अस्मितातार्इ जाग्या होऊन दुखावल्या गेल्या की खऱ्याखोट्या शत्रूवर मात करणे या नेतेगणांस सोपे होई. बरे, दुखावण्यासाठी त्यांस कोणतेही कारण पुरत असे. म्हणजे कुणी काही बोलले, लिहिले, चित्रे काढली की चित्रपट बनवले .. किंवा याचा नुसता संशय आला तरी भावनाबाई आणि अस्मितातार्इ यांचा थयथयाट सुरू होई. अर्थात या सर्वांचे दिग्दर्शन हेच महान नेतेगण करीत. काही तर अशा दिग्दर्शनामुळेच महान गणले जात. इतिहास, पुराणकाल,देवादिक,धर्म,भाषा,जात वगैरे काहीही विषय असो, अस्मिता चेतवणे किंवा अस्मितेचे स्फुल्लिंग चेतवणे हे महत्त्वाचे याबद्दल हे सदैव जागरूक राहात, सामान्यांस जागृत करत. एकदा भावनाबाई दुखावल्या की अस्मितातार्इंस आवाहन करावे. मग त्या उद्रेकातून विध्वंसक कृत्ये केल्यावाचून या दोघी शांत होणे कठीण. यांच्याकडे कार्यकर्ते नामक तैनाती फौज असे. तोंडास काळे फासणे, निदर्शने, तोडफोड,जाळपोळ, चालणाऱ्या गोष्टी बंद पाडणे इत्यादी कार्यक्रम या फौजेस देऊन हातांस काम दिले जाई. तेवढीच रोजगाराची सोय म्हणून कार्यकर्त्यांच्या फौजा निष्ठेने कामास लागत. नाटक, सिनेमा, पुस्तक, चित्रपट या कलांतून अविष्कृत होणाऱ्या बाबी यांना जास्त आवडीच्या. नाटक सिनेमा बंद पाडणे किंवा त्या नाट्य-चित्रपट गृहाबाहेर निदर्शने करणे आणि त्यात असलेल्या खुर्च्यांची

तोडफोड करणे, पुस्तक असल्यास ते फाडून जाळणे, संबंधितांच्या तोंडांस काळी शाई फासणे असे विविध उपक्रम राबवले की दोन्ही भगिनी शांत होत. कार्यकर्ते अत्यंत निष्ठावान असत. मूळ मुद्दा समजो न समजो आपल्या बोलवित्या धन्याच्या इशाऱ्यावर पुढील कार्यक्रम पार पाडत. यास कोणी कायदा हाती घेणे म्हणोत की जबरदस्ती आणि अन्यांच्या आविष्कार स्वातंत्र्यावर गदा.. याची तमा किंवा पत्रास न बाळगता कार्यकर्ते कामास लागत. यातून कोणी कायदे तोडण्यासाठी पोलिसयंत्रणेने पकडला की बोलविता धनी त्यास सोडवून आणे, त्यामुळे त्याची वट अजूनच वाढत असे. समाजातील मूठभर सोडले तर अन्यांस या सर्वांचा असा फायदाच फायदा होत असे. म्हणजे विरोधी उपक्रम राबवणाऱ्यांस आपले महत्त्व वाढवता येई, कार्यकर्त्यांस तयार अन् सदैव कामात ठेवून तलवारीस गंज न चढण्याची काळजी घेता येई, तर सरकारी यंत्रणेस काही एक केल्यासारखे दाखवून आपली क्षमता किंवा कार्यक्षमता दाखवून देता येई. जनसामान्यांस आपल्याला भावना आहेत व त्या दुखावल्यास अस्मितातोई पण दुखावतात याची जाणीव झाली की आयुष्यातील खऱ्या प्रश्नास बगल देता येई. थोडक्यात विविध समाज घटकांचा यात फायदाच फायदा असे. समाजातील मूठभर ढुढ्ढाचार्य यात खुसपटे काढत, व्यक्ती नि भाषण, आविष्कार नि लेखन अशा विविध स्वातंत्र्यांबाबत गळे काढत. पण लोकशाही देशात बहुमतानेच सारे होत असते तसे आटपाट नगरातही होई.

त्यामुळे बहुसंख्यांस जे पटते भावते नि आवडते किंवा परवडते त्यास सत्य मानणे यातच बहुजनांचे हित याबद्दल कोणाच्याही मनात यत्किंचितही किंतु नसे. त्यामुळे भावनाबाई अन् अस्मितातार्इंचे निरंकुश राज्य तेथे सुरू असे.

हे मूठभर ढुढ्ढाचार्य मात्र लांब तोंड करून आपल्या स्वातंत्र्याची चर्चा बिर्चा करत बसत. म्हणजे कुठे पत्रे लिहून,पेपरात बातमी आणून नाहीतर दृकश्राव्य असे जे माध्यम हाती लागेल त्यातून. आपले मत व्यक्त करून प्रसिद्धी मिळवणे हा त्यांचा अंतस्थ हेतू असल्याचे सांगितले जाई. जनतेस ते पटल्याने त्या मूठभरांकडे काणाडोळा करून जनता समाजधुरीणांच्या पाठी ठाम उभी राही. दोघींच्या संवेदना जागृत असल्याने त्यांना वेदना होतात .. याबद्दल जनतेस खात्री असल्याने अन्य कोणत्याही मतांचा उपहास केला जाई. त्यात हे स्वातंत्र्यवादी आधीच अल्पमतात असत नि लोकशाही असल्याने बहुमताचाच विजय होई. आणि भावनाबाई आणि अस्मितातार्इंचा वरचष्मा कायम राही. अर्थात हे तितके सोपे नसे. यासाठी ही बिचाऱ्या समाजधुरीणांस मेहनत करावी लागे. म्हणजे नको तितके विचार जनता करू लागली, तीस या सगळ्या तथाकथित अल्पसंख्य आणि अल्पमती स्वातंत्र्यवाद्यांचे पटू लागले तर समाजाची प्रगती होणार कशी या विचाराने सारे अस्वस्थ होत. पण नेतृत्व करायचे म्हणजे सर्व

विरोधास तोंड द्यावेच लागते हे ठाऊक असल्याने ते धीरोदात्तपणे यास सामोरे जात. अर्थात नगरातील जनसामान्य तसे सुज्ञ असल्याने ते या नेतेगणांच्या मागे ठामपणे उभे राहून भावनाबाई आणि अस्मितातार्इंचा जिवापाड सांभाळ करत. शतकानुशतके चालत आलेले जात, पोटजात, भाषा, पंथ, राज्य, धर्म असे अस्मितातार्इंचे आवडते मुद्दे हे काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेले असल्याने स्वतःस विचारवंत म्हणविणाऱ्या काही समाज सुधारकांस जनता त्यांची जागा दाखवून देई.

अशा या भावनाबाई आणि अस्मितताई. दोघांच्या मैत्रीच्या कथा आजही आटपाट नगरात प्रसिद्ध आहेत. जनसामान्यांच्या मनावर राज्य करणाऱ्या या दोन मैत्रिणी आणि त्यांना तसे करू देण्यास मदत करणारे समाजनेते .. आटपाट नगर सदैव त्यांचे ऋणी होते, आहे आणि राहिल .. शेवटी प्रश्न अस्तित्वाचा आहे.


काय आहे, या दोघींचे अस्तित्व म्हणजे मनुष्यप्राण्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. म्हणजे उदाहरणार्थ, झाडे नि इतर प्राणी यांच्या सजीव साम्राज्यात भावनाबाई आणि अस्मितताई असल्याचे कुणी ऐकलेय? आंब्याचे झाड बोरीबाभळीला कधी हिणवताना ऐकलेय? किंवा अल्सेशियन कुत्रा साध्या कुलुंगी कुत्र्यास हीन लेखताना पाहिलेय? नाहीच असे काही होणार. बिचारे

विचार करू शकत नाही. माणसासारखा मेंदू उत्क्रांत झालेला नाही त्यांचा त्याला ते तरी काय करणार? पण आम्हा मानवप्राण्यांचे तसे नाही.. आम्ही प्रगत. उत्क्रांतीच्या सर्वात वरच्या टप्प्यावरील.


.. तर सांगायचे काय, अहो, मानवजातीतून भावनाबाई आणि अस्मिताताई वगळल्या तर उरेल ते काय शेवटी?

डॉ. नितीन मोरे यांची ३१+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.
































राग दरबारी

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या




डॉ. नितीन मोरे
घरात

डॉ. नितीन मोरे

सांगतो ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे

छ..छ..म..


डॉ. नितीन मोरे
कविता


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
ई बुक
+ऑडिओपुस्तक
+व्हिडिओपुस्तक




डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष**

**डॉ. नितीन मोरे यांचे हे बत्तिसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही

परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३२), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(२) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची

आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "इ"यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।